
आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

६ सप्टेंबर २०११ | वर्ष २८ | अंक ११

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०



७६ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

मा. शरद जोशी
जन्म : ३ सप्टेंबर १९३५

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ११ । ६सप्टेंबर २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**


**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com


● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


जागरण
**सरकारी खत लय भारी**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

आजकाल
**साखर उद्योग ३जी ते ८जी**
ज्ञानेश्वर शेलार ........ ६

मुद्दा
**भू-संपादन बिलाचे मायाजाल**
ॲड. अनंत उमरीकर ........ ८

कॉमन नॉन सेन्स
**संसदेची प्रतिष्ठा राखण्याचा मार्ग : नवा जनादेश**
सुधाकर जाधव ........ १२

मधोमध
**अण्णांच्या आंदोलनाला आता सरकारी 'प्रतिआंदोलनाचा' धोका!**
दत्ता जोशी ........ १६

वाङ्मय शेती
**सत्ता स्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र : पूर्वार्ध**
गंगाधर मुटे ........ १९

'अमर'गाथा
**शेती, शेतकरी आणि शिक्षण**
अमर हबीब ........ २२

(उ)संतवाणी
**बैलांचाही जागो पुरुषार्थ**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ २४

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २६

**शेतकरी संघटना वृत्त** ........ ३०

# शरद जोशी तुमचं आता काय करायचं?

आदरणीय शरद जोशी,

सा. न.

तुमच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त तुम्हाला मनःपूर्वक शुभेच्छा! खरं तर तुम्हाला काय संबोधावं याचाच मोठा प्रश्न आहे. शेतकरी संघटनेचे लाखो पाईक तुम्हाला आदरणीय साहेब म्हणतात... पण हे संबोधन काहीसं सरंजामी वृत्तीचं द्योतक, जे तुम्हालाच फारसं पसंत नाहीत. वैयक्तिक संबंधांचा फायदा घेऊन जवळीक दाखविणारं एखादं संबोधन वापरावं तर संयुक्तिक वाटत नाही... म्हणून आपलं नुसतं शरद जोशी असंच म्हणतो. तुम्हाला चतुरंग प्रतिष्ठानचा 'जीवनगौरव' पुरस्कार जाहीर झाला आणि आम्हाला मोठाच आनंद झाला... पण या निमित्ताने एक वेगळाच आणि गंमतशीर विचार मनात येतोय... परवाच्या अण्णा हजारेंच्या आंदोलनाने बऱ्याच विद्वानांना खरंचच असा प्रश्न पडला असावा, 'शरद जोशी तुमचं काय करायचं?'

शेतकरी संघटनेच्या आंदोलनावरती बऱ्याच विद्वानांनी टीका करत असताना फार मोठा वैचारिकतेचा आव आणला होता. खरं तर अतिशय शास्त्रशुद्ध अशा पायावर, अभ्यासावर आणि अनुभवांवर तुम्ही आंदोलन उभारलं होतं. तरीही तुमच्यावर टीका करताना बुद्धिवंतांच्या जिव्हा मोकाट सुटायच्या... सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत शेतीच्या शोषणाचा संदेश अतिशय सोपेपणानं तुम्ही पोहोचवलात आणि हे करत असताना कुठेही वैचारिक चौकट ढळू दिली नाही. इतकं करूनही लाखोंच्या संख्येने शेतकऱ्यांचे मेळावे भरवून दाखविले, यशस्वी केले... तुम्ही कधीही काळजाला हात घालणारी भाषा करून हुकमी रडू आणलं नाही; पण तरीही शेतकऱ्यांच्या डोळ्यातून जन्मोजन्मीचं दुःख घळाघळा वाहत राहिलं. निखळ अर्थशास्त्रावरती आधारलेलं आंदोलन करताना कुठेही लोकांचा प्रतिसाद भेटला नाही, असं घडलं नाही. मोठ्या प्रमाणात लोकं यायला लागले, तेव्हा आपसूकच बुद्धिवंतांच्या पोटात गोळा उठायला लागला आणि त्यांनी ठरवून टाकलं... ज्या अर्थी लोकं येतात त्या अर्थी या आंदोलनात कुठलाही विचार नसणार! आता इतकी वर्षे उलटून गेलीत. तुमच्यावर टीका करणारे सामान्य कार्यकर्तेही नेते बनून फिरायला लागले. त्यांनीही स्वतंत्रपणे आंदोलनं करायला सुरुवात केली; पण तुमच्यासारखं यश, तुमच्यासारखा सर्वसामान्य शेतकऱ्याचा विश्वास कुणालाच कमावता आला नाही. तुमचे फोटो शेतकऱ्यांनी देवघरात मांडले. हे भाग्य कुठल्याही नेत्याच्या वाट्याला आलं नाही. अण्णा हजारेंच्या आंदोलनाला मिळत असलेला प्रतिसाद पाहून भल्याभल्यांनी चित्रविचित्र टीका अण्णांवर करायला सुरुवात केली. बुद्धिवंतांना तर अण्णा म्हणजे सगळ्यांत सोपी शिकार! कारण या आंदोलनात खरंचच वैचारिकतेचा अभाव! त्यांच्यावर टीका करणं त्यामुळे सोपं... या आंदोलनावरती बोलतानाही आपली बुद्धी स्थिर ठेवून तुम्ही शांतपणे विश्लेषण केलंत. आंदोलनातील लोकांच्या उत्स्फुर्त सहभागामुळे हे ऐतिहासिक जनआंदोलन आहे हे निःशंकपणे मान्य केलंत. स्वतःच्या आंदोलनातल्या मर्यादा स्पष्टपणे सांगितल्या. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील कोरडेपणा आणि त्यामुळे शेतकरी आंदोलनाला आलेलं गद्यपण हेही मान्य केलंत; पण हे सगळं मान्य करत असताना अण्णांच्या मर्यादा सांगायला तुम्ही चुकला नाहीत. इतकंच नाही, ज्या आंदोलनाशी अण्णांच्या आंदोलनाची तुलना होते, त्या महात्मा गांधी यांच्या आंदोलनाच्या मर्यादाही तुम्ही सांगितल्या आणि ही सगळी चर्चा कुठे खासगीपणे नव्हे तर दूरदर्शनवर स्पष्टपणे करोडो लोकांसमोर केलीत. आपल्या प्रखर बुद्धिमत्तेचंच तुम्ही दर्शन सगळ्यांना दिलंत आणि म्हणूनच म्हणतो, आमचे विद्वान मोठे बावचळून गेले आहेत. त्यांना प्रश्न पडला आहे - 'शरद जोशी तुमचं काय करायचं?'



सगळ्या पातळ्यांवरती सगळी हत्यारं वापरून झाली. कधी परिस्थितीची, कधी जातीची, कधी निवडणुकांच्या वेड्यावाकड्या तंत्राची, कधी वैचारिकतेचा आव आणत सगळ्या सगळ्या पद्धतींनी तुमच्यावर चढाई करून झालं... पण सगळ्यांतून तुम्ही स्वच्छपणे बाहेर पडून दोन बोटं वरतीच उरलात. आता तुमचं काय करायचं? तुमचा रस्ता भारतीय परंपरेतला तसा नवा रस्ता नाही. गौतम बुद्ध असो, आदि शंकराचार्य असो, किंवा अगदी अलीकडच्या काळातील महात्मा फुले, आगरकर, आंबेडकर असोत या मार्गांनी तुम्ही चालायचं ठरवलंत आणि त्यावर चालत असताना कुणालाच माफ केलं नाहीत... अगदी स्वतःलासुद्धा! जे काही निर्णय घेतले त्याची किंमत सगळ्या परीने मोजलीत आणि म्हणूनच तुम्ही स्वच्छपणे आजही करोडो लोकांसमोर ७६व्या वर्षी बुद्धि स्थिर ठेवून स्वतःच्याही चळवळीचं कठोर विश्लेषण करू शकता. स्वतः बुद्धिवंत म्हणवून घेताना अण्णा हजारेंवर टीका करणं ही फार सोपी आणि सोयीची गोष्ट असते; पण शरद जोशींवर टीका करताना आपण हळूहळू निःसंदर्भ, निस्तेज आणि निःसत्व होत जातो हेच बऱ्याच जणांना कळत नाही. तुम्ही ९३ साली म्हणालात - 'नोकरशाही हा प्रचंड मोठा भस्मासूर आहे' आणि अण्णांच्या आंदोलनावर चर्चा करताना नोकरशाहीचा विषय येतो आणि परत तुमच्याच मुद्यापाशी येऊन थांबावं लागतं. कापसाचे भाव ७ हजारांच्या पुढे गेल्यावर निर्यातबंदीची कुऱ्हाड सरकार चालवतं आणि त्याचा झटका बसताच मोठी तीव्र प्रतिक्रिया उमटते. परत विषय येतो तो तुम्ही सांगितलेल्या खुल्या निर्यातीचा... खताच्या अनुदानाचा खेळखंडोबा होत राहतो, ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न कुठलीही रोजगार योजना, कुठलीही निराधार मदत योजना, कुठलीही धान्य वितरण व्यवस्था सोडवू शकत नाही आणि परत येऊन थांबावं लागतं तुम्ही सांगितलेल्या शेतीमालाच्या रास्त भावापाशीच. शेतकरी आंदोलनाला उलटलेली ३१ वर्षे आणि तुमच्या वयाची उलटलेली ७६ वर्षे परत आम्ही तुम्ही सांगितलेल्या उत्तरांपाशीच येऊन थांबतो. सांगा शरद जोशी तुमचं आता काय करायचं?




# सरकारी खत लय भारी

शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यायची म्हणून सरकार त्यांना सवलतीच्या भावात खत पूरवठा करते. म्हणजे काय तर खत तयार करणारे जे कारखाने आहेत त्यांना खत स्वस्तात विकायला लावून त्यांना त्यांच्या उत्पादनावर अनुदान देते. हे खतसुद्धा फार प्रभावी आहे. ज्याच्या हाती पडले त्याचा उद्धार करते. जिथे पडले तिथे भरपूर उगवते. असे असले तर खतासाठी भारतीय शेतकरी ओरडतो कशाला? हाच प्रश्न पडला होता कॅगला. कॅग म्हणजे भारताचा महालेखापाल. सगळ्या देशातल्या सरकारांचे, सरकारी संस्थांच्या हिशोबाची तपासणी करणारा तपासनीस. देशात सुदैवाने आपले काम चोख करणाया ज्या काही सरकारी संस्था आहेत त्यात कॅगचा नंबर बराच वरचा लागेल.

२००९-१० सालात सरकारने दिलेले खतावरील अनुदान रु. ५६,००० कोटींपेक्षा थोडे जास्त झाले होते. एवढी मोठी रक्कम ज्या अनुदानावर खर्च होते त्याचे लेखापरीक्षण करणे आवश्यकच आहे. त्याच सोबत खतांची खुल्या बाजारातली किंमत आणि अनुदानीत खतांची किंमत यात मोठी तफावत असल्यामुळे खतांचा काळाबाजार होण्याची मोठी शक्यता आहे हे लक्षात घेऊन ते महत्वाचे आहे असे कॅगनेच आपल्या अहवालात नमूद केले आहे.

खतांच्या अनुदानाचा वापर कसा होतो याचा अभ्यास कॅगने २००३-०४ ते २००८-०९ या वर्षांसाठी केला. यात २४ राज्यांतील ९४ जिल्हे, १८८ ब्लॉक्स, ४४ खत गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा यांचे परीक्षण करण्यात आले. त्याचसोबत ५४९८ शेतकरी अशा खताचे १०९२ व्यापारी यांचेही सर्वेक्षण करण्यात आले. या परीक्षणातून, सर्वेक्षणातून जे काही बाहेर आले त्याची चर्चा या लेखात करण्यात आली आहे.



श्रीकृष्ण उमरीकर

आपल्या देशातले खतांचे उत्पादन, वितरण सरकारी नियंत्रणाखाली चालते. युरीयासाठी लागणारा कच्चा माल आपल्या देशातच तयार होतो; पण मागणी जास्त असल्यास त्याची आयात करावी लागते आणि त्यावरही सरकारचेच नियंत्रण आहे. इतर खतांसाठी लागणारा कच्चामाल आपण आयात करतो. देशांतर्गत उत्पादन फार थोडे आहे.

खतांच्या अनुदानाबाबत लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खताचे भाव सरकार ठरवते. त्याच भावात खत विकल्या जावे अशी अपेक्षा आहे. उत्पादनाचा खर्च जास्त असल्यामुळे स्वस्तात खत विकावे लागल्यामुळे खत कंपनीचा जो तोटा होतो तो भरून काढण्यासाठी सरकार खत कंपन्यांना अनुदान देते. बरे हे अनुदान किती असावे यासाठी वेगवेगळे नियम सुत्रे आहेत. कारखान्यांचे वय, वापरण्यात येणारा कच्चा माल वगैरे बाबींवर हे अनुदान ठरते.

कॅगने आपला अहवाल केंद्र सरकारच्या 'खत विभागास' सादर केल्यावरही त्या विभागाने आजवर त्याला उत्तर दिलेले नाही. यावरून त्या खात्याचा कोडगेपणा लक्षात येतो आणि म्हणूनच यापूर्वी जी परीक्षणे झाली त्यांची अनुमाने आणि त्याला खात्याने दिलेली उत्तरे पाहून आपल्याला आश्चर्य वाटत नाही. २००० मध्ये केलेल्या परीक्षणातील निरीक्षणे आणि त्याला दिलेली उत्तरे पुढीलप्रमाणे :

**निरिक्षण १** : १९९२-१९९८ च्या दरम्यान खत कारखान्यांनी पुरविलेल्या आकडेवारीची शहानिशा न करता सरकारने २५,१५५ कोटी रुपयांचे अनुदान वितरीत केले.

**उत्तर** : चार्टर्ड अकाउंटंटसच्या संस्थेस 'आकडेवारीची खातरजमा कशी करावी याविषयी सल्ला देण्यासाठी योग्य त्या चार्टर्ड अकाउंटंटसची नावे सुचवा असे सांगण्यात आले आहे!

म्हणजे पाहा. सहा वर्षांत पंचवीस हजार कोटी रुपयांची सबसडी देण्यात आली. त्यासाठी योग्य ती खातरजमा केली नाही, असे निरीक्षण नोंदवल्यावर खाते काय करते तर, चार्टर्ड अकाऊंटंटसच्या संस्थेला सल्लागारांची नावे सुचवण्यास सांगते. ही लाल फितशाही नाही तर दुसरे काय?

**निरीक्षण २** : सरकारने करात दिलेली सूट वेळीच लक्षात न घेतल्यामुळे खत उद्योगास १९९४-१९९८ या काळात ४०८ कोटी रुपये आणि ४६० कोटी रुपये जास्तीचे देण्यात आले.

**उत्तर** : अनुदानाचे घटक ठरविण्यास उशीर झाला. आमच्याकडे कर्मचारी कमी आहेत. जे आहेत त्यांच्या बदल्या होत असतात. तसेच आमचे कार्यालय वेगवेगळ्या समित्यांवर काम करत असल्यामुळे आम्हाला हिशेब करण्यास वेळ मिळला नाही!

लालफितशाही किती वाढली आहे ते बघा. खत विभागाचे कामच खतपूरवठा, त्याचे अनुदान वगैरेंचे नियंत्रण करणे हे आहे. असे असताना आम्हाला आमचे कामच करायला वेळ नाही असे सांगणे म्हणजे केवढा पराकोटीचा बेमुर्वतपणा झाला.

**निरीक्षण ३** : घसाऱ्याचे प्रमाण जास्त घेतल्यामुळे जास्तीचे अनुदान दिल्या गेले.

**उत्तर** : आम्ही नवे धोरण ठरवत आहोत.

**निरीक्षण ४** : निकृष्ट दर्जाचा खत पुरवठा केल्यामुळे दिलेले अनुदान परत घेतले नाही तसेच बंद पडलेल्या कारखान्यांसही अनुदान दिल्या गेले.

**उत्तर** : आम्ही ते नंतर बघून घेऊ.

**२००५ मधील दुसऱ्या लेखा परीक्षणातील निरीक्षण**

कार्यक्षम, अचूक अशा संगणकीय प्रणालीच्या अनुपस्थित घोटाळ्यांना वाव मिळत आहे.

तसेच आकडेवारीतील चुका तपासण्याची यंत्रणा न राबविल्यामुळे चुकीची आकडेवारी नोंदवण्यात येऊन जास्तिचे अनुदान दिले जात आहे.

दरवर्षी खताची गरज ठरविण्याची सरकारी पद्धत पाहू...

लक्षात घ्या सगळा कारभार कसा लालफितशाहीचा उत्तम नमुना आहे. हंगामात लागणाऱ्या खताची गरज किती आहे याचा अंदाज हंगामापूर्वी ३-४ महिने घेतल्या जातो. त्यासाठी कृषी खाते राज्यांकडून विविध प्रकारची माहिती मागवते. त्यात गेल्या वर्षीचा खप, शिल्लक साठा, जमिनीचे परीक्षण अहवाल, लागवडी खालचे क्षेत्र, वगैरे वगैरे अनेक बाबींचा समावेश असतो. कृषी खाते देशात खत पुरवठा-उत्पादन-वितरण यांसंबधी संबंधीत सर्व घटकांचे मेळावे भरविते. या मेळाव्यात राज्यांचे प्रतिनिधी आपापली खताची गरज जाहीर करतात. त्यानंतर सखोल चर्चा करून कृषी खाते राज्यांची गरज किती आहे हे ठरविते आणि तिची महिनेवार विभागणी करते. ही महिनेवार विभागणी खत विभागाला कळविण्यात येते. त्यावरून खतविभाग खत वितरणाचे 'आदेश' काढते आणि संबंधितांना कळविते.

ही झाली सरकारची 'आदर्श' पद्धती. प्रत्यक्षात या मेळाव्यात काय सखोल चर्चा झाली याची नोंद ठेवणारी कोणतीही कागदपत्रे तयार केली नाहीत. राज्यांच्या केलेल्या लेखापरीक्षणावरून असे दिसून आले की राज्यांनीही आपली खतांची गरज किती आहे हे सांगताना कोणत्याही शास्त्रीय मार्गाचा अवलंब न करता मागील वर्षाच्या गरजेमध्ये ५-१०% वाढ करून चालू हंगामातील गरजेचे आकडे ठरविले.

याचाच अर्थ असा की हे मेळावे, या बैठका म्हणजे केवळ वेळेचा आणि पैशांचा अपव्यय आणि सरकारी नोकरांनी सरकारच्या पैशांवर उपभोगलेली सुटी. खाजगी उद्योगांत हेच काम अत्यंत कार्यक्षमतेने होते. प्रत्येक कार्यालय आपल्या गरजा वरीष्ठ कार्यालयाला कळवते. तेही ईमेलसारख्या आधुनिक माध्यमातून. आपली गरज किती आहे हे ठरविणाऱ्या सुत्राच्या बाहेर कोणी जात नाही. वरचे कार्यालय सर्व गरजा एकत्र करून संपूर्ण उद्योगास काय हवे ते ठरविते आणि मग वितरण करते. ज्यांच्याकडे जास्त किंवा कमी साधनसामग्री गेली त्यासाठी त्यालाच जबाबदार धरण्यात येते. जपानसारख्या देशात आणि आपल्याही देशातील काही प्रगत उद्योगांत 'जस्ट इन टाईम' या सूत्राप्रमाणे काम चालते. म्हणजे कारखान्याला लागणारा कच्चा माल उत्पादन सुरू करण्यापूर्वी थोडा काळ कारखान्यात पोहोचतो. त्यामुळे साठवण करण्याचा त्रास तथा खर्च वाचतो. विचार करा कार बनविणाऱ्या एखाद्या कारखान्यात किती वेगवेगळ्या प्रकारचे सुटे भाग लागत असावेत! हे भाग किती आणि कधी लागतील याचे एक वेळापत्रक तयार असते. त्याबरहुकूम ते सुटे भाग कारखान्यात पोहोचतात आणि उत्पादन बिनबोभाट चालते.

अमेरिकेतल्या एका प्रसिद्ध जिन्स बनविणाऱ्या कंपनीने आपल्या कामाचे संगणकीकरण करून घेतले आहे. जगात कोठेही त्यांची जिन्स विकल्या गेली की तिची नोंद संगणकात होते. मग हा संगणक त्याप्रमाणे आपला साठा अद्ययावत करतो. दुकानात जो माल कमी झाला तो गोदामातून दुकानाकडे पाठविण्याची, तसेच गोदामात जो माल कमी झाला तो कारखान्यातून गोदामात पाठविण्याची, तसेच ज्या मालाची विक्री जास्त होत आहे त्याचेच जास्त उत्पादन करण्याची, त्या उत्पादनासाठी लागणाऱ्या विविध कच्च्या मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था करण्याचे 'आदेश' हा संगणक संबंधितांना देतो. एवढेच काय तर मागील वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन हा संगणक पुढील हंगामात विक्री केव्हा-कशाची जास्त होईल याचे अचूक आडाखेही बांधतो.

खाजगी बँकांच्या एटीएममध्ये कधी किती रोकड ठेवायची याचा अचूक अंदाज घेतल्या जातो. तेथील ग्राहकांना कधीही निराश व्हावे लागत नाही.

जर जिन्ससारख्या साध्या वस्तूचे उत्पादक किंवा कारसारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या वस्तुचे उत्पादक किंवा खाजगी बँकांसारखे सेवा पुरवठादार हे आपल्याला किती माल लागणार आहे आणि तो कधी आपल्या दारी पोहोचला पाहिजे याचा अचूक अंदाज बांधून आपले काम कार्यक्षमतेने चालवतात तर मग कृषीखात्याला प्रत्येक हंगामात खताची किती गरज आहे हे ओळखण्यात अपयश का यावे? याचे उत्तर हेच असू शकते की सरकारी व्यवस्था शोषणासाठी बनलेली आहे. देशाचे प्रश्न सोडवण्यासाठी किंवा जनतेच्या सोयीसाठी नाही आणि म्हणूनच कष्ट करून देशाला अन्न भरविणाऱ्या शेतकऱ्याला काय हवे याचा अंदाज कृषीखात्याला येत नाही आणि शेतकऱ्याच्या नशीबातली खतासाठीची परवड सरत नाही.

वेगवेगळ्या राज्यांच्या कृषीखात्यांनी काय दिवे लावले त्याची काही खास उदाहरणे बघा.

आंध्रप्रदेशमध्ये गुंटूर जिल्ह्यात पिकात झालेला बदल लक्षात न घेतल्यामुळे खताची टंचाई झाली, तसेच खताची आकडेवारी देताना मागील वर्षीचे आकडे सांगितले कोणतही अभ्यास न करता.

आपल्या पुरोगामी महाराष्ट्रात मागील तीन वर्षांत शेतकऱ्यांनी किती आणि कोणते खत वापरले याचा अभ्यास करून कृषी अधिकाऱ्यांनी आपली मागणी नोंदवावी असे कृषी आयुक्तांचे आदेश असतानासुद्धा कृषी अधिकाऱ्यांनी खत दुकानदारांकडील विक्रीची आकडेवारी वापरून आपले अंदाज सरकारला पाठवले! (मग खताची टंचाई झाल्यास नवल ते काय?) देशाचे गव्हाचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंजाबात तर कित्येक कृषी अधिकारी आपली खताची गरज किती हे कळवितच नाहीत! कृषी आयुक्तच मागील वर्षीच्या आकड्यांवरून नवे आकडे बनवितात. इतर राज्यांचीही परिस्थिती वेगळी नाही आणि हे कॅगचे निरीक्षण आहे!

जी स्थिती गरज ठरवण्याची तीच राखीव साठ्यांची. कोणत्याच राज्याने खताचा राखीव साठा ठेवलेला नाही! खत कारखान्यांनी आपली कार्यक्षमता वाढवून खताचा उत्पादन खर्च कमी करावा म्हणून सरकारने केलेले प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. युरीयाचा उत्पादन खर्च तर वाढलाच आहे!

खताच्या अनुदानाविषयी कॅगची निरीक्षणे पाहता सरकार भ्रष्टाचाराला कसे उतेजन देते हे स्पष्ट होते. २००७ पर्यंत खत कारखान्यांनी पुरवठा केलेल्या खताच्या बिलाबद्दल त्यांना बिलाच्या रकमेच्या ८५-९०% रक्कम देण्यात येत होती. उरलेली रक्कम राज्य सरकारने आपल्याला खत मिळाल्याचे प्रमाणात केल्यावर देण्यात येत होती. म्हणून आपले खत राज्यसरकारच्या हाती पडले आहे (प्रत्यक्षात ते पडो अथवा न पडो!) असे प्रमाणपत्र मिळवण्याची गरज खत कारखानदारांना होती. म्हणून २००७ पर्यंत केवळ रुपये १११ कोटी एवढ्या किंमतीच्या खतासाठी पुरवठा झाल्याची प्रमाणपत्रे देणे बाकी होते; पण २००७ मध्ये जो बदल झाला त्यानंतर तीनच वर्षांत रु. ५०,५८७ कोटी एवढ्या रकमेच्या खताचा पुरवठा झाल्याची प्रमाणपत्रे राज्य सरकारने दिलेली नाहीत. याचा अर्थ स्पष्ट आहे. एकतर राज्य सरकारे तसे करण्यात उदासिन आहेत किंवा खत पुरवठा झालेलाच नाही! सर्वसामान्य माणूस गावाला जायला निघतो तेव्हा त्याच्या घरची माणसे त्याला सांगतात पोहोचल्यावर कळवा. एखादे महत्त्वाचे पत्र पाठवल्यावर ते पोहोचले का नाही याची विचारणाही आपण करतो. कोणत्याही व्यापारात 'माल पोहोचल्याची खातरजमा' स्टोअर विभागाने केल्याशिवाय माल पुरवणाऱ्यास त्याचे पैसे दिल्या जात नाहीत. एवढेच काय आपला किराणा दुकानदारही आपल्या वस्तू मोजून आपल्या पिशवित भरतो तेव्हाच आपण त्याचे पैसे देतो. मग खताच्या बाबतीत सरकार असे निष्काळजी का? ठरविलेल्या ठिकाणी खत पोहोचले का नाही याची खात्री न करताच कारखान्यांना त्यांचे पैसे देऊन आपले कर्तव्य पार पाडायची एवढी घाई सरकारला का सुचते? याची उत्तरे शोधल्यास आपल्याला या व्यवहारात होणारा घोटाळा दिसेल हे नक्की आणि म्हणूनच कॅगचे हे निरीक्षण की, ''बहुतांश राज्यांत मिळालेल्या खतांचे मोजमाप करण्याची यंत्रणा अपुरी आहे किंवा तिचा अभाव आहे. इतकेच काय पण कारखान्यांनी दिलेल्या देयके, पोचपावत्या तपासणी करणारी यंत्रणाही अस्तित्वात नाही!'' वाचून आपल्याला आश्चर्य वाटत नाही.

इंडियन पोटॅश लिमिटेड या कंपनीने आयात केलेल्या कच्च्या मालाची कागदपत्रे सादर न केल्यमुळे तीस दिल्या गेलेल्या रु. १६०० कोटींच्या अनुदानाचा हिशेब लागत नाही. त्याचसोबत त्यांनी आयात केलेल्या १०,००० टन खतांचा हिशेब लागत नाही. याच कंपनीने सरकारी नियोजनात नसताना रु. ४,००० कोटींपेक्षा जास्त किंमतीच्या युरीयाची आयात केली तरीही सरकारने त्याची भरपाई करून दिली. अहो सामान्य नागरिक स्वस्त मिळालीच तरीही एखादा किलो भाजी जास्त घेताना तीनदा विचार करतो आणि येथे गरज नसतानाही हजारो कोटी रुपयांच्या खताची आयात होते काय नी सरकार त्याची रक्कम देते काय! सगळाच सावळा गोंधळ आहे.

खताची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी जेवढे नमुने तपासायला हवेत त्याच्या केवळ २५% नमुने तपासण्यात आले. तसेच गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांनी आपल्या क्षमतेपेक्षा कमी काम केले.

हे सगळे काय कमी म्हणून कॅगने केलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष मोठे मार्मीक आहेत.

५७% विक्रेत्यांना नोंदवलेल्या मागणीप्रमाणे खत पुरवठा होत नाही.

७५% विक्रेते शेतकऱ्यांना कोणत्याही मर्यादे शिवाय खत देतात.

३७% शेतकऱ्यांना खताची वाहतूक करताना अडचणी आल्या.

४०% शेतकऱ्यांकडे खत घेण्यासाठी कर्ज उपलब्ध नव्हते.

४७% शेतकऱ्यांची खताची मागणी पूर्ण करू शकत नव्हते.

शेतकऱ्यांचे अनुभव सरकारचे अपयश दर्शवितात. ४५% शेतकऱ्यांना कमाल भावापेक्षा जास्त भावाने खत खरेदी करावे लागले तर ४६% ना खरेदीची पावती देण्यात आली नाही. ५५% ना खत छोट्या आकाराच्या पिशव्यात हवे आहे. तर ४०% ना हवे तेवढे खत मिळालेच नाही. ७६% जणांनी मृदा परीक्षण केलेलेच नव्हते. ५१% शेतकऱ्यांकडे आवश्यक तेवढे खत विकत घेण्यासाठी पैसे नव्हते.

शेवटी आपल्या अहवालात कॅगने म्हटले आहे की सरकारच्या भोंगळ कारभाराला शिस्त लावून शेतकऱ्याला सवलतीच्या भावात खत पुरवठा करणे गरजेचे आहे. ते जर होत नसेल तर खताच्या अनुदानावर खर्च होत असलेली अवाढव्य रक्कम वाया जात आहे असेच म्हणावे लागेल. आम्हीही तेच म्हणत आहोत. सरकार खतांवर खर्च करत असलेले अनुदान शेतकऱ्यांसाठी नसून खत कारखाने आणि खत विभागात काम करणाऱ्या बेबंद कर्मचाऱ्यांसाठी आहे. 'जाणते राजे, आदरणीय कृषिमंत्री माननीय श्री. शरदचंद्ररावजी पवार' यांना खरेच जर शेतकऱ्यांविषयी काही आस्था असेल तर त्यांनी त्यांच्या मंत्रीपदाचा जो काही कालावधी उरला आहे त्यात खत वितरणात अमुलाग्र सुधारणा करावी ही कळकळीची विनंती. आपले माननीय आदरणीय वगैरे वगैरे कृषिमंत्री शेतकरी संघटक वाचतच नसतील. तसेच त्यांनी कॅगचा अहवालही वाचला नसेलच. तसे असले तर आता शेतकऱ्यांनीच शहाणे होऊन त्यांना कायमचे घरी बसवावे म्हणजे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करायला पुरेसा वेळ मिळेल. त्या शिवाय शेतकऱ्यांचे भाग्य पालटणार नाही.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मोबाईल : ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■


# साखर उद्योग : ३ जी ते ८ जी

**[ शेतकरी हाच सहकारी साखर कारखान्याचा मालक आहे, अशा भूलथापा त्याला कितीही मारल्या तरी त्याचा सहकारावरचा विश्वास आता उडत चालला आहे. आता सहकार महर्षी आणि सरकार या दोन्हींच्या जोखडातून सुटायचे असेल, तर शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचाच आधार आहे. सध्या साखर कारखाने ३जी वरून सरळ ८जीवर नेले तरच आपण '२जी स्पेक्ट्रम'मधून काहीतरी शिकलो असे म्हणता येईल. ]**

साखर उद्योग सहकाराच्या आणि सरकारच्या जोखडातून मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. तरीही दोन्हीही ठिकाणी त्याची मुक्ती लांबवली जात आहे. आपल्या बगलबच्च्यांना जगवण्यासाठी सरकार वारंवार सहकाराच्या जाळ्याचा उपयोग करीत आहे. अवसायानात निघालेल्या साखर कारखान्यांनाही थकहमी देण्याचा प्रकार सरकारने वारंवार केलेला आहे. दरवर्षी ६०० ते १००० कोटी अशाप्रकारे थकहमीच्या पोटी साखर कारखान्यांना देऊन सहकारात असलेले राजकारणी जो भ्रष्टाचार करतात किंवा अनागोंदी कारभार आणि अकार्यक्षमतेमुळे साखर कारखान्यांना जी तूट येते ती भरून काढण्यासाठी सरकार त्यात पैसे ओतते आणि कारखाने पर्यायाने आपले बगलबच्चे जगवण्याचा प्रयत्न करीत आहेत. सहकार जगला तर शेतकरी जगेल, असे गोंडस नाव त्याला दिले जाते, मात्र ऊस उत्पादक देशोधडीला लागत आहेत आणि सरकारची ही मदत जर थांबली, तर त्यावर मजा मारणाऱ्या राजकारण्यांचेही काही खरे नाही, आज सहकार सम्राट, साखर सम्राट, शिक्षण सम्राट हे पूर्वीच्या काळी राजकारण्यांच्या कर्तृत्वाचे बडेजाव मिरवणारे शब्द आज त्यांनाच हिणवण्यासाठी वापरले जात आहेत. कुणालाही वरील उपाधी दिली तो एकतर सरकारी पैशांवर जगतो आहे किंवा भ्रष्ट आहे, असे उघडउघड बोलले जाते. साखर कारखानदारीमध्ये झपाट्याने बदल होतात. हे बदल केवळ सरकार होऊ देऊ इच्छित नाही, म्हणून रेंगाळत पडलेले आहेत, नसता साखर कारखानदारी, मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे.

पूर्वीच्या काळी विहिरीच्या पाण्यावर गावातील एखाद्या शेतकऱ्याकडेच उसाचा मळा असायचा. दोन-पाच गावांत मिळून एखादे गुऱ्हाळ चालायचे आणि कुटीरोद्योगासारखी गुळनिर्मिती हा छोटा उद्योग होता. त्यानंतर खांडसरी तयार करण्यासाठी थोडे अधिक भांडवल आणि यंत्रसामग्री वापरून कच्ची साखर तयार करण्याचा उद्योग सुरू झाला. गुऱ्हाळे हे एका अर्थाने सध्या २जी स्पेक्ट्रममुळे लोकांच्या मनात जी तंत्रज्ञानाच्या पिढ्या ही संकल्पना निर्माण झाली आहे, त्यातील पहिली पिढी असे म्हणता येईल. खांडसरी उद्योगाची दुसरी पिढी.

आशिया खंडातील पहिला साखर कारखाना नगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे विखे पाटलांनी सुरू केला. ग्रामीण भागात भांडवलाची वानवा. शेतीत भांडवल गुंतवायला कोणीही तयार नाही, तर शेतीवर आधारित उद्योगांत भांडवल गुंतवणूक करणे ही मोठी दूरची गोष्ट. त्यासाठी सहकारक्षेत्राची सुरुवात साखर कारखानदारीने झाली. शेतकऱ्यांनी स्वत: शेअर्स विकत घेऊन काही भांडवल उभारावे व सरकारने त्यासाठी मोठी रक्कम कर्जाऊ द्यावी, अशा पद्धतीने ही साखर कारखानदारी सुरू झाली. नंतरच्या चाळीस वर्षांत साखर कारखाना सुरू करायचा आणि शेतकऱ्यांकडून भांडवल उभे करणे, सरकारकडून पैसे मिळवणे तर ते फक्त राजकारणात असलेल्या व्यक्तिंनाच शक्य होते. सहकारी साखर कारखानदारी आणि राजकारण हे येथूनच हातात हात घालून आले. सहकाराचे हे चिन्हच आहे. पुढे मात्र जसजशी ही साखर कारखानदारी फोफावली, तसतसे शेतकरी आणि कारखानदारी हे दुय्यम झाले. त्यातील राजकारणच जास्त मोठ्या प्रमाणावर खेळले गेले. काही वेळा तर उसाचे क्षेत्र नसतानाही आपली आमदारकी किंवा खासदारकी गेली तर पुढे काय करायचे? याची तरतूद अगोदरपासूनच करायची म्हणून तालुक्या तालुक्यात कारखाने उभे राहिले. उसाची उपलब्धता याही पेक्षा प्रत्येक आमदाराचा किंवा खासदाराचा आपल्या मतदारसंघात कारखाना हेच त्याचे निकष ठरले. किंवा त्या उलटही साखर कारखाना उभारावा आणि त्याच्या जोरावर मतदारसंघातून निवडून यावे असेही झालेले आहे. ही साखर कारखानदारीची तिसरी पिढी म्हणजे ३जी. या कारखानदारीनेच पुढे आणखी सुधारणा करून मद्यनिर्मिती, वीजनिर्मिती, कागदनिर्मिती असे जोडधंदेही सुरू केले. मूळच्या साखर कारखान्यातून वेगळ्या काढलेल्या भांडवलाने हे उद्योग सुरू झाले. परंतु त्यातील एक पैसाही शेतकऱ्यांपर्यंत गेला नाही. शेतकऱ्यांना फक्त साखर उत्पादनातून मिळालेल्या पैशांचाच वाटा मिळाला. त्यांचेच पैसे वापरून उभारलेल्या भांडवलातून उभे केलेले बाकी जोडधंदे फक्त सहकारसम्राटांनाच फायदेशीर ठरले. तेच त्याचे मालकही राहिले. त्यानंतरच्या काळात दूधडेअरी चालवणे, इंजिनिअरींग, फार्मसी, मेडीकल कॉलेज काढणे असे उद्योगही झाले. मूळात ३०-४० वर्षांपूर्वी उभ्या राहिलेल्या साखर



ज्ञानेश्वर शेलार

कारखान्यांमध्ये कुठलेही नवीन तंत्रज्ञान आले नाही. त्यांना मिळालेल्या जोडधंद्यामुळे याला आपण ४ जी साखर कारखाने असे म्हणायला हरकत नाही.

गेल्या चार-पाच वर्षांमध्ये मात्र झपाट्याने साखर कारखाने अवसायानात निघायला लागले आहेत. मतदार संघातून खासदार, आमदार या पदावर असताना जमा केलेली पूंजी आणि सहकारी साखर कारखान्यातील मारलेला हात यातून याच राजकारणी लोकांनी आता कारखान्यांची पाचवी पिढी उभी केली आहे. त्यालाच आपण खासगी साखर कारखाने असे म्हणतो. जी हा शब्द खरेतर तंत्रज्ञानासाठी वापरला जातो. साखर कारखान्यांच्या बाबतीत मात्र केवळ तंत्रज्ञान नव्हे तर त्यांच्या उभारणीसाठी भांडवल कोठून आले हाही महत्त्वाचा मुद्दा असल्याने शेतकऱ्यांकडून घेतलेले भागभांडवल आणि उभारणी करणाऱ्या सहकार सम्राटांनी आपले टाकलेले पैसे असेही परिमाण याला देता येईल. हे कारखाने म्हणूनच ५जी असे तंत्रज्ञान आणि भांडवलाच्या दृष्टीने ओळखता येतील.

सध्या महाराष्ट्रामध्ये एकूण १६३ साखर कारखाने आहेत. त्यातील सहकारी साखर कारखाने १२३ व खासगी ४० आहेत. राज्यात एकूण उसाचे क्षेत्र १० लाख २२ हजार हेक्टर आहे. हा राज्यातील एक मोठा उद्योग आहे. बाकीच्या शेती उत्पादनात प्रक्रिया उद्योगांना फारसे महत्त्व स्वातंत्र्याच्या साठ वर्षांनंतरही देण्यात आलेले नाही. कापूस शेतकरी पिकवित असले तरी, रुईच्या गाठी बनविण्यापर्यंतच प्रक्रिया त्यांच्या हातात असते. बाकी सर्व कापड उद्योग हा पूर्णपणे खासगी उद्योगात आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा कारखानदारी म्हणून संबंध येईल, असा फक्त साखर उद्योग आहे. तीन वर्षांपूर्वी पूर्णपणे खासगी म्हणजे शेतकऱ्यांचेसुद्धा भागभांडवल नसलेले साखर कारखाने बजाज, अंबानी यांनी सुरू करण्याचे  प्रयत्न केले. त्याला आपल्याच कृषीमंत्र्यांनी विरोध केल्याने खरोखरचे आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असे ६जी साखर कारखाने अजून महाराष्ट्राने पाहिलेले नाहीत. कदाचित पुढेही पाच-दहा वर्षे तरी ते महाराष्ट्रात येण्याची फारशी शक्यत नाही.

भविष्यकाळात मात्र साखर कारखानदारीत फार मोठ्या प्रमाणावर बदल घडून येऊ शकतात. ऊस हा कच्चा माल वजनदार असल्याने साखर कारखाने हे ऊसउत्पादक क्षेत्रातच काढले जातात. उसाचे व साखरेचे प्रमाण जर काढले तर ते दहास एक असे आहे. १०० किलो उसाचे गाळप केले तर त्यापासून दहा ते अकरा किलो साखर तयार होते, त्यालाच आपण साखरेचा उतारा असे म्हणतो अशाप्रकारे पक्का माल तयार करताना कारखान्यापर्यंत दहा पट वजनाचा कच्चा माल न्यावा लागतो. वाहतूक ही मोठी खर्चाची बाब झाली आहे, यावर उपाय म्हणून शेतातच उसाचा रस काढून टँकरने कारखान्यापर्यंत नेला तर जवळजवळ १/३ वजन घटवने शक्य आहे. तेवढ्याच प्रमाणात वाहतुकीचा खर्चही घटू शकतो. सध्याचे विजेचे दर, इंधनतेलाचे दर ही मोठी यातील अडचण आहे. साखर कारखानदारी मुळातच इंधन तयार करणारीही कारखानदारी आहे. हा प्रश्न इथेनॉलच्या निर्मितीतून सुटू शकतो. त्यालाही सरकार परवानगी देत नाही. तसेच शेतातच ऊसाचा रस काढण्याचे तंत्रज्ञान देशात येणे हेही महत्त्वाचे आहे. ही साखर कारखानदारी ७जी म्हणून विकसित होऊ शकते. असा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

याही पेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाने अवाढव्य साखर कारखाने कोट्यवधींचे भांडवल, वाहतूक, मजूर, मशीनरी यांचे अवाढव्य कारभार उभारण्यापेक्षा शेतातच साखर तयार करता येईल आणि प्रत्येक शेतकरी आपापल्या शेतात, आपापली साखर तयार करील, अशी छोटी यंत्रे लवकरच बाजारात येऊ घातली आहेत. या यंत्रांच्या साहाय्याने प्रत्येक शेतकरी सध्या ज्या प्रमाणे गव्हाच्या कापणीसाठी हार्वेस्टर आणतात तसेच उसाच्या तोडणीपासून तर साखर निर्मितीपर्यंतचे सर्व सोपस्कार शेतातच पार पाडणारे यंत्रही निघू शकेल. या बदललाला ८जी असे म्हणता येईल.

अशा प्रकारचे बदल होत असतानाच आपण मात्र अजूनही जुन्याच पद्धतीने अवसायानात निघालेले साखर कारखाने कोणीतरी यशस्वी सहकार सम्राटाने विकत घेऊन चालवण्याचे खटाटोप करीत आहोत. राजकारण्यांना यामध्ये मोठा फायदा आहे. ८जी सारखे साखरेचे उत्पादन शेतातच होऊ लागले, तर शेतकरी सहकारातून आणि सरकारी जोखडातून पूर्णपणे मुक्त होऊ शकतो. हेच सरकारला होऊ द्यायचे नाही. वारंवार आजारी साखर कारखान्यांमध्ये पैसे ओतणे चालूच आहे. आपलीआपली साखर तयार करून ज्वारी, बाजरी, गहू ज्याप्रमाणे शेतकरी बाजारात विकतात, त्याचप्रमाणे साखरही विकेल. त्याचबरोबर उसापासून इतर जी वेगवेगळी १४-१५ उत्पादने मिळतात त्यांच्यासाठी वेगवेगळी यंत्रसामग्री तयार करणे शक्य होईल. किंवा तसे नसेल तर ज्या उत्पादनासाठी मोठी कारखानदारी उभारणे आवश्यक आहे. तेवढीच उभारली जाईल. उसाच्याही वेगवेगळ्या उत्पादनांसाठी वेगवेगळ्या जाती शोधणे व विकसित करणे भविष्यकाळात होऊ शकते. खाण्यासाठीचे द्राक्ष वेगळे आणि वाईनसाठीचे द्राक्ष वेगळे अशी द्राक्षांची वेगवेगळी लागवड ज्या पद्धतीने केली जाते, तसेच साखर उत्पादनासाठी वेगळा, इथेनॉल, अल्कोहोलसाठी वेगळा, जनावरांच्या चाऱ्यासाठी वेगळा अशा विविध जाती भविष्यात विकसित होऊ शकतील.

आहे त्याच साखर कारखानदारीला पुन्हा पुन्हा आव्हाने देऊन त्यांच्याकडूनच भाव पदरात पाडून घेण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार रस्त्यावर यावे लागते. एवढे करूनही साखर कारखाने आपणच दिलेल्या लेखी भावाची हमी आम्ही आता तोट्यात चाललो आहोत, भाव कसे देणार म्हणून शेवटच्या हफ्त्याच्या वेळेस फसवतात. एकावर्षी २२०० रुपये भाव देतात आणि त्याच्याच पुढच्या वर्षी १५०० रुपये भाव देतात. सरकार स्वतःच शेतकऱ्यांना १५०० रुपयांच्या वरती भाव देऊ नये असे फर्मान काढते. एवढेच नव्हे तर ज्या बँकेने कारखान्यांना कर्जे दिली आहेत, तीच बँक आज मालक होऊन बसली आहे. शेतकऱ्यांना १५०० रुपयांच्या वर भाव देऊ नये अशी तंबी, शिखर बँकेने साखर कारखान्यांना दिली आहे. शेतकरी हाच सहकारी साखर कारखान्याचा मालक आहे, अशा भूलथापा त्याला कितीही मारल्या तरी त्याचा सहकारावरचा विश्वास आता उडत चालला आहे. आता सहकार महर्षी आणि सरकार या दोन्हींच्या जोखडातून सुटायचे असेल, तर शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचाच आधार आहे. सध्या साखर कारखाने ३जी वरून सरळ ८जीवर नेले तरच आपण '२जी स्पेक्ट्रम'मधून काहीतरी शिकलो असे म्हणता येईल.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# भू-संपादन बिलाचे मायाजाल

## भाग १

**खेडे आणि शहरी विस्तार योजनांच्या नावाखाली जमीन संपादन पडेल भावाने बिल्डरला विकणे आणि बिल्डरकडून गगनचुंबी भावाने 'शहरी' आणि 'खेडे' विस्तार योजनेतील लाभधारकांना विकणे हा कुठला सार्वजनिक उद्देश असू शकतो. म्हाडा, सिडको आणि हडको या योजना बनवताना संपादन करताना दिलेल्या किमती आणि योजनेतून कुणी का असेना कमावलेला पैसा यातील अंतर पाहता हा पैसा कुणाच्या खिशात जातो हे तर पाहायलाच नको.**

भारताच्या संसदेमध्ये भू-संपादन तथा पुनर्वसन आणि पुनर्वसाहत या नावाने एक बील सादर झाले आहे. या बिलासंदर्भात दोन तऱ्हांनी विचार होऊ शकतो. एक तर मुळात हाच काय पण भू-संपादनाचा कायदाच नको, कारण जगभर मान्य असलेल्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांपैकी संपत्ती धारणाच्या हक्कांवर या कायद्याने गदा आणलेली आहे. मूळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेली आणि भारताच्या सर्वोच्च संसदेने स्वीकारलेली घटना ही या अधिकाराला मान्यता देते; पण पुढे नेहरूप्रणित व्यवस्थेने या हक्कांवर घाला घातला आणि शेत जमिनीसंबंधात विविध कायदे करून शेतकऱ्याला हतबल केलेलं आहे. ऊठसूट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव घेणाऱ्या काँग्रेस आणि डाव्या पक्षांनीच डॉ. बाबासाहेबकृत घटनेवर पहिला हल्ला केला, हे मात्र लोक सोयीस्करीत्या विसरून गेलेले आहेत. उघडच आहे, असंघटीत असहाय्य, गांजलेल्या शेतकऱ्यांपेक्षा संघटीत मजूर, नोकरशहा आणि आवाज उंच करणाऱ्या भद्र लोकांच्या या देशात दुबळ्यांच्या आवाजाची दखल घेणार तरी कोण?

ते काहीही असो, घड्याळाचे काटे उलटे फिरवून इतिहास जमा झालेल्या या घटनेला आता विसरून येऊ घातलेल्या या नव्या कायद्याबाबत काय करता येईल? याचा विचार आवश्यक आहे. त्या दृष्टीने या लेखाचा प्रपंच! या बिलाचा अधिकृत मसुदा प्रकाशित झालेला आहे. त्यात नवीन कायदा का? या सदराखाली ज्या मुद्यांचा उल्लेख आहे, त्यातील दोन मुद्यांचा शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. त्यात असा उल्लेख आहे की, 'भू-संपादनाबाबत शेतकऱ्यांच्या तीव्र भावना' आणि या संपादनामुळे ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांच्या व त्या 'जमिनीवर' अवलंबून असणाऱ्या 'बाधित' कुटुंबाला येणाऱ्या अडचणींचा विचार करूनच हा कायदा करण्यात येत आहे; पण संपूर्ण मसुदा वाचल्यावर शेतकऱ्यांच्या हिताचा आणि अडचणींचा विचार साकल्याने केला आहे असे जाणवत नाही. मात्र काहीही करून अनेक आश्वासनांच्या भूलभूलैय्यात त्याला अडकवून त्याच्या जन्माची रोजी रोटी कशी हिरावून घेता येईल याचाच विचार केला गेला आहे. असे प्रकर्षाने जाणवते. या मसुद्यात ठिकठिकाणी 'सार्वजनिक हीत/मूलभूत सुविधा' इन्फ्रास्ट्रक्चरल विकास आणि औद्योगिकीकरण तथा शहर व खेड्यांचा 'विस्तार' या नावाखाली खासगी उद्योजक तथा सिडको, हडको, म्हाडाच्या नावाने बिल्डर आणि बाबू लोकांची खिसे भरणे हाच उद्देश आहे. हा तर आता पावेतोचा अनुभव आहे. उद्योगधंद्यांसाठी ठिकठिकाणी एमआयडीसीच्या नावाखाली शेतजमिनी संपादित करण्यात आल्या. त्या एमआयडीसी ओस पडलेल्या आहेत. काही ठिकाणी तर लोकांनी चक्क बंगले बांधले आहेत. तरीही एमआयडीसीच्या नवनवीन योजना तयार करण्याचं काम चालूच आहे. यात आता भर पडते आहे ती सेझची. या सेझमधून खिसे कुणाचे गरम झाले हे जनतेला माहीत आहेच. यातून शेतकऱ्यांच्या पदरात पडलं तरी काय? या बिलाच्या प्रस्तावनेतच श्री. जयराम रमेश यांनी स्पष्ट केलेलं आहे की, 'देशातील मूलभूत सेवांचा जलद विकास आवश्यक आहे. औद्योगिकीकरण, विशेषतः निर्मिती प्रक्रियेतील उद्योगांचा विकासही जलद होणे आवश्यक आहे.'' अशा परिस्थितीत 'शहरीकरण हे तर टाळता येण्यासारखं नाही.' या प्रस्तावनेतील 'औद्योगिक विकास, मूलभूत सोयी आणि जलद शहरीकरण' या नावाखाली या कायद्याने लूटमारीची व्यवस्थाच केलेली आहे आणि सरकारी मायाजाल पसरलेलं आहे. भू-संपादनाच्या जुन्या कायद्यापेक्षा या कायद्याने



ॲड. अनंत उमरीकर

**मूळ भूसंपादनातील विधेयकातील तरतूदी जशास तशा सदर चौकटीत दिल्या आहेत.**

## FOREWORD

Infrastructure across the country must expand rapidly. Industrialisation, especially based on manufacturing has also to accelerate. Urbanisation is inevitable. Land is an essential requirement for all these processes.

Government also needs to acquire land for a variety of public purposes.

## Scope of LARR, 2011

2. Government acquires land with the ultimate purpose to transfer it for the use of private companies for stated public purpose (including PPP projects but other than national highway projects)

3. Government acquires land for immediate and declared use by private companies for public purpose

## Definition of Public Purpose

2. Infrastructure and Industry: where benefits largely accrue to the general public;

4. Village or urban sites: planned development - residential purpose for the poor and educational and health schemes;

5. Land for private companies for public purpose;

## • Livelihood Losers:

1. A family whose livelihood is primarily dependent on the land being acquired
2. May or may not own property

**(c) the expression “Affected Family” means-**

(i) a family whose land or other immovable property has been acquired or which is involuntarily and permanently displaced from their land or immovable property;

(ii) a landless family, which includes agriculture labourer or artisans, which has been working in the affected area and whose primary source of livelihood has been affected by land acquisition in such area;

**(n) the expression “Infrastructure Project” shall include,-**

(iii) water supply project, irrigation project, sanitation and sewerage system; or

(iv) any other public facility as may be notified in this regard by the Central Government in the Official Gazette;

पूर्वीपेक्षा अधिक किंमत मिळवून देण्याची व्यवस्था केलेली असली तरी यातील काही कलमे ही अन्यायकारक तर आहेतच; पण जुन्या कायद्यातील काही चांगल्या तरतुदी वगळून नवीन अन्यायकारक तरतुदी या कायद्यात समाविष्ट आहेत आणि मुख्य म्हणजे शेतकऱ्यांच्या जमिनी जबरी हिसकावून घेण्याचा शासनाचा हक्क अबाधित ठेवला आहे. त्याही पलीकडे शेतजमिनीला बाजारभावाप्रमाणे योग्य किंमत मिळणयच्या तरतूदीही या कायद्यात नाहीत ही या कायद्याची काळी बाजू आहे. तेव्हा मूळातून हा कायदा समजून घेण्याचा या लेखाचा प्रपंच आहे.

बिलाच्या कलम १/ए मध्ये कायद्याची व्याप्ती नमूद केलेली आहे. त्याप्रमाणे, एक : जेव्हा संबंधित सरकार जमीन स्वतःच्या वापरासाठी संपादू इच्छिते; दोन : जेव्हा सरकार खासगी कंपनीच्या सार्वजनिक उद्देशासाठी संपादन करू इच्छिते किंवा शासन आणि खासगी कंपनीच्या संयुक्त योजनांसाठी जमीन संपादू इच्छिते आणि तीन : सरकार जाहीर उद्देशासाठी सार्वजनिक हितार्थ खासगी कंपनीकरिता त्वरित संपादन करू इच्छिते. यातील दुसऱ्या आणि तिसऱ्या पोट कलमाखाली म्हणजे कलम १/ए (बी) आणि १/ए (सी) खाली जमीन संपादू इच्छिते. त्यावेळी एका अटीची पूर्तता करावी लागते. ती म्हणजे जी जमीन संपादन करणे आहे त्यामुळे जी कुटुंब बाधीत होणार आहेत त्यांच्यापैकी ८० टक्के लोकांनी या संपादनास मान्यता दिली पाहिजे.

वरवर ही कलमे निरागस वाटतात; पण मूळात ही फसवी आहेत

आणि यातून येनकेन प्रकारेण जमीन संपादन करता आलीच पाहिजे हा यातील छुपा उद्देश आहे. यातील ग्यानबाची मेख आहे ती या बिलातील प्रस्तावनेपासूनच सुरू होते. त्यात असं म्हटलेलं आहे, की 'जलद औद्योगिकीकरण' आणि 'शहरीकरण' आणि 'सार्वजनिक हितार्थ' जमिनीची आवश्यकता आहे. वरवर साळसूद वाटणारे हे उद्देश म्हणजे प्रत्यक्षात कात्रजचा घाट आहेत. त्यासाठी आपल्याला सार्वजनिक हिताच्या व्याख्येकडे वळावे लागेल.

कलम २ (वाय) मध्ये ही व्याख्या केली आहे. त्यातील २ (वाय) (i) मध्ये देशाची सुरक्षा आणि अंतर्गत सुरक्षा म्हणजे सैनिक, नाविक आणि हवाई दलांच्या तथा पोलिस यांच्या गरजा. या बाबतीत आक्षेप असण्याचं कारण नाही.

कलम २ (वाय) मधील (i), (ii), (iii) ही कलमे खरी धोकादायक आहेत. कलम २ (वाय) (ii) मध्ये मूलभूत सुविधा औद्योगिकीकरण आणि शहरांचे विस्तारीकरण यांचा अंतर्भाव समावेश आहे आणि २ (वाय) (iii) मध्ये शहरे आणि खेडी यांचे विस्तारीकरण यांचा समावेश आहे आणि २ (वाय) (iv) मध्ये तर सरकारला व्यापक अधिकार दिलेले आहेत. कुठल्याही सार्वजनिक हिताच्या पूर्तीसाठी, तसेच खासगी कंपनीकरिता जमीन संपादणी. या चौथ्या उप पोट कलमामधल्या खासगी कंपनीबाबत ८० टक्के बाधित कुटुंबाची मान्यता ही अट आहेच. यातील एकेक मुद्याचा विचार करुया.

मूलभूत सुविधा इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टची व्याख्या कलम २ (एन) मध्ये केली आहे. त्यातील २ (एन) (i) आणि (iii) या पोट कलमांबद्दल आक्षेप असण्याचं कारण नाही. कारण त्यांचा संबंध वीजपुरवठा आणि पाणी पुरवठा, धरणे आदी बाबींशी आहे. आक्षेप आहे तो २ (एन) (ii) आणि (iv) बद्दल. २ (एन) (ii) मध्ये रस्ते, महामार्ग, संरक्षण, पूलबांधणी, विमानतळ, बंदरे, रेल्वे, खाणी, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, टुरिझम, वाहतूक, अंतरिक्ष कार्यक्रम यांचा उल्लेख आहे. त्याहीबद्दल आक्षेप असण्याचं कारण नाही; पण पुढे शासन जाहीर करील अशा उत्पन्न गटातील लोकांसाठी जमीन संपादनी मात्र निश्चितच आक्षेपार्ह आहे. या तरतुदीद्वारे या बिलाने शासनाच्या हाती एक कोरा चेक दिला आहे. उत्तरप्रदेश सरकारने नोएडा प्रकरणी आणि महाराष्ट्र सरकारने 'आदर्श' प्रकरणी काय केलं, अशी शेकड्यांनी उदाहरणं डोळ्यांसमोर असताना अशी तरतूद ही निश्चित धोकादायक आहे.

कलम २ (वाय) (iv) मध्ये सामान्य लोकांच्या हितासाठी (ज्यात खासगी कंपन्यांचाही समावेश आहे) हा आणखी एक कोरा चेक आहे. या बिलात सार्वजनिक हितासाठी म्हणजे काय हे ठरवण्याचा अधिकार परत शासनाकडेच राहणार आहे. या अधिकाराचा वापर करून शासन आणि खासगी कंपनी साटेलोटे करून जमीन संपादन करू शकतात.

खासगी कंपनीला 'सार्वजनिक हितासाठी' जमीन संपादन करून देण्याकरिता ८० टक्के लोकांची मान्यता आवश्यक आहे, अशी वर वर साळसूद आणि शेतकरी हिताची वाटणारी तरतूद मूळात भयानक आहे. ८० टक्के लोक या शब्द प्रयोगात बाधीत कुटुंबाचा समावेश आहे, कलम २ (सी)मध्ये या बाधीत कुटुंबाची व्याख्या केलेली आहे. त्यात ज्यांना 'बाधीत कुटुंब म्हटले आहे त्यांचं स्पष्टीकरण त्याच कलमाच्या २ (सी) (ii) मध्ये आहे. त्यात असं म्हटलं आहे, की (बाधीत कुटुंब) म्हणजे असं कुटुंब ज्यात शेतमजूर आणि कारागीर यांचा समावेश असून जे बाधीत क्षेत्रात काम करीत असून या भू-संपादनामुळे ज्यांच्या रोजी रोटीवर परिणाम होणार आहे! या व्याख्येतील ८० टक्के लोकांची संमती याला आपला आक्षेप आहे.

या आक्षेपाचा विचार करताना परत कायद्याच्या 'व्याप्ती'मधील मुद्दा क्र. i व iii कडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुद्दा क्र. ii प्रमाणे जेव्हा एखाद्या सार्वजनिक उद्देशासाठी जमीन संपादन करून शासनाला खासगी कंपनीकडे त्या उद्देशासाठी हस्तांतरीत करायची असते, तेव्हा आणि मुद्दा क्र. iii प्रमाणे 'जेव्हा सार्वजनिक हितासाठी त्वरीत जमीन संपादित करून ती खासगी कंपनीकडे हस्तांतरीत करायची असते तेव्हा' अशा दोन प्रसंगी ८० टक्के बाधीत कुटुंबांची मान्यता आवश्यक असते. बाधीत कुटुंबांच्या व्याख्येत ज्यांची स्थावर मिळकत संपादित होणार असते ते आणि त्या परिसरात राहून शेतावर उपजिविका अवलंबून असणारे शेतमजूर आणि कारागीर कुटुंब या दोघांचाही समावेश आहे. या ठिकाणी गोची होणार आहे ती अशी की, शेतमजूर आणि कारागीर यांना सर्व प्रकारच्या सोयी सवलती मिळणार असून नवीन ठिकाणी निवासास जाण्याकरिता नगदी ५०,००० रुपयेही मिळणार आहेत. शिवाय इतरही आर्थिक लाभ होणार आहेत. त्याहीशिवाय त्यांच्या कुटुंबापैकी एकाला नोकरी अथवा अर्थलाभ होणार असल्यामुळे भू-संपादनाला त्यांचा आक्षेप असणार नाही. उलट त्यांना या भू-संपादनामुळे नगदी रक्कम, राहण्यास सोयी सवलती आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने त्यांची संमती मिळू शकते. मात्र प्रत्यक्षात ज्यांची जमीन जाणार असते त्यांना हे भू-संपादन मान्य असणे कठीणच असते आणि जमीन धारकांची संख्या शेतमजूर, कारागीर यांच्या कुटुंबापेक्षा किती तरी पटींत कमी असल्यामुळे त्यांच्या मान्यतेला फारसा अर्थ राहणार नाही आणि केवळ शेतमजूर, कारागीर यांच्या संमतीनेच भू-संपादनासाठी आवश्यक ती ८० टक्के मान्यता सहज मिळवली जाऊ शकते. यासाठी ज्यांची स्थावर जमीन संपादित होणार आहे, अशाच शेतमालकांपैकी ८० टक्के लोकांची मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे या बिलात बदल व्हायला हवा. नसता शासन शेतकऱ्यांवर घाला घालायला टपून आहेच. शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात दुफळी करण्याचा आणखी एक प्रयत्न म्हणूनही या तरतूदीकडे पाहायला पाहिजे.

सार्वजनिक हिताची व्याख्या करताना कलम २ (वाय) (ii) मध्ये शहरीकरणाचे- अर्बनायझेशन- प्रॉजेक्टस् आणि २ (वाय) (iii) मध्ये खेडी आणि शहरांसाठी जागा उपलब्ध करून देणे हे सार्वजनिक हित ठरवले आहे.

खेडे आणि शहरी विस्तार योजनांच्या नावाखाली जमीन संपादन पडेल भावाने बिल्डरला विकणे आणि बिल्डरकडून गगनचुंबी भावाने 'शहरी' आणि 'खेडे' विस्तार योजनेतील लाभधारकांना विकणे हा कुठला सार्वजनिक उद्देश असू शकतो. म्हाडा, सिडको आणि हडको या योजना बनवताना संपादन करताना दिलेल्या किमती आणि योजनेतून कुणी का असेना कमावलेला पैसा यातील अंतर पाहता हा पैसा कुणाच्या खिशात जातो हे तर पाहायलाच नको. आपल्यासमोर हजारोंनी उदाहरणे आहेत. खेड्याच्या आणि शहराच्या विस्ताराच्या योजना बनवायच्याच असतील तर शासनाने एक व्यापक विस्तारीकरणाची योजना बनवावी. अशा योजनांचा प्रारूप आराखडा लोकांच्या माहितीसाठी प्रकाशित करावा. त्यावर लोकांच्या सूचना आणि आक्षेप मागवावेत. त्यानंतर तयार होणारा प्रारूप आराखडा अंतिम स्वरूपात प्रकाशित करावा. त्या आराखड्यात ज्यांच्या जमिनी येतील त्यांना त्यांच्या जमिनीच्या अकृषक वापरासाठी



त्वरित परवानगी द्यावी आणि त्यांना त्यांना आपापल्या विकसित जमिनी आराखड्यातील योजनेअंतर्गत प्लॉट पाडून विकण्याची परवानगी द्यावी किंवा ज्यांना प्लॉटींग करून जमिनीची विक्री करणे त्रासदायक वाटत असेल त्यांना खासगी कराराद्वारे विक्रीची विल्हेवाट लावायची परवानगी द्यावी मात्र कुठल्याही परिस्थितीत अशा योजनात 'लवासा' किंवा 'हिरानंदानी' योजना घुसणार नाहीत याची काळजी घ्यावी. ज्यामुळे ज्या सर्व मध्यस्थांची हकालपट्टी होईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची योग्य किंमत मिळू शकेल आणि तिकडे घरे बांधू इच्छिणाऱ्यांना प्लॉट योग्य किमतीत मिळू शकेल. यामुळे शहर आणि खेड्यांच्या विस्ताराचा मार्ग प्रशस्त होऊ शकेल. त्यासाठी भू-संपादन करणाऱ्या योजना आखून मध्यस्थांची घरे भरण्याची सोय करण्याचं काही कारण नाही.

जी कथा विस्तारीकरणाची तीच कथा औद्योगिकीकरणाची. उद्योगधंदा सुरू करण्याची इच्छा असलेल्या उद्योजकाने सरळ संबंधित शेतकऱ्याशी व्यवहार करावा. त्यात शासनाच्या मध्यस्थीची आवश्यकता नाही. या बाबतीत उद्योजकांनी आतापावेतो प्रामाणिकपणा दाखवला आहे, असं सर्वच प्रकरणांत म्हणता येणार नाही. शासनाच्या सवलती पदरात पाडून घ्यायच्या, स्वस्तात जमिनी शासनातर्फे मिळवायच्या, काही वर्षे उद्योग सुरू केल्याचं नाटक करायचं आणि काही वर्षांनी त्याच जमिनी चढ्या भावाने विकून बक्कळ कमाई करायची. तो पावेतो नवीन योजना तयार होतात. तिथे प्लॉट टाकायचा हा अनेक उद्योजकांनी चालवलेला धंदा आहे! औरंगाबादच्या अनेक एमआयडीसींमध्ये शेकड्यांनी उद्योग बंद पडले आहेत. तरीही शासनाने एका मोठ्या उद्योजकाकडे बीड बायपासवर दहा हजार एकरांचा सेझ बनवण्याची योजना आखली होती. शेतकरी संघटनेच्या विरोधामुळे ती योजना हाणून पाडली. असा कोणता उद्योग त्यांना करावयाचा होता ज्यासाठी गावच्या गावं उठवून दहा हजार एकर जमीन संपादन करायची होती? औरंगाबाद शहर तिथपर्यंत येणारच आहे तेव्हा त्याच कवडीमोलानं घेऊ घातलेल्या जमिनीला सोन्याचा भाव येणार होता हे सांगायला कुणा तज्ज्ञाची आवश्यकता नव्हती. शेतकरी संघटनेनं हा डाव ओळखला आणि या योजनेला कडाडून विरोध केला. डाव हाणून पाडला.

'मूलभूत सुविधा'च्या व्याख्येत वेळोवेळी ते राज्य सरकार ठरविल अशा उत्पन्न गटातील लोकांसाठी भू-संपादन करणे याचाही समावेश करताना संबंधित सरकार जाहीर करील, अशा उत्पन्न गटासाठी अशी मेख मारून ठेवली आहे. त्यामुळे उद्या चालून राजपत्रित अधिकाऱ्यासाठी खास गृहनिर्माण योजना आखून जमीन संपादन करण्याची सोय आपोआपच करून ठेवण्यात आली आहे आणि कुणासाठी तरी गृहनिर्माण योजना तयार करणे ही मूलभूत सुविधा असू शकते का? अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा आहेत हे मान्य करूनही कुठल्यातरी उत्पन्न गटासाठी वस्त्र पुरवठा करण्याची जबाबदारी शासन पार पाडीत नाही. अन्नाची गरज भागवण्याच्या नावाखाली जबरी लेव्ही वसुली किंवा पडेल भाव मिळतील अशी व्यवस्था करणे या मार्गांनी शासनाने आतापर्यंत शेतकऱ्यांना लुटलेलं आहेच. आता निवारा या नावाखाली जमिनी हिसकावून घेण्याच्या योजना बनवण्यात येत आहेत, या तरतुदीद्वारे.

एकूण हा कायदा करताना शेतकऱ्याला भूलभूलैय्यात अडकवून त्याची जमीन हिसकावून घेण्याचा मतलब स्पष्ट दिसतो आहे. सरकारचा हेतू फारच प्रामाणिक असले तर सरकारने 'सार्वजनिक हीत', 'मूलभूत सुविधा' यांच्या व्याख्या बदलाव्या आणि त्यातून खासगी उद्योजकांना वगळून टाकणं, शहर आणि ग्रामीण विस्ताराच्या योजना या कायद्याच्या अखत्यारीच्या बाहेर ठेवणं आवश्यक आहे. तसेच ८० टक्केच्या व्याख्येतून बाधितांना वगळून केवळ जमीन मालिकांच्याच संमतीची आवश्यकता नमूद करावी. सध्याच्या तरतुदीमुळे ग्रामीणांमध्ये मजूर आणि शेतकरी यांच्यामधील भेद करण्याची कुटीलनीती स्पष्ट दिसते आहे. तेव्हा या तरतुदींचा फेरविचार आवश्यक आहे.

**क्रमशः**

अॅड. अनंत उमरीकर
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मो. ९८९०३९६६५७

# संसदेची प्रतिष्ठा राखण्याचा मार्ग : नवा जनादेश

**[ आजच्या हालचाली लक्षात घेता हे पत्र तुमच्या पर्यंत पोचण्याच्या आधीच सरकार व आंदोलक यांच्यात तडजोड झालेली असेल. सरकारची केविलवाणी अवस्था बघता होणारी तडजोड या पत्रात उपस्थित केलेले प्रश्न अधोरेखित करणारीच असणार आहे. मुख्य म्हणजे तडजोड कशीही झाली तरी चोर आणि ठग हा जनभावनेचा तुमच्या पाठीवर बसलेला शिक्का त्यातून नक्कीच पुसला जाणार नाही. तो पुसण्यासाठी तुमच्याकडे जनतेसमोर जाण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. ]**

## माननीय संसद सदस्याना जाहीर विनंतीपत्र

**माननीय महोदया/महोदय**

तुम्हाला विकत आणि फुकट सल्ला देणारांची कमी नाही हे मी जाणतो. त्यात भर घालण्यासाठी हे पत्र लिहीत नाही. मी खेड्यात राहणारा सामान्य नागरिक आणि सामान्य मतदार आहे. त्याच्या मनात नेमके काय चालले आहे हे तुमच्यापर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न आहे. निरर्थक कागदाचा तुकडा म्हणून हे पत्र बाजूला सारू नका. संसदेत अनेक निरर्थक कागदांवरून कर्तव्य म्हणून तुम्हाला नजर फिरवावी लागते, तशी का होईना पण हे पत्र तुम्ही नजरे खालून घाला. नागरिक आणि तुमच्यात तुटत चाललेला संवाद पुन्हा सुरू करण्याचा हा नागरी प्रयत्न समजा. श्री. अण्णा हजारे यांया अटकेनंतर माननीय पंतप्रधानांनी केलेले निवेदन आणि त्यावर आपण केलेली चर्चा मी लक्षपूर्वक ऐकली आहे. समजून घेण्याचा माझ्यापरीने प्रयत्नही केला आहे. तुमची भाषा, तुमचे शब्द कळत होते; पण त्या शब्दांचा अपेक्षित परिणाम माझ्यावर होत नव्हता. तुम्ही अप्रामाणिक आहात, चोर आहात, ठग आहात अशी माझी अजिबात भावना नाही. काही प्रतिनिधी तसे असतीलही, नव्हे आहेतच आणि तसे ते सर्वच ठिकाणी आहेत. अगदी आजच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलानास समर्थन देणाऱ्या सेलेब्रिटींमध्ये असे लोक सापडतील. तुमच्याबाबत माझ्या मनात यत्किंचितही अनादर नसताना ही तुमचे शब्द मनाला भिडत नव्हते.

आता तुम्हीच विचार करा की ज्या लोकांचा तुमच्यावरचा विश्वास संपूर्णपणे उडाला आहे, तुम्ही चोर, ठग अशी ज्यांच्या मनात भावना निर्माण झाली किंवा तशी ती करून देण्यात आली आहे त्यांच्या तर कानापर्यंतही तुमचे शब्द पोचणार नाहीत. पोचले तरी ते तुमचे शब्द कानात शिरू नयेत म्हणून बोळे घालून घेतील अशा मन:स्थितीत ते आहेत. लोकशाही व्यवस्थेतील जनतेच्या प्रतिनिधित्वाची अभिव्यक्ती म्हणजे संसद, संसद सर्वोच्च आहे, कायदे करण्याचा अधिकार संसदेचा आहे हे ज्यांना मान्य आहे त्याना सांगून उपयोग नाही आणि ज्याना सांगायला पाहिजे ते तुमचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. आंदोलनाच्या नेत्यांनी संसदेच्या स्थायी समितीसमोर त्यांचा मसुदा मांडल्या नंतर संसदीय समिती लोकपाल बिलाच्या मूळ मसुद्यात काय सुधारणा करून कोणता मसुदा संसदेकडे विचारार्थ पाठवितात हे पाहणे तर्क व विवेकाला धरून राहिले असते; पण गेली ४० वर्षे कायदा होण्याची वाट बघणारे आणखी ३ महीने कळ सोसू शकले नाहीत, वाट पाहू शकले नाहीत याचे कारण त्यांचा तुमच्यावर अजिबात विश्वास नाही हे आहे. खरे तर त्यानी संसदीय समितीसमोर न जाता हे खुलेआम सांगून टाकायला हवे होते. त्यांनी तसे सांगितले नाही तरी कृतीतून दाखवून दिले आहे. तात्पर्य, तुमच्या संसदेतील भाषाणांची परिणामकारकता शून्य ठरली आहे. तुम्ही तुमचा वैधानिक व नैतिक अधिकार गमावून बसल्याचे यावरून प्रतीत होते. लोकशाही व्यवस्थेला कोणताही तडा जावू नये, लोकशाही संस्थांचे पावित्र्य व प्रभुत्व टिकून राहावे आणि या संस्था जनमानसात आदरप्राप्त राहाव्यात यासाठी आधी तुम्ही आंदोलक जनतेच्या दृष्टीने गमावालेली तुमची पत, तुमचा वैधानिक व नैतिक अधिकार परत मिळविण्याची नितांत गरज आहे. मी मुद्दाम आंदोलक जनता असा उल्लेख केला आहे, कारण आंदोलक जनतेच्या भावनेशी सहमत असणारी बहुसंख्य सामान्य जनता त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही; पण परिस्थितीच अशी निर्माण झाली आहे की मेणबत्ती आणि टेंभे मिरविणाराचे मत हेच जनमत असल्याचा समज दृढ होत चालला आहे. टीव्ही न्युज चॅनेल्सवरून दिवसरात्र जे सर्वांच्या कानीकपाळी ओरडून सांगितले जात आहे ते खरे मानायचे झाले तर ११० पैकी १०० नाही तर १०० पैकी ११० लोक तुमच्या आणि एकूणच इथल्या राजकीय व्यवस्थेविरुद्ध आहेत! तुमच्या प्रतिनिधी


सुधाकर जाधव

असण्यावर मोठे प्रश्नचिन्ह लावण्यात आले आहे.

आंदोलक जनतेचे तुमच्याविषयी बनलेले मत चुकीचे असेलही, पण ज्या सार्वत्रिक व सर्वव्यापी भ्रष्टाचाराने त्रस्त होऊन त्यांचे हे मत बनले त्या परिस्थितीत यापेक्षा वेगळ मत बनने कठीण होते. सरकारी यंत्रणा कधीच आपले उद्दिष्ट गमावून बसली आहे. तिची संवेदनशीलता संपून वर्षे लोटली आहेत. सर्व सामान्यांच्या अडवणुकीचे, नाडवणुकीचे आणि पिळवणुकीचे ते साधन बनले आहे. लोकांचा आवाज कोठेच ऐकला जात नाही आणि तुमच्यापर्यंत तर तो पोचतच नाही. अशा परिस्थितीत जनतेपुढे रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहत नाही. जनतेची परिस्थिती व भावना समजून तुम्ही तत्परतेने उपाय योजना करीत राहिला असता तर तुमच्या विरोधात असा असंतोषाचा उद्रेक झालाच नसता. तुम्ही म्हणाल सरकारच्या चुकीने ही परिस्थिती उद्भवली आहे. तुमच्या म्हणण्यात तथ्य आहे; पण ज्या लोकशाही व्यवस्थेची व संसदीय व्यवस्थेची दुहाई तुम्ही आज देत आहात त्यानुसार हे सरकार तुम्हाला म्हणजे संसदेलाच जबाबदार आहे ना? सरकार भरकटल्याची जबाबदारी संसद टाळू शकत नाही. सरकारला सरळ करण्यासाठी, सरळ मार्गावर आणण्यासाठी तुम्ही गंभीरपणे प्रयत्न करीत आहात हे कधी जनतेला जाणवलेच नाही. लोकांना ऐकूयेतो तो फक्त संसदेतील अखंड आरडाओरडा आणि गोंधळ. लोकांमधील तुमची प्रतिमा डागाळली त्याला बऱ्याच अंशी तुमचे संसदेतील वर्तन कारणीभूत आहे हे विसरून कसे चालेल?

आज आंदोलक व तुम्ही याच्या कात्रीत लोकशाही व्यवस्था, संसदीयव्यवस्था सापडली आहे आणि आज हाच सर्वांसाठी मोठ्या चिंतेचा व चिंतनाचा विषय असला पाहिजे. एखादा कायदा होइल किंवा न होईल याने एरवी तसा फरक पडला नसता; पण आज तशी स्थिती नाही. आंदोलकाच्या दबावाखाली ते म्हणतील तसा कायदा केला तर संसदेच्या प्रभुत्वाला धक्का लागतो आणि त्यांचे ऐकले नाही तर लोकशाहीत लोक सर्वोच्च असताना त्यांचे ऐकले जात नाही अशी व्यापक भावना निर्माण होऊन लोकशाही व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह लागते अशा पेचात देश सापडला आहे. आज यावर तडजोड झाली तरी महिन्या-दोन महिन्यांत पुन्हा कोणत्या तरी मुद्यांवर संसदविरुद्ध लोक असा संघर्ष उभा राहील. तुम्ही आणि आंदोलक या दोहोंनी मिळून लोकशाही व्यवस्थेला अशा टोकाला आणून उभे केले आहे, की कोणत्याही पावलाने लोकशाही कमजोर होणार हे निश्चित. आज एक तृतीयांश जग लोकशाहीसाठी आसुसलेले आहे. लोकशाही आपल्या देशात यावी म्हणून त्यांची सर्वोच्च बलिदानाची तयारी दिसत आहे. आपल्याकडे मात्र लोकशाही व्यवस्थेवर प्रश्न चिन्ह लागत आहे ही गंभीर बाब आहे. यातून मार्ग काढण्यास तुम्ही देशाला जे सरकार दिले आहे ते असमर्थ असल्याचे एकापेक्षा अधिकवेळा सिद्ध झाले आहे. सिव्हिल सोसायटीचा भस्मासूर या सरकारच्या अकर्मन्यतेतून, दुबळेपणातून आणि दूरदृष्टीच्या अभावातून निर्माण झाल्याचे ५ एप्रिलपासून आता पर्यंतच्या घटनाक्रमातून सिद्ध झाले आहे. संसदेत यावर बरीच चर्चाही झाली असल्याने त्याबाबत इथे जास्त लिहिण्याची गरज नाही. सर्वाधिक भ्रष्ट अशी राजकीय स्वरुपाची शेरेबाजी टाळून एवढे मात्र नक्कीच म्हणता येईल की हे सर्वाधिक दुबळे सरकार आहे. कोणतेही निर्णय घेण्याची क्षमता त्यात नाही. आंदोलनाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी असे सरकार सत्तेत राहणे देशासाठी घातक आहे. मी कोणत्या पक्षांचे सरकार म्हणून या सरकारकडे पाहत नाही. लोकांनी निवडलेल्या तुमच्यासारख्या लोकप्रतिनिधींनी देशाला दिलेले सरकार म्हणून मी या सरकारकडे पाहतो आहे. तेव्हा सरकारवरील टीकेचा पक्षीय अर्थ कोणी काढू नये. सर्व संसद सदस्यांच्या सामुहिक शहाणपणातून कदाचित काही मार्ग निघालाही असता, पण असे सामुहिक शहाणपण आणि मुख्य म्हणजे निर्माण झालेल्या प्रश्नांची गंभीरता चर्चेत जाणवली नाही हे नम्रपणे सांगावेसे वाटते. सरकारच्या चुका म्हणून इतरांनी हात वर करायचे आणि सरकारने आपल्या चुका कशा समर्थनीय आहे हे सांगायचे. यातून कोणाचीच विश्वसनियता वाढत नाही. भविष्यात सरकारात वकील असू नयेत (आणि अर्थात सिव्हिल सोसायटीतही ते असू नयेत!) एवढाच धडा तुमच्या चर्चेतून आम्हाला मिळाला आहे! पण तुम्ही मात्र काहीच धडा घ्यायला तयार नसल्याचे चर्चेवरून दिसले. मग आजच्या परिस्थितीतून मार्ग कसा निघणार?

संसद, सरकार, संसद सदस्य, राजकीय पक्ष आणि आंदोलक या सर्वांचा सन्मान कायम राहील आणि त्याच सोबत देशातील लोकशाही व लोकशाही संस्था मजबूत होतील असा एकच मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजे नव्याने जनादेश घेण्याचा! तुमची गेलेली पत, कमी झालेला नैतिक अधिकार आणि लोकांचा विश्वास नसताना बजावलेला वैधानिक अधिकार अशा निर्माण झालेल्या वातावरणाला छेद देण्याचा तुमच्याजवळ दुसरा मार्ग नाही आणि यापेक्षा चांगला कोणताच मार्ग असूही शकत नाही! अवेळी निवडणुकीची चैन देशाला परवडणारी नाही हे खरे; पण लोकशाही व्यवस्थेचे माहात्म्य आणि पावित्र्य टिकविण्यासाठी हा खर्च नगण्य आहे. किंबहूना हा खर्च केला नाही तर देशाला न परवडणारी किंमत मोजावी लागेल. व्यक्तिगत आणि पक्षाच्या फायदा आणि तोट्याचा विचार करीत बसू नका. जनतेच्या अंगभूत शहाणपणावर तुमचा विश्वास असेल तर अधिक वेळ न दवडता जनतेचा कौल मागा. कदाचित आपल्यापैकी काही पराभूत होतील, काही पक्षांच्या जागा कमीजास्त होतील; पण आहे त्या स्थितीत चोर आणि ठग म्हणून बसण्यापेक्षा निवडणूकी नंतरची परिस्थिती तुमच्यासाठी जिंकण्याच्या किंवा हरण्याच्याही स्थितीत जास्त सन्मानजनक असेल. मला तुमच्या सन्मानाची चिंता आहे अशातला भाग नाही... मतदार म्हणून आम्हालाही दूषण दिले जात आहे. आम्ही दारू पिऊन, पैसे घेवून मत दिले आणि तुमच्यासारखे ठग निवडून दिले असे उघडपणे बोलले जात आहे. भलेही निवडणुकीत दारू-पैशांचा वापर होत असेल; पण त्याने आमचा निर्णय प्रभावित होत नाही हे मतदानाविषयी बेफिकीर असलेल्या विद्वानांना पुन्हा एकदा दाखवून द्यायचे आहे. त्यांच्याहीपेक्षा आज आंदोलनात उत्साहाने भाग घेत असलेल्या मुलामुलींचा निवडणूक प्रक्रियेबद्दलचा गैरसमज दूर होणे गरजेचे आहे. आम्ही सामान्य मतदारांनी लोकशाहीला कलंकित केले या आरोपाचे ओझे आम्ही पुढील निवडणुकीपर्यंत म्हणजे तब्बल अडीच वर्षे वाहू शकत नाही म्हणूनसुद्धा संसद विसर्जित करून नव्याने निवडणुका घेण्याचा आग्रह आहे. जनतेने रस्त्यावर उतरणे आणि माध्यमांनी सारा देश आंदोलनात सामील आहे असे एकांगी चित्र रंगविल्याच्या परिणामी जनलोकपाल विधेयकावर लोकांना संसदेच्या स्थायी समितीसमोर मत मांडण्याची संधी देणे म्हणजे वेळेचा अपव्यव असल्याचे धक्कादायक प्रतिपादन सिव्हिल सोसायटीचे नेते करू लागले आहेत. आपण म्हणजेच लोक असे बेधडक विधान ते करू लागले आहेत. लोकांनी मत पेटीतून तुम्हाला पाठिंबा दर्शविला या एक आधारावर जसे आपण काहीही करू शकतो हा भ्रम तुम्ही जसा जोपासला आहे तसाच भ्रम लोक रस्त्यावर उतरल्याने आंदोलनाच्या नेत्यांतही निर्माण



झाल्याची पुष्टी त्यांचे हे विधान करते. आंदोलन आणि प्रसिद्धी माध्यमे ही लोक समुहांचा कल दर्शविणारी प्रभावी साधने आहेत आणि त्या मर्यादेतच त्याचा गंभीरपणे विचार आणि आदर झाला पाहिजे. याच्या पलिकडे जावून विचार करणे ही अराजकाची नांदी ठरेल. लोक कसा नि काय विचार करतात हे सिव्हिल सोसायटीला आणि तुम्हाला कळण्याचा नवा जनादेश हा एकच मार्ग आहे.

सरकारने राजीनामा देऊन किंवा पंतप्रधानाचा राजीनामा घेण्याचा-मागण्याचा मोह तुम्हाला होइल; पण आता त्याने कोणाचीही विश्वासार्हता वाढणार नाही. या चर्चेच्या वेळी पंतप्रधानाची देहबोली अतिशय लाचारीची दिसत होती. राजीनाम्याचा विचार कदाचित त्यांच्या मनात घोळत असावा; पण आता त्याला खूप उशीर झाला आहे. त्याचा उलट परिणाम होण्याची शक्यता आहे. असा राजीनामा आला तर 'एक धक्का और दो संसद को...' असा माथेफिरू आवाज ऐकू येण्याचा धोका आहे. लोकशाहीची गाडी रुळावरून घसरू द्यायची नसेल तर लोकसभा विसर्जित करून नव्याने निवडणुकांना सामोरे जाण्याशिवाय दूसरा पर्याय नाही. अशी परिस्थिती पुन्हा पुन्हा निर्माण होऊ नये असे वाटत असेल तर जाता जाता जनतेला एक अधिकार देऊन जा. चुकार लोक प्रतिनिधींना परत बोलाविण्याचा वैधानिक अधिकार देऊन जा. किमान अशा अधिकारांसंबंधी कायदा बनविताना कोणीही तुमच्या वैधानिक व नैतिक अधिकारावर प्रश्न उपस्थित करणार नाहीत याची खात्री बाळगा. तुमची गेलेली पत मिळविण्याच्या दिशेने टाकलेले हे ठोस पाऊल असेल. असा अधिकार जनतेला मिळाला तर त्यात सर्वात जास्त फायदा तुमचाच होईल. तुम्हाला सरळ मार्गावर ठेवायला हा कायदा तुमची मदतच करील. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील जनआंदोलनाची ही प्रमुख मागणी आजतागायत तुम्ही पूर्ण केली नाही आणि आज त्याचा परिणाम तुमच्यासमोर आहे. तसेही आम्ही तुम्हाला निवडून देत असल्याने तुम्हाला शिक्षा करण्याचे पहिले अधिकारी आम्ही आहोत. आजपर्यंत तुम्ही आम्हाला आमच्या या अधिकारपासून वंचित ठेवले. आता सिव्हिल सोसायटीचे सिव्हिल लोक हा अधिकार आपल्या हातात घेऊ पाहत आहेत. जनतेने तुम्हाला भरभरून दिले आहे. आता जनतेचा अधिकार जनतेला बहाल करून त्यांच्या प्रतीकृतज्ञता व्यक्त करण्याची संधी वाया घालवू नका. जाता जाता ठखत्रक्षद्ध ढज ठएउअङङ चा अधिकार देऊन जा अशी विनंतीच नाही तर मागणीही आहे. खासदारांच्या घरासमोर धरणे धरण्याचे आवाहन करणाऱ्या आंदोलनांच्या नेत्यांनाही या मागणीचे महत्त्व पटेल व तुम्ही असा कायदा केला तर तेही स्वागतच करतील.

आजचे आंदोलन संपूर्णपणे शांततामय असणे ही निःसंशयपणे मोठी उपलब्धी आहे आणि याचे संपूर्ण श्रेय आंदोलनात सामील तरुणांकडे जाते; पण त्याच सोबत हेदेखील स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की, या आंदोलनाने भिन्न मत असणाऱ्यांबद्दल कमालीची असहिष्णुता निर्माण केली आहे. वेगळे मत व्यक्त करणारे म्हणजे भ्रष्ट सरकार व भ्रष्टाचाराचे समर्थक अशी सनकी भावना आंदोलकांत निर्माण झाली आहे व वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमेही अशीच एककल्ली बनली आहेत. भिन्न मताबद्दल पराकोटीचा संताप नि तिरस्कार निर्माण होणे हे लोकशाहीच्या भावितव्यासाठी घातक आहे. आज भल्या भल्यांना आपले मत व्यक्त करणे जड जात आहे. सर्व सामान्य माणूस तसाही बोलत नसतोच. तो फक्त निर्भिडपणे आपले मत मतपत्रिकेतून व्यक्त करीत आला आहे. सर्वांना आपले मत भयमुक्त मांडता येण्याचा आज एकमेव मार्ग निवडणुक हाच आहे. देश ज्या वळणावर उभा आहे तेथून पुढचा मार्ग कसा असावा हे सांगण्याची क्षमता आणि अधिकार देशातील सर्वसामान्य मतदारांचाच आहे. तेव्हा सर्व अभिनिवेशी व उद्धारकर्त्या व्यक्तींनी, पक्षांनी आणि नेत्यांनी आपापले अहंकार बाजुला ठेवून जनतेपुढे नतमस्तक होण्याची आणि त्यांच्या निर्णयाचा आदर करण्याची ही घडी आहे.


**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/


■■

# स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत

आम्ही स्वतंत्र, सार्वभौम भारताचे नागरिक- लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि न्यायव्यवस्था या राज्यसंस्थेच्या तिन्ही आधारस्तंभांच्या उन्मत्त भ्रष्टाचाराने अत्यंत संतापलो आहोत. आम्हाला असे वाटते की, भ्रष्ट राजकारणी, भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट न्यायाधीश हे आमच्या सुखाने जगण्याच्या आणि सभ्यपणे ताठ मानेने समृद्ध होण्याच्या मूलभूत अधिकारांवर घाला घालून तो नष्टच करू पाहत आहेत. सर्व भारतीयांच्या स्वप्नातल्या नागरी समाजाच्या मूळाला लागलेले हे नष्टचर्यच आहे. अतिरेकी, देशविरोधी आणि फूट पाडू पाहणाऱ्या सर्वांसाठी दैवी देणगीच ठरणारी भ्रष्ट व्यवस्था साहजिकच राष्ट्रीय सुरक्षिततेला बाधा आणणारी आहे.

भ्रष्टाचाऱ्याच्या या दहशतीचे उगमस्थान व्यवस्थेच्या वरच्या टोकापासूनच सुरू होते असा आमचा विश्वास आहे. जितके वर पाहावे तितकी परिस्थिती गंभीर दिसते. विविध घोटाळ्यांचे आकडे याचे पुरावे देतात.

आजच्या परिस्थितीचा एकूण विचार करता आपल्याला हे लक्षात घ्यायला हवं की, लोकपाल/जनलोकपाल जसे आणि जेव्हाही संमत होईल तेव्हाही मात्र तात्पुरत्या दुरुस्तीचाच उपाय असेल- प्रतिबंधात्मक उपाय नाही! त्याचप्रमाणे जोपर्यंत कुणीतरी कोणाची तरी नेमणूक करते तोपर्यंत राजकीयीकरणाच्या शक्यता फेटाळता येत नाहीत. तिसरे म्हणजे इतके कडक भ्रष्टाचाराविरोधी कायदे अस्तित्वात असतानाही भयंकर फोफावणारे भारतातले भ्रष्टाचारी जनलोकपालाचा आणखी एक अडथळा ओलांडण्याइतके चतूर असणे अपेक्षितच आहे. शेवटचे म्हणजे जनलोकपालाने एखाद्याला दोषी ठरवेपर्यंतच्या प्रक्रियेत जाणाऱ्या काळात देशाचे कधीही भरून न येणारे नुकसान आधीच झालेले असेल. यासाठी प्रतिबंधात्मक उपायच सुचवणाऱ्या निश्चित करणाऱ्या आणि सुरू करणाऱ्या सचेत आणि कार्यक्षम नागरी मंचांची आपल्याला आवश्यकता आहे. या भयाण काळाचे हे आव्हान आपण शिक्षित, माहितीगार आणि संवेदनशील व्यक्तींनी स्वीकारले नाही, तर भवितव्य अजून उदासवाणे असेल. भ्रष्टाचाराच्या या भयंकर रोगाच्या दुरुस्तीची आणि त्याचा प्रतिबंध करण्याच्या उपायांची योजना विकसित करण्याच्या उद्देशाने आम्ही देशभरात एक नागरी मंचांची साखळी तयार करण्याचा विचार करीत आहोत. या उपक्रमाला स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत असे म्हणता येईल. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कार्यकारी मंडळे तयार करून अशा मंचाला या सर्व स्तरांवर काम करावे लागेल. अशा सर्व स्तरांवरील अभ्यास मंडळे साधारणतः खालील मागण्यांसाठी कार्यप्रणाली आणि कार्यक्रम ठरवू शकतील.

१) सर्व करांसंबंधित कायद्यांचे पुनरावलोकन करणे, २) सध्याच्या कायद्यांतर्गत करता येण्याजोगी कायदेशीर कारवाई, ३) निवडणूक सुधारणा, ४) राजकारणी आणि इतर सर्वांचा देशाबाहेरील काळा पैसा, ५) शासकीय कार्यालयांतील भष्टाचार व लाल फितशाही यांना आळा घालण्यासाठीची जागरूकता, ६) विकासाची धोरणे, प्रारूपे आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबत जागरूकता, ७) इतर नागरी प्रश्नांची जाण करून त्यांच्या सोडवणूकीसाठी प्रयत्न, ८) जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सभ्यता, प्रतिष्ठा आणि पारदर्शकतेची संस्कृती आणण्याचा पुरस्कार

पहिल्या चार मागण्यांसाठी राष्ट्रीय पातळीवर तर इतरांसाठी स्थानिक पातळीवर काम करावे लागेल.

अधिक चर्चेसाठी आपण आमच्याशी संपर्क करू शकता. विविध ठिकाणी आपल्या समविचारी मित्रांसह आपण असे गट तयार करू शकतो. आपल्या सहभागासाठी, आपल्या कल्पना माहीत करून घेण्यासाठी आणि आपल्यासोबत संवादासाठी आम्ही उत्सुक आहोत. सभ्यपणाने आणि ताठ मानेने जगत लोकांना समृद्धी आणि प्रगती मिळवून देणारी संस्कृती इथे रुजविण्याच्या कामातला आपला वाटा आपण उचलूयात. आम्हाला खात्री आहे आपण या नवीन नागरी उपक्रमात मनःपूर्वक सहभागी असालच.

**विनय हर्डीकर**

vinay.freedom@gmail.com

(मो. ९८९०१६६३२७)



दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com

# अण्णांच्या आंदोलनाला आता सरकारी ‘प्रतिआंदोलना’चा धोका!

अण्णा हजारे यांचे उपोषण संपले आणि सरकारचा जीव भांड्यात पडला. देशाने या आधी स्वातंत्र्यासाठीची जनचळवळ अनुभवलेली होती. त्यानंतरची सर्वात परिणामकारक आणि सर्वसमावेशक जनचळवळ देशाने १६ ऑगस्टपासून १३ दिवस अनुभवली. ही चळवळ सर्वार्थाने विराट होती. अनेक कागदी विचारवंतांनी या आंदोलनावर आपापल्या परीने टीका केली. या टीकेमागची कारणेही त्यांच्या लेखनातून आणि वक्तव्यांमागून डोकावत होती. त्यांच्याही मुद्द्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करायचे ठरविले तरीही या आंदोलनाने देश हलविला आणि संसदेला ‘जनसंसदे’चे महत्व ठणकावून सांगितले, हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. देशभरात मिळून अनेक लाख लोक रस्त्यांवर उतरतात आणि कोठेही एकही दगड भिरकावला जात नाही, जाळपोळ होत नाही, ही घटनाही देशाच्या इतिहासात ठळकपणाने नोंदवावी लागेल. याचाच दुसरा अर्थ असाही घेता येईल, की रस्त्यावर उतरलेला समान्य माणूस दगडफेक - जाळपोळीसाठी कधीही तयार नसतो. तसे करण्यास त्याला बाध्य करण्यात येते. त्याला तसे करण्यास भाग पाडणारे नेतृत्व मात्र नेहेमीच नामानिराळे राहते! चिथावणीशिवाय तणाव निर्माण होत नाही, हे सत्य यामुळे अधोरेखित झाले.

***

या आंदोलनाचा ‘टेम्पो’ सुरवातीपासूनच चांगला ठेवण्यात आयोजकांना यश आले. १५ ऑगस्टपासून माध्यमांवर अण्णांचीच छाया होती. लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांनी केलेले भाषण राष्ट्राला उद्देशून होते की अण्णांना हेही कळू नये, इतकी सरमिसळ त्यात केलेली होती. त्यातून देशभरात अण्णांच्या आंदोलनाचा ‘मेसेज’ जात असतानाच अण्णांनी अचानक राजघाटावर मोर्चा वळविला आणि अल्पावधीतच तिथे हजारोंचा जमाव जमला. जो ‘जे पी पार्क’ सरकारतर्फे उपोषणासाठी सुचविला जात होता तो ही राजघाटासारखाच दिल्लीच्या एका कोपऱ्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने लाल किल्ला, राजघाट या सर्व परिसरात कडेकोट बंदोबस्त असतो. वाहतुकीची साधने अडविण्यात आलेली असतात. अशा स्थितीत राजघाटासारख्या आडनिड्या ठिकाणी कोणतीही पूर्वसूचना न देता अल्पावधीत जमलेला जमाव पाहून बहुदा सरकार चकित झाले असावे. जेपी पार्कातही अशीच गर्दी जमू शकेल असा कयास बांधून आणि त्यामुळे अण्णांचे महात्म्य वाढेल या भावनेतूनच उपोषणाआधीच अण्णांना अटक करण्याची आतताई कृती सरकारने केली आणि ती त्यांना पूर्णतः भोवली. ‘तिहार’मध्ये अडकलेले अनेक ‘मान्यवर’ तेथून बाहेर पडण्याचे असंख्य मार्ग अवलंबत असताना अण्णा मात्र सुटकेच्या आदेशानंतरही तिहार सोडण्यास तयार नव्हते. ‘तिहार’मध्ये डांबणे आणि ‘तिहार’मधून सुटका या दोन्ही गोष्टींमुळे समाजापर्यंत सर्व संदेश अगदी स्पष्टपणे गेले आणि त्याचा परिणाम अण्णांना पाठिंबा वाढण्यातच झाला.

***

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर देश किती संतप्त आहे, हे या निमित्ताने सर्वांना कळले. या पार्श्वभूमीवर संसदेत झालेली चर्चा मला बाष्फळ आणि दिखावू वाटली. ‘संसदच सर्वोच्च’ हा धोशा केंद्र सरकारने आधीपासूनच लावला होता. सर्वपक्षीय बैठकीतही हाच मुद्दा प्रभावीपणे मांडण्यात बहुदा सरकारला ‘यश’ आले. तंत्रांच्या जंजाळात जे विधेयक मागील ४० वर्षे अडकवून ठेवलेले आहे त्याची पुन्हा एकदा वासलात लावण्यासाठी सारी संसद एकजूट आहे, असेच हे चित्र होते. लोकसभेने एकदा पारित केलेले लोकपाल विधेयक त्या वेळी राज्यसभेने नाकारले होते. अण्णांच्या मागील आंदोलनानंतर नेमली गेलेली समिती आणि या समितीने कपिल सिब्बल यांच्या ‘मार्गदर्शना’खाली केलेला पोरखेळ साऱ्या देशाने पाहिलेला होता. हे ‘सरकारी’ लोकपाल दात आणि नखेच काय पण डोळेही काढलेल्या सिंहासारखे होते. सरकारी लोकपाल असा होता तर अण्णांचा लोकपाल रक्ताला चटावलेल्या नरभक्षकासारखा वाटत होता. यातून सुवर्णमध्य काढण्यासाठी जे करणे आवश्यक होते त्यात सरकार आणि अण्णा यांच्या बाजूने प्रत्येकी दोन जण अडथळे आणत होते. हे अडथळे दूर झाले आणि ‘किमान समान कार्यक्रमा’चे मुद्दे समोर आले. या पार्श्वभूमीवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत झालेली चर्चा मला बेगडी वाटली. प्रणब मुकर्जी यांचे दोन्ही सभागृहांतील




**क्रांतीला धोका प्रतिक्रांतीचा असतो, तसाच आंदोलनाला प्रतिआंदोलनाचा धोका असतो. अण्णा हजारे यांचे आंदोलन सरकारी यंत्रणेच्याच विरोधात होते. त्यामुळे प्रतिआंदोलनाचा हा धोका अधिक मोठा असू शकतो. संसदेचे सार्वभौमत्व ही आपली वैयक्तिक जहागीर आहे या भावनेतून संसदेच्या चर्चेदरम्यान अण्णांच्या आंदोलनावर तुटून पडलेल्या दोन्ही सभागृहांतील बहुतेक सर्व खासदारांच्या भाषणांतून त्यांना आलेले भयाण नैराश्य पदोपदी जाणवत होते. यात विरोधी पक्षही सहभागी होते. सरकारला तर कधीही आव्हान सहन होत नसते. या स्थितीत अण्णांच्या जनआंदोलनाचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या मार्गाने होईल. लालूप्रसाद यादव यांचे अण्णांच्या उपोषणावर शंका घेणारे वक्तव्य त्याचाच एक भाग म्हणावे लागेल. अण्णांच्या आंदोलनाच्या यशापयशाची चर्चा करताना राजकारण्यांच्या 'नियती'वर लक्ष ठेवणे खूप गरजेचे आहे. याच संदर्भातील काही निरीक्षणे...**

बीजभाषण असो, की जेटली - स्वराज यांची विरोधी पक्षनेतेपदांची भूमिका असो त्याच प्रमाणे विविध सदस्यांच्या भूमिका असो या प्रत्येक ठिकाणी अण्णांना आणि त्यांच्या आंदोलनाला नमन हा उपचार होता. संसदेचे सार्वभौमत्व पटवून देण्यासाठी त्यांनी दिलेली उदाहरणे अत्यंत कृत्रिम वाटली. दोन्ही सभागृहांतील मिळून किती सदस्य आपण स्वच्छ असल्याचा दावा प्रामाणिकपणे करतील? ही संख्या कदाचित एकाच हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी असू शकेल. 'उघड झाले ते चोर आणि बाकी सारे साव' असेच हे चित्र होते.

***

अण्णांच्या समर्थनार्थ चालू असलेल्या आंदोलनांकडे अनेक नेते कशा प्रकारे पाहत होते? शरद यादव यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यानेही अण्णांच्या पाठीराख्यांची संभावना करताना - रस्त्यात काहीही घडले तरी गर्दी जमा होते... प्रत्येक गावात अशी पाचपन्नास माणसे असतात जी कोणत्याही आंदोलनाची पर्मनंट ॲक्टिव्हिस्ट असतात - अशी विधाने केली. लालूप्रसाद यादव यांच्यासारख्या नेत्यांकडून तर परिपक्वतेची अपेक्षाच करणे अवघड असते. अण्णांच्या उपोषणाच्या सामर्थ्यावर टीका करताना या उपोषणावर संशोधन केले पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. अण्णा हजारे यांनी त्यावर शेलके भाष्य करताना 'ही ब्रह्मचर्याची ताकद आहे. १२ मुलांना जन्म देणाऱ्यांना ती कशी कळणार' अशी खिल्ली उडविली. यावर लालू काही बोलल्याचे ऐकिवात नाही!

***

सरकारपक्ष प्रत्येक पायरीवर निष्फळ आणि पराभूत ठरला. कारण त्यांनी घेतलेली भूमिकाच कुचकामी होती. कपिल सिब्बल, पी. चिदंबरम आणि अंबिका सोनी या तीन 'अतिअहंकारी' नेत्यांनी सुरवातीपासूनच अण्णांबद्दल घेतलेली भूमिका मध्यममार्गी विचार करणाऱ्यांना खटकणारी होती. मनीष तिवारी यांनी तर अण्णांना 'अपादमस्तक भ्रष्टाचारात बुडालेला' असे संबोधून आगीचा लोळ स्वतःवर आणि सरकारवर ओढवून घेतला. या साऱ्या घटनाक्रमात दिग्विजयसिंह मात्र का कोण जाणे गप्प होते. ते ही बोलले असते, तर कदाचित सरकारला आणखीनच नामुष्कीला सामोरे जावे लागले असते. आपण खूप श्रेष्ठ दर्जाचे वकील आहोत आणि आपण कोणताही मुद्दा कशाही प्रकारे वाकवू शकतो हा गंड कपिल सिब्बल यांच्या डोक्यातून जात नाही. 'लोकपाल'बद्दल त्यांनी उधळलेली मुक्ताफळे 'यू ट्यूब'वर उपलब्ध आहेत. 'लोकपाल'ला टोकाचा विरोध करणारी व्यक्ती या विधेयकाच्या रचना समितीवर नेमून सरकारने आपल्या संवेदनहीनतेचा परिचय आधीच दिला होता. अण्णांच्या अटकेनंतर चिदंबरम आणि अंबिका सोनी यांनी ज्या भाषेत देशाशी संवाद साधला, ती भाषा नक्कीच सौजन्याची नव्हती. चिदंबरम यांच्या आडमुठ्या वृत्तीचा सर्वाधिक अनुभव कम्युनिस्ट नेत्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे चिदंबरम यांच्यावर कम्युनिस्ट पक्षांचे खासदार नेहेमीच हल्ले चढविताना दिसतात. या आंदोलनातही चिदंबरम यांनी जाहिरपणे घेतलेली भूमिका सामोपचारासाठी योग्य नव्हती. त्यामुळेच अखेरच्या टप्प्यात देशाचे

**सरकारपक्ष प्रत्येक पायरीवर निष्फळ आणि पराभूत ठरला. कारण त्यांनी घेतलेली भूमिकाच कुचकामी होती. कपिल सिब्बल, पी. चिदंबरम आणि अंबिका सोनी या तीन 'अतिअहंकारी' नेत्यांनी सुरवातीपासूनच अण्णांबद्दल घेतलेली भूमिका मध्यममार्गी विचार करणाऱ्यांना खटकणारी होती. मनीष तिवारी यांनी तर अण्णांना 'अपादमस्तक भ्रष्टाचारात बुडालेला' असे संबोधून आगीचा लोळ स्वतः वर आणि सरकारवर ओढवून घेतला. या साऱ्या घटनाक्रमात दिग्विजयसिंह मात्र का कोण जाणे गप्प होते. ते ही बोलले असते, तर कदाचित सरकारला आणखीनच नामुष्कीला सामोरे जावे लागले असते.**

गृहमंत्री देशांतर्गत पेचप्रसंगावर मात करण्याच्या कामातून बाजूला सारले गेलेले आपण पाहिले. त्या ऐवजी त्यांचा मूळ विषय असलेल्या अर्थखात्याचे मंत्री ही पेच हाताळताना देशाला दिसले. या सरकारात हे काय चालले आहे? ज्यांचे जे काम, त्यांना ते करता येत नाही!

***

आंदोलने चिरडण्याचा सरकारचा अनुभव मोठा असतो. कारण नेत्यांच्या भावनेला नोकरशाहीच्या अनुभवाची जोड मिळत असते. रामदेवबाबांचे आंदोलन ज्या सहजतेने चिरडण्यात सरकारला यश आले तेवढ्याच सहजपणे अण्णांचे आंदोलन चिरडता येईल अशा तयारीत सरकार होते. आंदोलनाला परवानगी देण्याचे आणि त्यासाठी अटी घालण्याचे नाटक सरकारने दिल्ली पोलिसांना पुढे करून खेळले. पण अण्णांना अटक केल्यानंतर उसळू शकणाऱ्या लोकक्षोभाची कल्पना करण्यात सरकारची चूक झाली आणि काही तासांतच परिस्थिती सरकारच्या आवाक्याबाहेर आणि अण्णांच्या पूर्णतः ताब्यात गेली. ज्या कायद्याचा आधार घेत सरकार अण्णांना वाकवू पाहत होते, तीच शस्त्रे अण्णांनी सरकारवर उलटविली. काश्मीर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते पूर्वांचल असा सारा देश मेणबत्त्या पेटवून रस्त्यांवर उतरला. 'मेणबत्ती संप्रदाया'चे हे सामर्थ्य सरकारने लक्षात घेतले नव्हतेच पण माध्यमांतीलही अनेकांच्या ते लक्षात आले नव्हते. या वेळी पहिल्यांदाच देशभरात पुकारलेल्या एकाद्या आंदोलनात पूर्वांचलातील राज्यांनी साथ दिल्याचे चित्र देशासमोर आले. आसाम- अरुणाचल प्रदेशातही अण्णांच्या समर्थनार्थ आंदोलने झाली. कोणत्याही आंदोलकांना हेवा वाटावा अशी ही स्थिती होती. रामलीला मैदानावर उसळलेली गर्दी, त्याच वेळी इंडियागेटवर झालेली निदर्शने, जवळजवळ सर्व राज्यांच्या राजधान्यांमध्ये आणि गावोगाव रस्त्यावर उतरलेले लोक हे चित्र अभूतपूर्व होते. भ्रष्टाचाराचा मुद्दा सामान्य माणसासाठई सहानुभूतीचा होता. जन्मदाखल्यापासून मृत्यूचे प्रमाणपत्र मिळविण्यापर्यंत प्रत्येक पावलावर द्याव्या लागणाऱ्या चिरीमिरीमुळे देशातील प्रत्येक जण त्रस्त आहे. या प्रत्येकाने अण्णा हजारे यांच्यात गांधी पाहिला. हा देश गांधींवर आजही एवढा विश्वास टाकतो, त्यांना मानतो हे चित्र खरोखरच विचारमग्न करणारे आहे.

***

अण्णांच्या आंदोलनाला हिणविण्याचा प्रयत्न अनेक पातळ्यांवरून झाला. एक कायदा केल्याने भ्रष्टाचार संपेल का? असा प्रश्न काँग्रेसचे युवराज राहूल गांधी यांनी संसदेत शून्य प्रहरात विचारत एक लंबेचौडे प्रवचनच झोडले. खरे तर शून्य प्रहराचा असा वापर करणे हाच मोठा भ्रष्ट-आचार आहे. पुढे दुसऱ्याच दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांत हा विषय चर्चिला जाताना मात्र हे युवराज गायब होते! त्यांची ही 'चमकोगिरी' नाक्यावरील एखाद्या टपोरीसारखीच वाटली. ज्या माणसाकडे देश भावी पंतप्रधान म्हणून पाहतो आहे (आणि काँग्रेसजन ज्यांच्याकडे हा अधिकार देण्यासाठी अत्यंत आतुर आहेत) अशा व्यक्तीकडून किमान परिपक्वतेची अपेक्षा होती. कायद्याने प्रश्न सुटत नसतातच. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीच असावी लागते. त्यांच्या पक्षाने या विषयात सातत्याने अनिच्छाच दाखविली आणि जेव्हा अपरिहार्यता दिसली तेव्हा अत्यंत नाईलाजाने त्यांनी या विषयाला मान्यता दिली. हे करतानाही त्यांनी सतत संभ्रमाचे वातावरण कायम ठेवले. मतदान होणार की नाही इथपासून सुरू असलेली ही अनिश्चितता आता हा कायदा तरी होणार की नाही, इथपर्यंत पोहोचली आहे. जनमताचा रेटा कायम राहिला नाही, तर हा कायदा सहजपणे बासनात बांधून ठेवणे सरकारला शक्य आहे. पण इथे फक्त सरकारच्याच इच्छाशक्तीचा प्रश्न नाही. विरोधी पक्षांचीही या विषयी प्रत्यक्षात काय भूमिका आहे, हे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. भाजपानेही या विधेयकाला पाठिंबा देताना आधी सशर्त आणि मग बिनशर्त पाठिंबा दिला. हे कसेकाय झाले? उद्या सत्तेत येऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही पक्षाला लोकपालाचा डोस सहजासहजी पचनी पडणारा नाही, हेच खरे.

***

या साऱ्या घटनाक्रमाकडे पाहताना मला चिंता वाटते ती 'गावगन्ना आण्णां'ची. गावोगाव 'मैं हूँ अण्णा'च्या टोप्या घालून अनेक जण फिरले. यात तरुणांचे प्रमाण सर्वाधिक होते ही बाब आनंदाची. पण अनेक ठिकाणी अण्णांच्या या आंदोलनात सहभागी होऊन निवेदने देण्यासाठी जाणाऱ्यांची नावे आणि चेहरे पाहिले तेव्हा या आंदोलनाबद्दल मनात चिंता निर्माण झाली. मला रस्त्यात दारू पिवून मोटारसायकली चालवीत झेंडे फडकविणाऱ्यांची, तिरंगा घेऊन 'ट्रिपल सीट' जात घोषणा देणाऱ्यांची, पोलिसांना धमकावणाऱ्यांची चिंता वाटत नाही. हा प्रकार ते नेहेमीच करू शकत नाहीत. आंदोलनाची झिंग उतरली की हे सारे जमिनीवर येतील. पण 'गावगन्ना अण्णां'चे काय? अण्णांचे पाठीराखे म्हणत रत्स्यावर उतरलेल्या नागरिकांचे नेतृत्व करण्यासाठी समोर आलेले अनेक 'मान्यवर' कुख्यात म्हणावेत असे होते. अनेक कामगार नेते, राजकीय नेते, कथित विचारवंत यांचा समावेश या लोकांमध्ये होता. ही मंडळी अण्णांची वारसदार ठरतील? गावोगाव भ्रष्टाचार निर्मुलन समित्या स्थापन करून खंडणी वसूलीची नवनवी दुकाने थाटणाऱ्या गावगुंडांच्या टोळ्यांसारखेच हे चित्र मला दिसले. अण्णांनी, आंदोलकांनी आणि सामान्यजनांनी त्यांच्यापासून सावध राहायला हवे.

तोंडाला रंग फासून रुपेरी पडद्यावर नाचणाऱ्या वर्गातील अनेक जण अण्णांच्या मंचावर येऊन हजेरी लावून गेले. त्यांची खरोखरच ही लायकी होती का? अण्णांच्या आंदोलनातील खासदारांना घेरावो घालण्याच्या प्रयोगाची संकल्पना आपलीच असल्याचे आमीर खान या अभिनेत्याने सांगितले. आमीरला अशा आंदोलनात स्टेजवर येण्याचा नैतिक अधिकार आहे? ज्याने आपल्या धर्मातील तरतुदीचा आधार घेत एक बायको आणि दोन मुले असतानाही दुसरे लग्न केले त्याला त्याच्या धर्माने आणि भारतीय कायद्यानेही अभय दिले असले, तरी त्याच्या पहिल्या पत्नीवर झालेला अन्याय कसा दुर्लक्षिता येईल? यावर माध्यमेही गप्प आहेत आणि महिला संघटनासुद्धा. बरे, हे महोदय आपल्या चित्रपटांचे मानधन आणि इतर सर्व व्यवहार धनादेशाद्वारे करतात का? ते ही नाही. आमीर खान हे एक उदाहरण झाले, पण बॉलीवुडमधील एक तरी कलाकार या स्तरावर पोहोचण्याच्या योग्यतेचा आहे का? गोळा झालेल्या गर्दीला खिळवून ठेवण्यासाठी अण्णांच्या आंदोलनावर अजून तरी अशा लोकांना गोळा करण्याची वेळ आलेली आहे, असे मला वाटत नाही.

बाबा रामदेव यांचे आंदोलन अण्णांच्या आंदोलनासाठी खूपच मार्गदर्शक ठरले, असे वाटते. एखादे आंदोलन चिरडण्यासाठी सरकार


**पान २१ पाहा**

# सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र : पूर्वार्ध

**[ येणारे लोकपाल विधेयक आणि राबविणारी यंत्रणासुद्धा शासनसंस्थेचाच एक भाग राहणार असल्याने ते भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ ठरण्याऐवजी भ्रष्टाचाराला पूरक आणि पोषकच ठरण्याची शक्यता जास्त आहे. जसे लाचलूचपत प्रतिबंधक कायदा असूनही भ्रष्टाचाराला आवर घालता आला नाही, अगदी तसेच लोकपालाच्या बाबतीत घडेल. ]**

अण्णांच्या सशक्त जनलोकपाल विधेयकाच्या निमित्ताने भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या विधेयकामुळे ६० ते ६५ टक्के भ्रष्टाचार कमी होईल असा अण्णांचा दावा असला तरी तशी शक्यता दिसत नाही. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार असले तरी सध्या जे आंदोलन चाललेय ते आर्थिक भ्रष्टाचाराशी निगडित असल्याने या लेखमालेत आपण केवळ आर्थिक भ्रष्टाचाराची चर्चा करणार आहोत. अण्णांनी जनलोकपालामुळे ६० ते ६५ टक्के भ्रष्टाचार कमी होईल असे म्हटले असले तरी ही टक्केवारी भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येशी संबंधित आहे की भ्रष्टाचारामुळे होणाऱ्या एकूण अपहाराच्या रकमेशी याचा खुलासा झालेला नाही. सशक्त जनलोकपाल विधेयक आले आणि त्याची काटेकोरपणे व इमानेइतबारे अंमलबजावणी झाली असे गृहीत धरून रकमेच्या अनुषंगाने विचार केला तर ६० ते ६५ टक्के रकमेचा भ्रष्टाचार कमी होईल, अशी आशा बाळगायला काहीच हरकत नाही कारण कोट्यवधीपेक्षा जास्त रकमेचे होणारे भ्रष्टाचार जरी थांबवता आले तरी हे उद्दिष्ट सहज गाठले जाईल. मूळातच गेल्या काही वर्षांत उच्चपातळीवरील राज्यकर्त्यांचे हजारो कोटींचे भ्रष्टाचार उघडकीस आल्याने आणि सरकार या भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याऐवजी त्यांना पाठीशी घालण्यातच प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे, ही बाब जनसामान्याला प्रकर्षाने जाणवू लागल्यानेच जनप्रक्षोभाची कोंडी फुटून भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाला धार आली आणि नेमक्या याच पार्श्वभूमीवर अण्णांचे आंदोलन अधिक ठळकपणे जनतेच्या नजरेत भरायला लागले, हे अगदी उघड आहे.

मात्र भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींच्या एकूण संख्येचा विचार करता कितीही सशक्त जनलोकपाल विधेयक आणले तरी भ्रष्टाचारी व्यक्तींची संख्या एक टक्क्याने देखील कमी होण्याची शक्यता नाही. कारण भ्रष्टाचाराचे मूळ शासन संस्थेतच दडलेले आहे. सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र झाले आहे. उद्योग, व्यापार, व्यवसायाच्या प्रत्येक वाटा लायसन्स-परमीटच्या जाचक बंधनांतून जात असल्याने प्रत्येक पायरीवर विराजमान असलेल्या देवी-देवतेला नवस कबूल केल्याखेरीज पाऊल पुढे टाकताच येत नाही. नैवेद्य दाखवल्याखेरीज टेबलामागील देव प्रसन्न होत नाही आणि नवस फेडल्याखेरीज कुणाचेच कार्य सिद्धीस जात नाही. जेथे जेथे म्हणून शासकीय नियंत्रणे आहेत तेथे तेथे भ्रष्टाचाराच्या अमाप संधी उपलब्ध झाल्या आहेत आणि मिळालेल्या संधीचे सोने करायचे असते हे प्रत्येकाला पुरते ठाऊक असल्याने संधीचे सोने करण्याची संधी कुणीच दवडत नाही.



गंगाधर मुटे

येणारे लोकपाल विधेयक आणि राबविणारी यंत्रणासुद्धा शासनसंस्थेचाच एक भाग राहणार असल्याने ते भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ ठरण्याऐवजी भ्रष्टाचाराला पूरक आणि पोषकच ठरण्याची शक्यता जास्त आहे. जसे लाचलूचपत प्रतिबंधक कायदा असूनही भ्रष्टाचाराला आवर घालता आला नाही, अगदी तसेच लोकपालाच्या बाबतीत घडेल. मात्र यातून दोन गोष्टी चांगल्या घडण्याची शक्यता आहे. पहिली अशी की भ्रष्टाचार करणाऱ्यांना या नव्या सशक्त व्यक्तींनाही संगनमत करून आपल्यात सामावून घ्यावे लागेल. त्यामुळे अपहाराची जी रक्कम दहा लोकांतच हडप केली जाणार होती तिथे वीस लोकांमध्ये वाटून घ्यावी लागेल, त्या निमित्ताने विकेंद्रीकरणाची सुरुवात झाल्यासारखे होईल. दुसरे असे की या लोकपाल संस्थेला वार्षिक कर्तबगारीचा अहवाल दमदार दिसण्यासाठी काही ना काही तरी कार्यवाही करावीच लागेल. त्यामुळे त्यांनी पाच-पन्नास मोठे मासे जरी गळाला लटकवले तरी ६० ते ६५ टक्के रकमेचा भ्रष्टाचार कमी होईल असा अण्णांचा दावा प्रत्यक्षात खरा उतरायला कठीण जाणार नाही; कारण उच्चस्तरीय शासक-प्रशासकांच्या घोट्याळ्यातील रकमेचा आकडाच एवढा प्रचंड आहे की, तो आकडा ऐकताना एखाद्या संवेदनशील माणसाला चक्क मूर्च्छाच यावी.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपैकी संपूर्ण देशातल्या दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना अन्न आणि

वस्त्र या दोन मूलभूत गरजा एक वर्षासाठी फुकटात पुरवायच्या म्हटले तरी तो खर्च भागून शिल्लक उरेल एवढ्या प्रचंड रकमेचा अपहार एकट्या टूजी स्पेक्ट्रम घोटाळ्यात झालेला आहे. देशातल्या संपूर्ण शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून एका झटक्यात पूर्णतः मुक्त केले जाऊ शकते एवढ्या किंवा यापेक्षा जास्त रकमेचे कित्येक घोटाळे एका-एका व्यक्तीने केले आहेत. चव्हाट्यावर आलेले घोटाळेच जर इतके महाप्रचंड आहेत तर प्रकाशात न आलेल्या घोटाळ्यांची संख्या किती असेल याची कल्पना करताना अंगावर काटा उभारल्याशिवाय राहत नाही. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कायद्याच्या कचाट्यात केवळ तेच भ्रष्टाचारी सापडतात ज्यांना रीतसर भ्रष्टाचार कसा करावा, याचे ज्ञान नसते. कायद्याला हवे तसे वाकविण्याचे कौशल्य नसते. मात्र जे पद्धतशीरपणे भ्रष्टाचार करण्यात पारंगत आहेत, ते कधीच कायद्याच्या कचाट्यात सापडत नाहीत. अगदीच स्वच्छ प्रतिमेचे महामेरू म्हणून उजळ माथ्याने मिरवत राहतात. अगदी स्विस बँकेत भरभक्कम खातेभरणी करूनही जनतेच्या नजरेत मात्र बेदाग व्यक्तिमत्त्व म्हणून अधिराज्य गाजवीत असतात.

जोपर्यंत घोटाळ्याच्या रकमा सुसह्य होत्या तोपर्यंत जनतेलाही फारसे नवल वाटत नव्हते, कारण जो तळ्याची राखण करेल तो पाणी पिणारच हे गृहीत धरले जात होते पण आता पाणी पिण्याऐवजी चक्क तळेच हडप करण्याची भ्रष्टाचाऱ्यांची नवी संस्कृती उदयाला आल्याने आजपर्यंतचा सुसह्य भ्रष्टाचार आता असह्य वाटायला लागला आहे. अण्णांच्या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा मिळण्याचे गमक यात दडले आहे.

भ्रष्टाचाराचा मुद्दा आता व्यापक प्रमाणावर ऐरणीवर आला असला तरी माणसाची भ्रष्टाचारी वृत्ती आता इतक्यातच किंवा गेल्या काही वर्षांतच जन्माला आलेली नाही. पूर्वीच्या काळी भ्रष्टाचार अस्तित्वातच नव्हता असेही समजण्याचे कारण नाही. आमचे पूर्वज अत्यंत चारित्र्यवान होते, असे जर कोणी सांगत असेल तर तीसुद्धा लबाडी आहे, कारण आर्थिक भ्रष्टाचार हा मनुष्य जातीच्या जन्माच्या पहिल्या दिवसापासून किंवा मनुष्य जातीच्या जन्माच्या आधीपासूनच अस्तित्वात होता, याचे पुरावे आहेत. देवदेवता लाचखोरीच्या मूर्तिमंत उदाहरण आहेत. एखादा शासकीय अधिकारी स्वतःची नैतिकमूल्ये जपण्यासाठी एक छदामही न घेता जनतेची कामे करतो, असे दृश्य तुरळक असले तरी दुर्मिळ नाही. मात्र बिना धूप-दीप-आरतीशिवाय प्रसन्न होणारी देवता सापडणे कठीण आहे. एखाद्याजवळ देवाला देण्यासारखे काहीच नसेल, अगदी फूल-अगरबत्तीही देण्याची परिस्थिती नसेल तर निदान भक्तिभाव तरी अर्पण करावाच लागतो, त्याशिवाय देव काही प्रसन्न होत नाही.

काही देवतांना प्रसन्न करण्यासाठी कोंबडी, बकरी किंवा डुक्कर यासारख्या प्राण्यांचा बळी देऊन नैवेद्य दाखवावा लागतो. त्यातल्या त्यात काही देवता तर फारच अडेलतट्टू असतात. नरबळीखेरीज त्यांना दुसरे काहीच चालत नाही. देवतांची कृपादृष्टी हवी असेल तर त्यांना हे सगळे द्यावेच लागते. नाही दिले तर त्या प्रसन्न होत नाहीत आणि याचकाचे कल्याणसुद्धा करत नाहीत. मात्र या तऱ्हेच्या देवता पूजाअर्चना न केल्यास प्रसन्न होत नाही; पण याचकाचे निष्कारण वाईटही करत नाही. अशा तऱ्हेच्या प्रसन्न किंवा मंगल देवता या वर्गवारीत मोडणाऱ्या देवतांचे गणित साधेसुधे असते. त्यांचे भक्तांना एकच सांगणे असते आशीर्वाद हवा असेल तर खिसा सैल करा, नाही तर हवा खा.

मात्र काही देवता वेगळ्याच म्हणजे ओंगळ किंवा अमंगल देवता या वर्गवारीत मोडणाऱ्या असतात. अशा देवतांचे स्वरूप फारच वेगळे असते. इथे याचकाच्या व्यक्तिस्वातंत्र्याला किंवा मर्जीला अजिबात स्थान नसते. ठरल्याप्रमाणे वर्षातून एकदा तरी त्यांची पूजा करावीच लागते. दहीभात, मलिदा, कोंबडी, बकरी यांपैकी काहीना काहीतरी त्यांना द्यावेच लागते. नाहीतर त्या कोपतात. अशा देवतांना समाजही खूप घाबरतो. कारण या ओंगळ देवतांचा जर क्रोध अनावर झाला आणि त्या कोपल्या तर घरातल्या व्यक्ती आजारी पडणे किंवा मरणे, नैसर्गिक प्रकोप होणे, रोगराई येणे अशा तऱ्हेची संकटे येतील, अशी भीती त्यांच्या मनात दबा धरून बसलेली असते. देव आहे की नाही, तो प्रसन्न होतो की नाही, असा हा मुद्दा नाही; पण पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीमध्ये अशाच तऱ्हेने समाजाची उत्क्रांती झाली असल्याने लाचखोरी आणि भ्रष्टाचार मनुष्यजातीच्या रक्तात पुरेपूर भिनलेला आहे, हे महत्त्वाचे आहे.

निसर्गाने किंवा देवाने जेव्हा माणूस घडविला तेव्हा एक भलीमोठी मेख मारून ठेवलेली आहे. माणसाव्यतिरिक्त इतर सर्व प्राण्यांना स्वबळावर जगण्यासाठी काहीना काहीतरी असा एक शारीरिक विशेष गुण किंवा अवयव दिले आहे की त्यामुळे त्याला स्वसामर्थ्यावर जगता येऊ शकेल. जसे की वाघ-सिंहाला तीक्ष्ण नखे आणि दात, हरणाला पळण्याचा प्रचंड वेग, हत्तीला शक्तिशाली सोंड, सापाला विष, जिराफाला उंच मान, काही प्राण्यांना झाडावर चढण्यायोग्य शरीररचना, मगरीला पाण्यात पोहण्यासाठी खवले, पक्ष्यांना आकाशात उडण्यासाठी पंख वगैरे वगैरे. त्यामुळे त्या-त्या पक्षी-प्राण्यांना कुठलाही भ्रष्टाचार न करता जगणे सोयीचे झाले. त्यांना निसर्गाकडूनच स्वतःचे जीवन जगण्याचे हत्यार आणि ते वापरण्याचे कौशल्य मिळाले असल्याने त्यांना त्यांचे आचरण भ्रष्ट करण्याची गरजच भासत नाही. एका सावध प्राण्याने दुसऱ्या बेसावध प्राण्याची शिकार केली तर त्याला खून किंवा प्राणीहत्या मानली जात नाही आणी त्यांना निसर्गानेच तशी मुभा दिली असल्याने ते कायद्याचे उल्लंघनही ठरत नाही. म्हणूनच प्राण्यांना पाप-पुण्याच्या कसोट्याही लागू होत नाही.

मात्र निसर्गाने माणसाला असा कोणताच अवयव दिलेला नाही की तो त्याच्या साहाय्याने स्वतःची शिकार स्वतःच मिळवून आपले पोट भरू शकेल. माणसाला देवाने वाघासारखे तीक्ष्ण नख, हत्तीसारखे दात किंवा सोंड, मगरीसारखी प्रचंड ताकद यापैकी जरी काहीही दिले नसले तरी त्याऐवजी बुद्धिसामर्थ्य दिले आहे. बुद्धिसामर्थ्य देताना बुद्धीचा हवा तसा वापर करण्याचे स्वातंत्र्यसुद्धा देऊन टाकले आहे आणि इथेच खरी मेख आहे. बुद्धीचा हवा तसा वापर करण्याचे व्यक्तीनिहायस्वातंत्र्य हेच मानवजातीच्या संबंध वर्तनाचे आणि गैरवर्तनाचे कारण ठरले आहे. मनुष्याने बुद्धीचा वापर कसा करावा याचे नियंत्रण जर मनुष्याऐवजी निसर्गाच्या स्वाधीन असते तर माणुसकी, सज्जनता, नैतिकता यांच्या व्याख्या करून त्याचा जाणीवपूर्वक अंगिकार करण्याची गरजच भासली नसती. तसेच माणसाने नीतिनियमाने वागावे म्हणून कायदे करण्याची गरजच भासली नसती. माणसाचे आचरण निसर्गाने नेमून दिलेल्या चौकटीतच राहिले असते.

माणसाच्या वर्तणुकीचे नियमन निसर्ग करत नसल्याने व आपापल्या बुद्धीचा वापर कसा करावा याचा निर्णय ज्याचा त्याने घ्यायचा असल्याने मानवीजीवाच्या व्यक्तीगत हालचालींना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक मानवी जीवांच्या समुच्चयातूनच समाज बनत असल्याने प्रत्येक मानवी जीवाने व्यक्तीगत पातळीवर समाजाला पोषक हालचाली करणे म्हणजे नैतिकता आणि समाजाला नुकसान पोहचेल अशी हालचाल करणे म्हणजेच अनैतिकता, अशी एक ढोबळमानाने व्याख्या तयार झाली असावी. समाजरचना ही परिवर्तनशील असल्याने मग नैतिकतेच्या

व्याख्याही त्यानुरूप बदलत गेल्या असाव्यात.

एखाद्या व्यक्तीने केलेले वर्तन जर उर्वरित समाजासाठी व एकंदरीत समाजाच्या उत्क्रांतीच्या दिशा ठरण्यासाठी अहितकारक ठरत असेल तर त्याचे ते वर्तन गैरवर्तन ठरत असते. या गैरवर्तनाचेच दुसरे नाव भ्रष्टाचार असे आहे. मोह आणि स्वार्थ हा सजीवांचा स्थायीभाव असल्याने आणि मनुष्यप्राण्याच्या बाबतीत ज्याचा निर्णय त्यानेच घ्यायचा असल्याने, जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे लपतछपत चौर्य कर्म करून, घेता येईल तेवढा लाभ पदरात पाडून घेणे, ही मानवी प्रवृत्ती बनली आहे. ही प्रवृत्ती कालही होती, आजही आहे आणि उद्याही राहणारच आहे. गैरवर्तन किंवा भ्रष्टाचार ही न संपवता येणारी गोष्ट आहे. मात्र समाजहिताच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या मार्गाने अनावश्यक व अहितकारक व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने लादून भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविणे सहज शक्य आहे.

विविधता हा निसर्गाचा मुख्य गुण असल्याने जन्माला येणाऱ्या व्यक्तीही जन्मताच नानाविध प्रवृत्तींच्या असतात. काही व्यक्ती निष्कलंक चारित्र्याच्या असतात. त्यांना नैतिकतेची चाड असते आणि त्यांच्या मनात समाजाविषयीचा सन्मानही असतो. काही व्यक्ती समाजाला व सामाजिक कायद्याला जुमानत नाहीत; पण नैतिकतेला सर्वोच्च स्थान देतात, काही व्यक्तींच्या आयुष्यात नैतिकतेला अजिबात स्थान नसते; पण कायद्याला अत्यंत घाबरणाऱ्या असतात मात्र व्यक्तींचा एक वर्ग असाही असतो की तो कशालाच जुमानत नाही. ना नैतिकतेला ना कायद्याला. नैतिकतेला आणि कायद्याला न जुमानणारा वर्ग कायमच स्वार्थ साधण्यासाठी संधीच्या शोधात असतो. नानाविध क्लृप्त्या लढवीत असतो, कायद्यातील पळवाटा शोधून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा सतत प्रयत्न करत असतो.

मानवी प्रवृत्ती निसर्गदत्त भ्रष्टाचारधार्जिणी असल्याने व प्रवृत्ती व्यक्तीनिहाय विविधतेने नटलेली असल्याने केवळ कायदे करून किंवा निव्वळ नैतिकतेचे धडे देऊन भ्रष्टाचार काबूत येण्यासारखा नाही, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. एवढा विचार केला तर भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी किती व्यापकपणे पावले टाकण्याची गरज आहे, हे सहज समजून येईल.

क्रमशः

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

**पान १८ वरून पुढे...**

काय काय करू शकते, याचा वस्तुपाठ या आंदोलनाने घालून दिला होता. त्यामुळे सरकारपासून सावध राहण्याची पूर्ण तयारी अण्णांच्या बाजूने करण्यात आली. 'तिहार'मधून बाहेर पडण्याआधी त्यांनी धरलेला लेखी परवानगीचा हेका त्याचेच प्रतीक होता. सरकारमधील कोणाशी चर्चा करायची आणि कोणाशी नाही, कोण किती विश्वासार्ह आहे, हे ही अण्णापक्षाच्या लक्षात आले होते त्यामुळे एकट्याची एकट्याशी चर्चा त्यांनी कटाक्षाने टाळली. बाबा रामदेव यांची प्रकृती चौथ्या दिवशीच ढासळली होती. त्या तुलनेत अण्णांना उपोषणाचा प्रदीर्घ अनुभव नक्कीच आहे. त्या बळावर त्यांनी देशाला वेळोवेळी स्पष्ट संदेश देत आंदोलन पुढे चालविले. या सर्व घटनाक्रमात त्यांनी सातत्याने अहिंसात्मक मार्गाचाच आग्रह धरल्याने सरकारला कुठेही बळजोरी करता आली नाही. वृत्तवाहिन्यांचा 'फोकस' सातत्याने रामलीला मैदानावरच असल्याने देशासमोरही दुसरा विषय राहिला नाही. याचा पुरेसा दबाव सरकारवर कायम राहिला आणि एक आंदोलन सकारात्मक वळणावर थबकले.

चर्चेच्या फेऱ्या शेवटच्या टप्प्यावर असताना मुद्दा फिसकटतो की काय, अशी एक शक्यता निर्माण झाली होती. या स्थितीत ३० ऑगस्टला १ कोटी लोकांचा संसदेला घेराओ आयोजणार असल्याचा अण्णांचा इशारा सरकारसाठी बहुधा पुरेसा ठरला. भलेही अण्णांभोवतीच्या गर्दीला कोणी कितीही नावे ठेवत असोत, देशभरात असंख्य ठिकाणी उत्स्फुर्त निदर्शने, आंदोलने करणारे लोक, त्यातही तरुणांचा प्रचंड मोठा सहभाग नक्कीच प्रभावशाली ठरला. कोणाही पक्षाला जे संख्याबळ सिद्ध करणे अशक्य आहे, ते अण्णांच्या एका शब्दावर स्वखर्चाने एकत्र आले, हा प्रभाव नक्कीच महत्वाचा ठरला. त्यापुढे संसदेला झुकावे लागले. उपोषण मागे घेतल्यानंतर केवळ एका हाकेसरशी संध्याकाळी ६ वाजता इंडिया गेटवर काही लाख लोकांचा जो जमाव एकत्र आला, त्याचे वर्णनही करणे अशक्य आहे. कोणीही नेता नसताना, कसलीही भाषणे होणार नसताना हे लाखो लोक एकत्र आले, त्यातून या विषयाबद्दलची त्यांची भावना संबंधितांनी लक्षात घ्यावी, एवढेच.

आंदोलनाच्या या मर्यादित यशानंतर अण्णा आणि त्यांच्या आंदोलनाला निष्प्रभ ठरविण्याचा प्रयत्न सरकार आणि विरोधक या दोघांकडूनही होणार हे निश्चित आहे. कारण, अण्णा आणू इच्छिताहेत त्या लोकपालामुळे सर्वच राजकीय पक्षांची दुकानदारी बंद होणार आहे. काँग्रेसच काय पण भाजपसह कोणत्याही पक्षाला 'पक्ष' म्हणून हे परवडणारे नाही. शिवाय राजकीय नेत्यांच्या 'स्वतःभोवतीच गर्दी असावी' या धारणेला या आंदोलनाने छेद दिला आणि एका सामान्य माणसाभोवती गर्दी जमली. हे ही त्यांना पचणारे नाही. त्यामुळे अण्णांच्या एवढ्या प्रदीर्घ उपोषणामागील रहस्य, त्यांच्याभोवतीच्या केजरीवाल-बेदींच्याबद्दल वदंता पसरविणे, या कायद्याने भ्रष्टाचार कसा रोखला जाणार नाही याचीच चर्चा करत राहणे, या आंदोलनाशी जोडल्या गेलेल्यांवर दुसऱ्याच कुठल्यातरी कारणांवरून कारवायांचा सपाटा लावणे हे आणि असे अनेक प्रकार पुढच्या काळात सरकारकडून होऊ शकतात. सध्या दाखल झालेल्या प्रस्तावावर महिनाभरात निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलनाचा इशारा अण्णांनी दिला आहेच, पण उपोषणाच्या जाचातून सुटलेले सरकार आता या आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न नक्की करेल, असे वाटते. अशा स्थितीत सर्वांनी मनोधैर्य राखणे महत्वाचे आहे.

सरकारचे एकमेव यश...!

या संपूर्ण आंदोलनात प्रत्येक पावलावर सरकारला माघार घ्यावी लागली. पण एका बाबतीत मात्र सरकार अत्यंत 'ठाम' आणि 'कठोर' राहिले. काहीही झाले तरी सरकारने अण्णांना 'जंतर मंतर'वर उपोषण करू दिले नाही म्हणजे नाहीच! पण याला सरकारचे यश म्हणायचे का?

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# शेती, शेतकरी आणि शिक्षण

**[ देशाचा ६५ वा स्वातंत्र्य दिन. अर्धी शताब्दी ओलांडलेली. गावातील शाळांची दुर्दशा, शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि सरकारी योजनांनी शेतीची केलेली फसगत पाहून मन विषन्न होते. ६५ वर्षात काहीच बदल झाला नाही का? हो, झाला आहे. थोडा बदल झालेला जरुर दिसतो. पण या काळात जग किती पुढे निघून गेले आहे? त्या तुलनेत गाव खूप मागे राहिलेले आहे. जगाच्या वेगाशी सूर जुळावा असे या गावातील लोकांना वाटते का? ]**

या वर्षी १५ ऑगस्टला गित्ता या गावाला गेलो होतो. अंबाजोगाईपासून अवघ्या आठ कि.मी.अंतरावरचे रस्त्यावरचे गाव. गावाचा अंबाजोगाईशी नियमित राबता. या गावचे प्रा.भगवान शिंदे हे माझ्या परिचयाचे. कॉमर्स विषय शिकवीत असले तरी कवी आहेत. 'महाभारता'चा चांगला अभ्यास आहे. सरेल गातात, त्याहीपेक्षा उमद्या मनाचा माणूस म्हणून मी त्यांना ओळखतो. त्यांचे सूत धरून आम्ही या गावाला जायचे ठरविले. परभणीहून इरफान आला. तो महिला आर्थिक विकास महामंडळात नोकरी करतो. फेसबुक वर मैत्री झालेली. मी जाणार आहे म्हटल्यावर तोही येतो म्हणाला. थेट गावातच आमची भेट झाली.

**शिक्षण**

आम्ही एका शाळेत पोचलो. झेंडावंदन झालेले होते. विद्यार्थी निघून गेलेले. मुख्याध्यापक आणि काही शिक्षक मात्र रेंगाळलेले. शाळेचे नाव श्रीराम विद्यालय असले तरी दशरथ शिंदेंची शाळा म्हणून ती ओळखली जाते. दशरथ शिंदे हा साधा कर्मचारी माणूस. त्याने शेजारच्या जवळगाव येथे मूक-बधिरांची निवासी शाळा काढलीय. तेंव्हापासून तो माझ्या संपर्कात आला. संस्थाचालक असला तरी त्याने नोकरी सोडली नाही. नोकरीचा पगार टाकून संस्था चालविणारा हा विरळा संस्थाचालक. त्याचीच ही कायम विनाअनुदानित शाळा. आठवी ते दहावीपर्यंतचे वर्ग चालतात. गीता आणि भारजची मुले येतात. जवळपास शंभर विद्यार्थी आहेत. अत्यंत कमी पगारावर काम करणारे चार शिक्षक-शिक्षिका. कधी तरी अनुदान येईल, नोकरी पक्की होईल आणि आयुष्याचे पांग फिटतील या आशेवर येरझऱ्या घालणारे. इमारत पत्र्याची. केवळ छप्पर पत्र्याचे नव्हे तर भिंतीही पत्र्याच्याच. उन्हाळ्यात घामाच्या धारा निघतात. लाहीलाही होते. अशा शाळेत आमची भावी पिढी घडत आहे. अशा शाळांच्या भरवश्यावर महासत्ता होण्याची स्वप्ने आमचे सरकार पाहत आहे. ग्रामीण भागातील पालकांना अलीकडे आपली मुले शिकावी वाटतात. ते फी देवून-देवून देणार किती? केवळ विद्यार्थ्यांच्या फीवर सगळे भागू शकत नाही. त्यामुळे अत्यंत कमी पगारावर काम करणारे शिक्षक, तुटपुंज्या साधनांवर शिकणारे बालगोपाल विद्यार्थी. सारेच चिंताजनक.


अमर हबीब

गावात जिल्हा परिषदेची एक शाळा आहे. तेथे पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग चालतात. आम्ही पोचलो तोपर्यंत मुख्याध्यापक आणि त्यांचे बाकी सहकारी झेंड्याची देखभाल करायला एक शिक्षक ठेवून आपापल्या गावी निघून गेले होते. या शाळेत सात वर्गांना मिळून चार शिक्षक होते. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली म्हणून एक शिक्षक कमी झाला. आता 'सात वर्ग और तीन शिक्षक, बडी नाइन्साफी है.' अशी दयनीय अवस्था झाली आहे. एखाद्या शिक्षकाने हक्काची रजा घेतली तरी त्या दिवशी उरल्या सुरल्या शिक्षणाचेही तीनतेरा वाजतात. विद्यार्थी कमी झाले, जी बाब खाजगी शाळेत ऐकायला मिळाली होती, तीच येथेही. विद्यार्थ्यांनी शाळा सोडली नाही. अनेक पालक आपल्या लेकरांच्या शिक्षणासाठी अंबाजोगाईला जाऊन राहू लागले आहेत. किती असतील? उत्तर मिळाले, किमान पंचेवीस! आणि इतर पंचेवीस विद्यार्थी आपल्या थोरल्या भावा-बहिणीबरोबर ॲटोरिक्षाने अंबाजोगाईला जा ये करतात.

ग्रामीण भागात शिक्षणाच्या गैरसोयी पूर्वीपासून चालत आल्या आहेत. त्यात फारशी सुधारणा झाली नाही. ग्रामीण भागाला टाकाऊ आणि निकृष्ट देण्याचा सरकारी रिवाज आजही कायम आहे. असे असले तरी पूर्वी ग्रामीण भागातील लोकांमध्ये शिक्षणाविषयीची जी उदासिनता दिसत असे ती मात्र आज कमी झाली आहे. लोक आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी तालुक्याच्या गावात जाऊन खोली करून राहू लागले आहेत. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. या आकांक्षाना जसा प्रतिसाद मिळाला पाहिजे तसा आज




मिळत नाही. ग्रामीण भागातील ही मुले प्रगतीच्या वाटचालीत इतर मुलांच्या बरोबरीने येतील का? या प्रश्नाचे आज तरी उत्तर 'नाही' असेच आहे.

**शेतकरी**

चार मुलींची आई. चाळीसीच्या आतली. थोरल्या मुलीच्या लग्नानंतर नवऱ्याने आत्महत्या केलेली. वाट्याची जमीन दोन एकर. तीही कोरडवाहू. सासूबाईंचे निधन झालेले. घरात दुसरे कोणी वडिलधारे नाही. सासरे वेगळे राहतात. जमीन कसायला पैसे नाहीत. ती एकरकमी भाड्याने दिलेली. नवऱ्याच्या आत्महत्येनंतर मिळालेल्या एक लाखातील ७० हजार पोस्टात फिक्स केलेले. शिल्लक तीस हजार व जुळवा जुळाव करून आणलेले काही पैसे मिळून दुसऱ्या मुलीचे लग्न करून दिले. फिक्स रकमेवर महिन्याचे व्याज साडेचारशे रुपये मिळतात. आता घरात दोन मुली. एक कॉलेजमध्ये शिकते. तिला अंबाजोगाईला जायला-यायला महिना १६० रुपये लागतात. धाकटी तीसरी-चौथीला गावातील जि.प.शाळेत जाते. कोण्या नातेवाईकाने धाकटीच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी घेतली आहे. पावला पावलावर ओढताण. दुध आहे तर साखर नाही, साखर आहे तर दुध नाही. नवऱ्याने आत्महत्या करून इनमिन वर्ष झालेले. डोळ्यातील पाणी अजून आटलेले नाही. जखम ओली आहेत. सात-आठ वर्षाची धाकटी म्हणते, 'आई, बाबांची आठवण काढीत जाऊ नकोस. आपल्याला सोडून जाताना त्यांनी केलता का आपला विचार?' लेकीचाच आता आईला दिलासा. संकटे आली की लहानपणातच समजूदारपणा येऊ लागतो.

या महिलेचे मला कौतुक वाटले. ती विलाप करीत बसली नाही. सहानुभूतीची झोळी पसरून ती भिक मागत नाही. ती म्हणाली, 'आमच्या समाजात माणसाला मरूही देत नाहीत अन जगूही देत नाहीत. मी धडधाकट आहे. काम करू शकते. लग्नानंतर ह्यांच्यासोबत मी सरपण विकले, खानावळ चालविली. आता मी पडले एकटी बाईमाणूस. कोणाकडे मजुरीलाही जाऊ शकत नाही. लोक नाव ठेवतात. घरात लेकी बाळी आहेत, त्यांचे व्हायचे जायचे आहे. त्यांचा विचार करून बाहेर पडू शकत नाही. मी धडधाकट असूनही काही करू शकत नाही. याचे मला वाईट वाटते.'

**शेती**

महाबीजचे सोयाबीनचे बियाणे वाफलेच नाही, ही सार्वत्रिक तक्रार आहे. या गावात मात्र वेगळीच समस्या दिसली. ज्यांनी लवकर पेरणी केली होती त्यांचे सोयाबीन तरारुन आले होते. ज्यांनी पेरणी केल्यानंतर दुसऱ्या दिवशी पाऊस झाला त्यांचे मात्र उगवले नाही. पाण्याचा ओघळ ज्या दिशेने वाहिला त्या भागातील पिके गेली आहेत. एकेकाळी बंडिंग, जमीन सपाटीकरण या योजनांच्या नावाने लाखो रुपयांची उधळण करण्यात आली होती. तिचा काय उपयोग झाला? आजही अनेक शेतात खोलगट आणि उमाटाचे भाग तसेच दिसतात. योजनांवर उधळलेला पैसा सरकारी नोकरांच्या हातात देण्याऐवजी जर तो शेतकऱ्यांच्या हातात आला असता तर कदाचित त्याचा जास्त उपयोग झाला असता. शिंदे सरांच्या शेतातील सोयाबीन मात्र बघण्यासारखे आहे. ते आताच गुडघ्या एवढे झालेले आहे. अख्या रानात कोठेच तण दिसला नाही. खुरपनीसाठी ८० बाया लावल्या होत्या, असे शिंदे सरांनी सांगितले. सोयाबीनला छोटी चिमुकली फुले आली होती. ती फुले म्हणजे शिंदे सरांना दिसणारी आशेची किरणे होती.

देशाचा ६५ वा स्वातंत्र्य दिन. अर्धी शताब्दी ओलांडलेली. गावातील शाळांची दुर्दशा, शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि सरकारी योजनांनी शेतीची केलेली फसगत पाहून मन विषन्न होते. ६५ वर्षात काहीच बदल झाला नाही का? हो, झाला आहे. थोडा बदल झालेला जरुर दिसतो. पण या काळात जग किती पुढे निघून गेले आहे? त्या तुलनेत गाव खूप मागे राहिलेले आहे. जगाच्या वेगाशी सूर जुळावा असे या गावातील लोकांना वाटते का? आपल्या चिमुकल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून तालुक्याच्या ठिकाणी जावून राहणारी माणसे, धडधाकट असूनही मला काम करता येत नाही ही खंत बाळगणारी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची पत्नी आणि शिंदे सरांच्या शेतात उमललेली सोयाबीनची फुले पाहिली की वाटते होय, जगाच्या वेगाशी गती साधण्याची लोकांची इच्छा अजूनही शाबित आहे. लोकांच्या या आशेला प्रतिसाद मिळाला पाहिजे, ग्रामीण भागातील मुलांना चांगले शिक्षण, स्त्रीयांना रोजगाराचे स्वातंत्र्य आणि सुरक्षित वातावरण, नवे तंत्रज्ञान वापरता येईल एवढी शेतकऱ्यांची ऐपत यावी हीच मनोकामना. तो १५ ऑगस्ट कधी येईल याची मी वाट पाहत आहे.

**अमर हबीब**

अंबर, यादव हॉस्पिटल शेजारी, हाऊसिंग सोसायटी,

अंबाजोगाई - ४३१५१७. मो. ९४२२९३१९८६

habib.amar@gmail.com

■■

# बैलाचाही जागो पुरुषार्थ

[ थोडेसे आपले स्वत:चे अनुभव जरा आठवून पाहा, तर लक्षात येईल की, जेव्हा जेव्हा आपल्या घरातल्या गाईने वासराला जन्म दिला होता तेव्हा तेव्हा त्या वासराला आपण फक्त वयाच्या दीड-दोन वर्षे उंडारू दिले होते. त्याला गावात वळू म्हणून फिरण्याचे भाग्य प्राप्त होते ना होते तेव्हा खट्टकन जाऊन त्याची आंडी केली होते. हे खरे आहे की नाही ते तपासून पाहा. हे आंडी करणे किंवा वृषण चेचणे म्हणजे एक प्रतिक आहे. ]

**नाकामध्ये वेसण घाला**
**पाठीवरती ओझे ठेवा**
**मानेभोवती हात फिरवूनी**
**रोज तया कामाला लावा!!**

भक्तांनो आणि माझ्या विनाकारण समर्थकांनो, आज आम्ही वरोल्लेखित कवनाने आमचे कीर्तन का सुरू करत आहोत तर यामागे हे कारण आहे की, पोळ्याच्या सणाची आम्हाला आठवण झाली आहे. पोळ्याचा सण आला की, आम्हाला आमचे भक्त एकदम नजरेसमोर येतात आणि असा प्रत्येक भक्त हा आम्हाला बैलासारखा दिसतो. आमच्या समोर बसलेले सारे बैल आम्ही बघतो आणि आमचा एकट्याचाच कसा नंदीबैल झाला आहे याचा आम्हाला बोध होतो. हे बैल बनणे कसे घडते याची फार छान कथा आधी तुम्हाला ऐकवून टाकणे मात्र भाग आहे. थोडेसे आपले स्वत:चे अनुभव जरा आठवून पाहा, तर लक्षात येईल की, जेव्हा जेव्हा आपल्या घरातल्या गाईने वासराला जन्म दिला होता तेव्हा तेव्हा त्या वासराला आपण फक्त वयाच्या दीड-दोन वर्षे उंडारू दिले होते. त्याला गावात वळू म्हणून फिरण्याचे भाग्य प्राप्त होते ना होते तेव्हा खट्टकन जाऊन त्याची आंडी केली होते. हे खरे आहे की नाही ते तपासून पाहा. हे आंडी करणे किंवा वृषण चेचणे म्हणजे एक प्रतिक आहे. आपल्यासमोरचे ते ताजे जिवंत उदाहरण आहे ज्यातून गावातील सुव्यवस्था आणि कायदा सांभाळण्याचे ठोक कॉन्ट्रॅक्ट घेतलेले घराणे आपल्याला कसे बैले करून टाकते हे सिद्ध होते. एकदा का शेतकऱ्याचा मुलगा सुशिक्षित बेकार म्हणून गावात फिरू लागला की, त्याच्यात क्रांतीचा जोष येतो, गावसुधारणेच्या स्वप्नाची मस्ती चढते, तो विकास- विकास म्हणून फुत्कारत उंडारू लागतो, गावातल्या महानायकाला प्रश्न विचारून रहस्यांची माती उकरतो. हे सगळे एखाद्या महानायकाने पाहिले की, तो मग त्याच्या गळ्यात घुंगरू बांधण्याचा निर्णय घेतो, मग घडते ते याप्रमाणे की,

एकदा का बांधले पायात घुंगरू
बाईच्या नशिबी नाचणेच उरते...
एकदाच का बांधले गळ्यात घुंगरू
बैलाच्या मानेवर जू येते...

हे जू कसे ठेवले जाते तर अशा मस्तवाल कृषीपुत्राला कोठल्यातरी योजनेचा लाभ घेऊन टाक म्हणून प्रोत्साहीत केले जाते, ती योजना मिळेपर्यंत आणि त्या योजनेतून पुढे जी प्रगती घडेल याची स्वप्न त्याच्या मनात बसवली जातात आणि एकदा का यासाठी सारे गहाणखत तयार झाले की, पुढे मग मात्र त्याला 'केवल' लाभ घेतल्याचे प्रमाणपत्र नशिबात येते आणि इथूनच त्याची बैल म्हणून ओळख होते. हा बैल वाड्यावर, गढीवर, बैठकीत, मेळाव्यात, कोठेही नंतर रवंथ करत बसवला जातो. या बैलाकडून खंडणीची नांगरणी तर कर्मचाऱ्याला ढुसणी अशी विकासकर्मे करून दाखवावी लागतात. राखणदारासारखे साहेबाच्या एकांताला बाधा नको म्हणून त्याला त्या एकांताची ही राखणी करावी लागते. असे बैल असंख्य तयार करणे हेच कर्तव्य आहे असे सगळे 'मनासारखे राजे, राजासारखे



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

मन'वाले नंदीबैल सांगत असतात. गावात असे बैल एकदा तयार झाले की, त्यांना नकळत वर्षभर काम करायची सवय आपोआप लागते. या बैलांना केवळ धर्मकृत्य म्हणून जाईल तिथे जगण्यापुरते चारापाणी दिले जाते आणि केवळ निवडणुका आल्या की फक्त यांच्यासाठी म्हणूनच कार्यकर्त्यांचा पोळा या सणाची सुरुवात होते. हे आमचे बैलांचे वर्तमान पुराण चुकीचे वाटत असेल तर वाटू द्या; परंतु नंदीबैल कसे फिरताहेत ते विश्लेषण तरी पटवून घ्या. पुन्हा एकदा नीट आठवा की, तुमच्या गावातला तुमचा कासरा धरून तुमच्या नाकपुड्यांना वेदना देणारा तिकडे राजधानीत जाऊन कोणाच्या उंबऱ्यावर उभा राहतो. बिल्डर श्रेष्ठी, ब्रॉथेल श्रेष्ठी, हवाला श्रेष्ठी, हॉटेल श्रेष्ठी, टोलश्रेष्ठी, बिझनेस श्रेष्ठी या साऱ्या श्रेष्ठींच्या कंपाऊंडमध्ये त्याला माणसाळवलेले पाहून आणि ते म्हणतील तसे करताना, वागताना पाहून नंदीबैल आठवायला काय हरकत आहे. हे तर काहीच नाही एवढे करूनही एखादा तुमच्यातलाच कोणी मस्तवाल नंदीबैल वळून बनू पाहू लागला, शिंगे रोखू लागला तर त्याला सर्व धनाढ्यमंडळी छानपैकी शिल्परूपी पुतळा बनवून टाकतात. केवळ वळूचे शिल्प असलेले एकमेव ठिकाण मुंबईत शेअरबाजार जिथे भरतो तिथल्या स्टॉक एक्स्चेंजच्या इमारतीसमोर यासाठीच करून ठेवलेला आहे. हे नाकपुड्या फेंदारलेले, शिंगे मारणारे, नजर रोखलेले वळूरूप काय सिद्ध करते. धनाढ्यांचा पुरुषार्थ म्हणून नंदीबैल ठेवलेले आहेत आणि हे नंदीबैल मात्र फक्त या लोकांच्या संपत्तीच्या रक्षणासाठीचा वळूअवतार धारण करतील. हेही खोटे वाटले तर आदरणीय अण्णाजीपंत राळेगणकर यांचे उपोषण पाहा, पाहा कसे अतिधनाढ्य आता हजेरी लावत आहेत ते! या सर्व कासराधारी धनाढ्यांनाच हे माहीत आहे की, इंडिया आलवेज ॲक्सेप्ट इनडायरेक्ट करप्शन, म्हणूनच त्यांना सर्वसामान्य भ्रष्टाचाऱ्यांचे डायरेक्ट करप्शन नकोसे-नकोसे झाले आहे. या डायरेक्ट करप्शनमुळे हळूहळू त्यांचे इनडायरेक्ट करप्शन उघडकीला येईल का, काय याचीच त्यांना भीती वाटते आहे आणि हे डायरेक्ट करप्शन करणारे जे आज आहेत त्यांची अंडी चेचणी कदाचित अर्धवट राहिली की काय याची त्यांना भीती वाटल्यानेच एसीची थंड हवा सोडून, मान्सूनची पावसाळी सहल सोडून, मॉस्कीटो रिपेलंट क्रीम चोळून ही दमणीरूपी छकड्यात बसणारी मंडळी हुऽऽई हुऽऽररर् करत अण्णाला समर्थन देत आहेत. अण्णांचेही हळूहळू नंदीबैलात रूपांतर होण्याची वाट ते पाहत आहेतच. बरे यात आपल्या शेतकऱ्यांचा सहभाग आहे की, नाही याचा कोणी विचारही केला नाही, कारण 'मुकी जनावरे कोणीही हाका' ही आपल्यासाठीच तयार केलेली म्हण आहे. खरे तर आता जगभरात दाळीचे भाव वाढत आहेत, आपल्या घरी दरमहा पोळा साजरा करण्याची निसर्गाने खरीखुरी संधी दिली आहे, याकडे आपल्यासारख्या बैलांचे लक्ष जाणार नाही, कारण डोळ्यांवर तारुण्यजात झापडं लावल्या गेलेली आहेत. त्यात आता पोळा सणाचा काळ असल्याने गळ्यात घुंगरूही आले आहेत, तर नाकातल्या वेसणीचा सुगंधही मनाला आवडतो आहे आणि कासरा कोरा करकरीत आहे. हे सगळे काय आहे तर-

आयुष्यभर आहे दावण नशिबाला...
चाबकाचे फटके रोज पाठीला...

हे सगळे चित्र छान-छान आहे. पोळ्याच्या सणामुळे जेव्हा आम्ही विचार करत बसलो तेव्हा हे जाणवले, हे जाणवणे इतके अद्भूत आहे की, आम्ही स्वतः नंदीबैल असूनही यावेळी मात्र स्वतःच्या विचाराला होकारार्थी म्हणून आमचीच मान कोणीही न सांगता त्रिवार हलवली आणि अगदी गुबू-गुबू हा आवाज कोणीही केला नसतानाही आम्हाला आमच्या आमच्या मनातूनच गुबू-गुबू हा आवाज ऐकू आला आणि एक साक्षात्कार झाला की,

**करायाचे नाही । कुठलेच काम ।**
**फुकटाचे दाम । ओरपावे ।।**
**ठेचून काढीला । जरी पुरुषार्थ ।**
**त्यातची हा स्वार्थ । आहे खरा ।।**
**सिद्ध करा प्रेम । मालमत्तेवर ।**
**हा वर्णसंकर । त्यातूनची ।**
**मान हलवती । धनाढ्य नंतर ।**
**पिक ये बपंर । थंडा म्हणे ।।**

एवढे करून तर बघा, पुढच्या वर्षी तुमच्या हातीच कासरा येईल! तथास्तू!!

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■





## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

गोबर जायला निघाला तेव्हा म्हातारीनं त्याला सत्तुचं पीठ आणि खांडसरी कालवून खायला दिलं. गावातली काही माणसं मजूरी शोधायला तिकडेच निघाले होते. गप्पा गप्पात वेळ कटला आणि ते सारे अमिनाबादच्या बाजारात पोहोंचले. माणसांची एवढी गर्दी पाहून गोबर तर हैराण झाला. त्याला असं वाटत होतं माणसावर माणसं उलटून पडताहेत, की काय? त्या दिवशी बाजारात चारपाचशे पेक्षा कमी माणसं नसावित. मेस्त्री, सुतार, लोहार, माथाडी, बाजा विणणारे, दगड फोडणारे, सारे सारे जमा झाले होते; पण गोबरच्या हातात तर काहीच हत्यार नव्हतं. त्याला काय काम येतं हे कुणी कसं ओळखावं? हत्यार नसेल तर त्याला विचारील तरी कोण?

हळूहळू एकेका माणसाला काम मिळायला लागलं. काही लोक निराश होऊन घरी परतत होते. उरलेले बहुतेक लोक एक तर म्हातारे किंवा निकम्मे होते, ज्यांना कुणी विचारायला तयार नव्हतं. त्यांच्या पैकीच एक गोबर होता. सुदैवानं आज त्याच्याजवळ खायला होतं. त्यामुळे काम मिळालं नाही म्हणून तेवढं वाईट वाटायचं कारण नव्हतं.

अचानक मिर्झा खुर्शेद नावाचे एक गृहस्थ तिथे आले आणि मोठ्या आवाजात त्यांनी सर्वांना पुकारलं, ''ज्यांची सहा आणे रोजावर काम करायची तयारी आहे त्यांनी माझ्याकडे यावं. सायंकाळी पाच वाजता सुट्टी होईल.'' मेस्त्री आणि सुतार सोडून बाकी सगळे त्यांच्याबरोबर निघाले. चारशे फाटक्या माणसांची फौज तयार झाली. सर्वांत पुढे खांद्यावर एक जाडसर सोटा घेऊन स्वतः मिर्झा खुर्शेद होते. त्यांच्या मागोमाग येणाऱ्या 'फौजेत'ल्या एका म्हाताऱ्यानं त्यांना विचारलं, ''मालक पण काम काय करायचं आहे?'' मिर्झांनी काम सांगितलं तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटलं. केवळ कबड्डी खेळायची होती! त्या भुके कंगाल मेंढ्यांच्या रांगेला आश्चर्य वाटलं, हा काय विक्षीप्त माणूस आहे. जो केवळ कबड्डी खेळण्यासाठी सहा आणे देतो आहे?

भाग तेरा

# गोदान



नक्की लहरी असला पाहिजे. भरपूर पैसा कमावलेला माणूस लहरी होऊ शकतो आणि भरपूर शिकलेलाही होऊ शकतो! पुष्कळ लोकांना तर अशीही शंका आली, की हा थट्टा करत असावा! या शंकेनं पिडीत गोबर त्यांना भीत भीतंच म्हणाला, ''मालक, आमच्याजवळ खायला पैसाही नाही काही मिळालं तर खाऊन तरी घेऊ.'' मिर्झानी चटकन सहा आणे त्याच्या हातावर ठेवले. त्यांना लोकांना वाटणाऱ्या शंकेची जाणीव झाली असावी म्हणून ते मोठ्याने म्हणाले, ''सर्वांना मजूरी चालता चालताच मिळेल. काळजी करू नका.''

मिर्झा खुर्शेद यांनी गावाबाहेर थोडी जमीन घेऊन ठेवली होती. मध्यभागी एक झोपडी आणि बाकी मोकळी जमीन. झोपडीत तीनचार खुर्च्या आणि एक टेबल आणि त्यावर काही पुस्तकं ठेवलेली. झोपडीवर नाना प्रकारच्या वेली चढवलेल्या. त्यामुळे ती झोपडी छानंच दिसत होती. अवती भवतीच्या जागेत आंबा आणि पेरूची रोपं आणि अनेक फुलझाडं लावलेली होती; पण बाकी मोठा हिस्सा पडितंच होता. मिर्झांनी सर्वांना एका रांगेत उभं केलं आणि मजूरी वाटली.

गोबरला त्यांनी आधीच मजूरी दिली होती. त्याला मिर्झांनी सर्व रोपांना आणि फुलझाडांना पाणी द्यायचं काम सांगितलं. त्यामुळे त्याला मात्र कबड्डी खेळायला मिळालं नव्हतं. त्यामुळे तो मात्र नाराज झाला. त्याला वाटलं होतं, खेळायला मिळालं असतं तर या म्हाताऱ्यांना उचलू उचलू आपटलं असतं; पण त्यानं विचार केला, जाऊ द्या झाल. कबड्डी तर खूप खेळलोय आपण शिवाय पैसेही मिळालेत.

असं वाटत होतं साऱ्यांना, की आज युगा युगानंतर कबड्डी खेळायला मिळतंय आणि तेही मजूरी मिळून! काही म्हाताऱ्यांना तर कबड्डी काय खेळ आहे हेही माहित नव्हतं. दिवसभर कष्ट करायचे आणि रात्री परतल्यावर घरी जे काय असतील ते दोन घास खाऊन भूक भागवायचे ते. दुसऱ्या दिवशी सकाळपासून परत तेच. या चक्रातंच ते अडकलेले असायचे. त्यांच्यासाठी जीवन एक शुष्क, आनंदहीन, औपचारिक झालेलं होतं. मात्र आजच्या या संधीमुळे या म्हाताऱ्यांचं यौवन जणू परतलं होतं. उपाशी, तपाशी राहिलेले अर्ध मेले झालेले हे म्हातारे धोतराचा आचा कोचा खोवून हाबूक ठोकत टणाटण उड्या मारायाला लागले. त्यांच्या म्हाताऱ्या हाडात जसा काही परत जोश उतरला होता! दोन संघ झटपट तयार करण्यात आले आणि त्यांचे कप्तानही नेमण्यात आले. गडी निवडून खेळ सुरू होई तो बारा वाजून गेले होते. अशा खेळासाठी हिवाळ्याचे दिवस आदर्श असतात, उन्हाचा त्रास होत नाही!

तिकडे मैदानात एके बाजूस उभे राहून मिर्झा निकीटाचं वाटप करत होते. असं काहीतरी आगळं वेगळं करायची सनक त्यांना नेहमी यायची. श्रीमंताकडून पैसा घ्यायचा आणि गरिबात वाटायचा. या म्हाताऱ्यांना माहित नव्हतं; पण त्यांच्या या कबड्डी मॅचची जाहीरात त्यांनी गेल्या कैक दिवसापासून चालवली होती. मोठमोठ्या जाहिराती झळकत होत्या. पैसे वाटले गेले होते. ही मॅच एकदम वेगळी होणार होती. देशातले म्हतारे कसे एकदम तरुण झाले आहेत हे पहा आणि आपले डोळे तृप्त करून घ्या असं त्या जाहिरातीत सांगितलं होतं. तिकिट तर दहा रुपयापासून दोन आण्यापर्यंत होते आणि जे पाहणार नाहीत त्यांना पश्चात्ताप करावा लागेल. अशी सुसंधी पुन्हा येणार नाही असंही आवाहन त्यात केलं होतं. तीन वाजेपर्यंत सारं मैदान भरून गेलं होतं. दोन हजाराच्या आसपास लोक असावेत. श्रीमंतासाठी खुर्च्या आणि बाकांची व्यवस्था होती आणि बाकी लोकासाठी साफ केलेली जमीन होती.

या सामन्यासाठी लखनौ शहरातील सारे प्रतिष्टीत हजर होते. ज्यात होते रायसाहेब, तंखा, मेहता आणि मिस मालती. खेळ सुरू झाला आणि मिर्झा मेहतांना म्हणाले, ''डॉक्टर साहेब, एक जोडी आपलीही होऊन जाऊ द्या.''

तेव्हा मालती म्हणाली, ''फिला सरफरची जोडी फक्त फिलॉसफरशीच होऊ शकते.''

मिशावर ताव देत मिर्झा म्हणाले, ''मग मी फिलॉसफर नाही असं तुम्हाला वाटतं, की काय? माझ्या मागे खुशामदखोर माणसं आहेत; पण मी आहे फिलॉसफर. मिस्टर मेहता आपण माझी परिक्षा घेऊ शकता!''

मालतीनं विचारलं, ''बरं सांगा, मिर्झाजी, तुम्ही आयडियालिस्ट आहे, की मटेरियालिस्ट?''

''मी दोन्हीही आहे.''

''ते काय म्हणून?''

''हे तर खूप चांगलं. संधी साधून तसं वागायचं.''

''मग तुमचं स्वतःचं काही तत्त्वज्ञान नाही?''

''ज्या गोष्टीचा निर्णय आजपर्यंत झाला नाही आणि पुढेही होऊ शकणार नाही, त्याचा निर्णय आज कसा काय करू शकणार? लोक डोळे फाडफाडून पुस्तक वाचून जो निर्णय घेतात त्या निर्णयापर्यंत तर मी आताच पोहोंचलो आहे. मला तुम्ही सांगा, कुणा तरी फिलॉसफरनं अकलेचे पतंग उडवण्याशिवाय काही प्रत्यक्षात केलंय काय?''

डॉ. मेहतांनी त्यांच्या अचकनची वटन खोलली आणि ते म्हणाले, ''ठीक आहे, मी तुम्हाला फिलॉसफर मानतो. तेव्हा आपल्या दोघांची जोडी होऊन जाऊ द्या.''

मिर्झांनी खन्नाला विचारलं, ''तुमच्यासाठी मी एखादा जोडीदार निवडू का?''

मालतीनं पाठिंबा देत सुचवलं, ''हां, यांना तंखाबरोबर जोड लावा.''

खन्ना पटकन म्हणाले, ''नको, नको. मला क्षमा करा.''

त्यानंतर मिर्झांनी रायसाहेबांना विचारलं, ''मी आपल्यासाठी कुणी जोडीदार पाहू का?''

''माझी जोडी तर ओंकारशी आहे; पण ते तर आज नाहीत.'' रायसाहेब म्हणाले.

मिर्झा आणि मेहता केवळ लंगोट घालून मैदानात उतरले. एकजण या पार्टीत तर दुसरा त्या पार्टीत आणि खेळ सुरू झाला. लोक म्हाताऱ्या खेळाडूंना हसत होते आणि टाळ्याही वाजवत होते, शिव्या देत होते, उत्तेजनही देत होते आणि शर्तीही लावत होते. ते म्हणत होते, या म्हाताऱ्याकडे तर बघा, वा, काय शाननं मैदानात उतरले आहेत. सर्वांना मारूनंच परततील तसं पहायला जावं तर दुसऱ्या बाजूनही म्हातारेचं होते. दोघेही डावपेच लावत होते. म्हाताऱ्यांच्या हाडात आणखी खूपंच जीव दिसतोय असंही लोक म्हणत होते. लोकांना वाटत होतं म्हाताऱ्या लोकाकडे पाहून, की या लोकांनी जसं नी जेवढं अन्न खाल्ल आहे तेवढं तर आपण पाणीही प्यालेलं नसेल. भारत श्रीमंत होत चालला आहे असं म्हणताहेत; पण असं वाटतं, की या म्हाताऱ्यासारखी जिवट माणसं आज सापडणंही कठिण आहे. ते बघा, त्या म्हाताऱ्याला या म्हाताऱ्यानं धरलंय तर सुटण्यासाठी तो किती धडपड करतो आहे; पण आता सुटका

होईल असं वाटत नाही. एकाला पकडायला आता तीघे तिथे आलेत. असेच काहीतरी म्हणत लोक खेळात रस घेत होते. त्यांचं सारं लक्ष मैदानाकडेच होतं. खेळाडूंच्या पकडापकडी, उड्या मारणं याकडे लोक तन्मय होऊन पाहत होते. चोहीकडून कधी मधी चित्कार उडायचे. तर कधी खोटारडेपणामुळे किंवा अन्यायाविरुद्ध लोक ओरडायचे, ''अरे सोड, अरे सोड.' असे आवाज यायचे; पण मोठ मोठी तिकीट घेऊन जे थोडे लोक शामियान्यात बसले होते ते मात्र खेळात रस घेत नव्हते. त्यापेक्षा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या चर्चेत ते गुंगले होते.

हातातील जिंजरचा प्याला खाली ठेवत सिगर पेटवत खन्ना म्हणाले, ''रायसाहेब मी तुम्हाला पूर्वीच म्हणालो, की यापेक्षा कमी व्याज दरानं कर्ज द्यायला बँक तयार नाही आणि जी काय सवलत मी देऊ केली आहे ती सुद्धा हा आपल्या संबंधातला मामला आहे म्हणून.''

मिशीतल्या मिशीत हसत रायसाहेब म्हणाले, ''तुमच्या नीतीनं तर घरच्या लोकांनाच हलाल व्हावं लागत आहे.''

''तुम्ही हे काय म्हणताय?''

''मी ठीक म्हणतो आहे.''

''सूर्य प्रतापकडून आपण केवळ सात टक्के दराने वसुली केली आणि मला मात्र नऊ टक्के आणि वर तुमचे उपकार!''

मोठ मोठ्याने हसत खन्ना म्हणाले, ''त्या शर्तीवर तर मी तुम्हाला ही कर्ज देऊ शकतो. त्यांनी कर्जासाठी सारी संपत्ती गहाण ठेवली आहे. कदातिच त्यांना ती संपत्ती मिळू शकणारही नाही!''

''मी माझी काही संपत्ती विक्रीला काढतो. नऊ टक्के व्याजापेक्षा हे केव्हाही बरं. जॅकसन रोडवरील माझी मालमत्ता मी विक्रीला काढतो. तुम्ही त्या विक्री व्यवहारात तुमचं काय कमीशन असेल ते घ्या.''

''ती कोठी गावापासून काहीशी दूर आहे. त्यामुळे विकल्या जाणे कठिण आहे.'' खन्नानी शंका व्यक्त केली आणि विचारलं, ''तुम्हाला काय किंमत अपेक्षित आहे?''

कोठीसोबत पंधरा बिघे जमीनही होती, तेव्हा रायसाहेबांनी किंमत एक लाख पंचेवीस हजार किंमत सांगितली. ती किंमत ऐकून खन्ना तर चकितंच झाले आणि म्हणाले, ''रायसाहेब, तुम्ही पंधरा वर्षांपूर्वीचा काळ गृहित धरता आहा. गेल्या पंधरा वर्षांत पन्नास टक्क्यांनी जमिनीचे भाव कमी झाले आहेत.''

त्यांच्या या म्हणण्याबाबत रायसाहेबांनी खेद व्यक्त केला आणि ते म्हणाले, ''नाही, तसं नाही. पंधरा वर्षांपूर्वी या कोठीची किंमत दीड लाख होती.''

''मी खरेदी दाराच्या शोधात असेन; पण माझं कमीशन पाच टक्के असेल.''

''इतराकडून कदाचित दहा टक्के घेत असाल. खैर, एवढा पैसा जमवून काय करणार आहात?''

''असं करा, तुम्हाला जे योग्य वाटेल ते कमीशन द्या. कबूल? साखर कारखान्याचे शेअर्स आणखी घेतले नाहीत. आता थोडेच शेअर्स शिल्लक आहेत, नंतर हात चोळत बसाल. तुम्ही तर आणखी विम्याची पॉलिसीही घेतली नाही. टाळाटाळ करायची वाईट खोड आहे तुम्हाला. स्वतःचा फायदा करून घेण्यातही टाळाटाळ करत असाल तर दुसऱ्यांचा काय फायदा करून देणार? म्हणून तर म्हणतात, की जायदादी श्रीमंतांच्या अकलेवर जंग चढतो. माझ्या हातात असतं तर सर्व जहागिरी जप्त करून टकाल्या असत्या.''

आता मैदानात मेहताचा संघ मागे पडत होता. अर्ध्याहूनही अधिक खेळाडू आऊट झाले होते. मेहता तर आयुष्यभरात कधी कबड्डी खेळले नव्हते. याउलट मिर्झा तर पट्टीचे खेळाडू होते. सुरुवातीला मेहमा अभिनयाचा अभ्यास करायचे. वेषांतर, रंगशोभा करण्यात ते तज्ञ होते. याउलट मिर्झाला आखाडा प्रिय होता. मालतीचं लक्ष खेळाकडे होतं. रायसाहेबाजवळ जात ती म्हणाली, ''मेहताची पार्टी तर मार खाते आहे.''

त्याचवेळेस रायसाहेब आणि खन्नामध्ये विम्यासंबंधी चर्चा चालली होती. त्या चर्चेचा त्यांना उबग आल्यासारखं दिसत होतं. नेमकं त्यावेळी मालती आली, त्यामुळे त्यांची सुटका झाल्यासारखं वाटलं. तिला आलेलं पाहून ते उभे राहत म्हणाले, ''तसं दिसतंय खरं. मिर्झा पक्का खेळाडू आहे.''

''आपली फजिती करून घ्यायचं मेहताला हे काय सुचलं?''

''यात काय फजिती आहे? अहो, ती तर एक गंमत आहे.''

''मेहताच्या टीममधून जो जातो तो तर आऊटच होतो.'' रायसाहेब म्हणाले.

काहीवेळ थांबून मालतीनं विचारलं, ''या खेळात इंटरव्हल नसते का?''

मध्येच खन्ना म्हणाले, ''मोठ्या थाटात मेहता निघाले होते मिर्झाशी लढायला. त्यांना वाटलं, ही सुद्धा एक फिलॉसफीच आहे.''

''मी विचारते आहे, या खेळात हाफ टाईम नसते का?''

''आता तर खेळंच संपत आलाय.'' खन्ना तिला चिडवत म्हणाले.

''मिर्झा मेहताला पकडून ठेवतील आणि मेहता ओरडतील तेव्हा खरी मजा येईल.''

तेव्हा मालती त्याला म्हणाली, ''मी तुमच्याशी बोलत नाही, रायसाहेबाशी बोलते आहे.''

तरिही खन्ना म्हणाले, ''अहो, हाफ टाईम? एक तर माणूस उरला आहे.''

''आणि तो माणूसही आऊट झाला तर?''

''तुम्ही बघतंच राहा. शेवटी सगळी माणसं आऊट होतील आणि एकटे मेहताच उरतील आणि पुढे तेही आऊट होतील.''

मालतीला ते फार लागलं. ती चिडून म्हणाली, ''तुमची तर मैदानात उतरायचीही हिंमत झाली नाही.''

''मी अडाणी माणसांचे खेळ खेळत नाही. टेनिस माझा खेळ आहे.''

''टेनिसमध्ये तर मी तुम्हाला अनेक वेळा हरवलं आहे.''

''तुम्हाला मी हरवू शकेन असा दावा तर मी कधी केलाच नाही!''

''पण तसं आव्हान देणार असाल तर मी स्वीकारायला तयार आहे.''

खन्नाला असं फटकारून मालती परत आपल्या जागेवर येऊन बसली. मेहताबद्दल कुणालाही सहानुभूती नाही असं तिला वाटलं. आता खेळ संपवावा असंही कुणी म्हणत नव्हतं. मेहता तरी किती विचीत्र माणूस आहे? काही गडबड का करत नाही? तिच्या मनात आलं, की इथेही ते त्यांची न्यायप्रियताच दाखवत होते. हार पत्करून परतले म्हणजे चोहीकडून टाळ्यांचा गजर होईल.

शेवट जसं जसा जवळ येत गेला. तस तसे लोक उत्सूक होत गेले आणि पुढे पुढे सरकायला लागले. मैदानाभवती दोरीचं कडं केलेलं

होतं. ते कडं तर केव्हाच मोडून पडलं होतं. लोकांना अडवण्याचा स्वयंसेवक प्रयत्न करत होते; पण गर्दीच्या रेट्यापुढे त्यांचं काही एक चालत नव्हतं. खेळ शेवटाला आला आणि दुसऱ्या बाजूला आता एकटे मेहता उरले होते. सर्व काही आता त्यांच्या एकट्यावर उरलं होतं. ते स्वारी करून परत आले तर त्यांचा पक्ष बाजू उलटवू शकत होता. नसता पराभवाची मानहानी स्वीकारून त्यांना परतावं लागणार होतं. ते चढाई करून गेल्यावर जेवढ्या खेळाडूंना स्पर्श करतील तेवढ्यांना बाद जाहीर केल्या जाणार होतं आणि त्यांच्या पक्षातल्या तेवढ्याच लोकांना खेळात येता येणार होतं. सर्वांचे डोळे मेहतावर लागले होते. मेहता चढाईसाठी निघाले. प्रेक्षकांनी चोहीकडून मैदान घेरलं. उत्सूकता पराकोटीला पोहोंचली. मेहता मात्र अत्यंत शांततेने चढाईवर निघाले. त्यांच्या हालचाली प्रमाणेच प्रेक्षकांच्या हालचाली होत होत्या. मेहतानी चढाई केली तसे मिर्झा मागे मागे सरकायला लागले. मिर्झाची टीम संघटीत होती त्यामुळे मेहताना कुणी सहजासहजी सापडत नव्हतं. मेहता त्यांच्याच पार्टीतील कमीत कमी पाच सहाजणांना तरी उठवू शकतील असं सर्वांना वाटलं होतं; पण आता मात्र त्यांच्यात निराशा पसरायला लागली.

अचानक मिर्झांनी उडी मारून मेहताची कंबर पकडली आणि मेहता त्यांच्या पकडीतून सुटायची धडपड करू लागले, तसेच मिर्झाला पाटीकडे ओढू लागले. लोकांत त्यामुळे एकदम जोश पसरला. प्रेक्षक एवढे खेळाच्या मैदानाजवळ आले, की खेळाडू कोण आणि प्रेक्षक कोण समजणं कठिण झालं. आता मिर्झा आणि मेहता यांच्यात मल्लयुद्ध सुरू झालं. मिर्झाच्या पार्टीतल्या म्हाताऱ्यांनीही एव्हाना मेहताला पकडून ठेवायचा प्रयत्न चालवला. मेहता जमिनीवर गप्प पडून राहिले. त्यांनी थोडा हात लांबवून पाटीला स्पर्श जरी केला तरी अनेक माणसं उठू शकत होती; पण मिर्झा त्यांच्या मानेवर बसले होते. मेहताचं तोंड आणि डोळे लाललाल झाले होते. अंगावर टाकून त्यांना दाबून ठेवलं होतं.

मालती त्यांच्याजवळ जाऊन म्हणाली, ''मिर्झा हे तुमचं खेळणं फेयर नाही!''

मिर्झानं मेहताच्या मानेवर एक ठोसा लगावला आणि म्हणाले, ''जोपर्यंत हे 'हरलो' असं म्हणणार नाही, तोपर्यंत मी यांना सोडणार नाही.''

पुढे येत मालती म्हणाली, ''त्यासाठी तुम्ही त्यांच्यावर अशी जबरदस्ती नाही करू शकत.''

''बिलकुल करू शकतो.'' मेहताच्या पाठीवर उडी मारत मिर्झा म्हणाले.

''तुम्ही त्यांना दम तोडायला सांगा, मी त्यांना सोडतो.''

मेहतानं परत उठण्याचा एक प्रयत्न केला तेव्हा मिर्झानं परत त्यांची मान दाबून धरली मिर्झाचा हात धरून मालतीनं ओढण्याचा प्रयत्न केला आणि ती म्हणाली, ''हा खेळ नाही, शत्रूत्व आहे!''

''शत्रूत्व तर शत्रूत्व असू द्या!''

''तर तुम्ही सोडणार नाही?''

नेमकं त्याच वेळेस काय घडलं कुणाला कळलंही नाही. मेहता अचानक उठले आणि पळायला लागले. ते पाहून हजारो प्रेक्षकांना टोप्या आणि फेटे उडवले. हे कसं काय घडलं कुणाला कळलंच नाही. मिर्झानं मेहताला उचलून धरलं आणि शामियान्याकडे नेले. प्रेक्षकांच्या तोंडात हेच शब्द होते, ''डॉक्टरसाहेब जिंकले.'' या अचानक बाजी उलटण्यानं प्रेक्षक अचंबित झाले. प्रत्येकजण मेहताच्या जिद्दीचं आणि चिवटपणाचं कौतुक करत होते.

सर्व मजूरासाठी संत्री आधीच मागवून ठेवण्यात आली होती. प्रत्येकाला एकेक संत्र देऊन परत पाठवण्यात आलं. शामियान्यात पाहुण्यासाठी चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मिर्झा आणि मेहता आमनेसामने बसले आणि मालती मेहताच्या शेजारी बसली होती.

मेहता म्हणाले, ''मला आज एक नवीन अनुभव आला. एका स्त्रीची उत्तेजना पराभवाचं रूपांतर विजयात करू शकतं.''

मालतीकडे पाहत मिर्झा म्हणाले, ''अस्स आहे तर! तरीच मला आश्चर्य वाटत होतं, तुम्हाला अचानक एवढा जोर कुठून आला!''

काही काळ मित्रा मित्रांच्या गप्पा झाल्या आणि त्यानंतर एकेकानं रजा घेतली. उरले मिर्झा आणि मेहता. दोघांचं अंग माती आणि घामानं भरलं होतं. तेव्हा त्यांना आंघोळ करायची होती. गोबरनं पाणी काढून आणलं आणि मग दोघांनी आंघोळी केल्या. दोघांत काही वेळ लग्नावरून गप्पा झाल्या आणि मेहतानी मिर्झाची रजा घेतली. एव्हाना सायंकाळ झाली होती. मिर्झानं पाहिलं, तेव्हा त्यांच्या लक्षात आलं, की इतर मजूर गेले तरी गोबर झाडांना पाणी देत होता. तेव्हा मिर्झा त्याला म्हणाले, ''जा आता उद्या परत येशील?''

गोबरनं त्यांना चाचरत चाचरत विचारलं, ''मला नोकरी करायची इच्छा आहे मालक?''

''मग नोकरीसाठी मीच तुला ठेऊन घेतो!''

''किती पगार देणार मालक?''

''तु मागशील तेवढा!''

''मी काय मागणार मालक? तुम्ही द्याल तो घेणार!''

''पंधरा रुपये देईन. मात्र मेहनत करावी लागेल.''

गोबर कष्टाला घाबरत नव्हता. पगार मिळाला तर आठही प्रहर काम करायला तो तयारंच होता.

''मला जिथे जागा मिळेल तिथे राहिन.''

''ठीक आहे, जागेची व्यवस्था मी करतो. या झोपडीतंच एका कोपऱ्यात राहा.'' गोबरला तर जसं काही स्वर्गच मिळाला.

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

# मा. शरद जोशी यांना 'चतुरंग'चा 'सामाजिक जीवनगौरव पुरस्कार'



मुंबईतील 'चतुरंग प्रतिष्ठान' संस्थेच्या यावर्षीच्या सामाजिक क्षेत्रासाठी असलेल्या 'जीवनगौरव' पुरस्कारासाठी, निवड समितीने शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांची निवड केली आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशात, सर्वदूर पसरलेल्या शेतकऱ्यांची मोठी संघटना बांधण्याचा आणि त्यांच्या शेतीविषयक बहुविध प्रश्नांची तड लावण्यासाठी कृतीशील चळवळ उभारण्याचा जो ध्यास श्री. शरद जोशी यांनी आयुष्यभर धरला, त्यासाठी अथक प्रयत्न केले, त्या त्यांच्या जीवनध्येयाचा आणि त्यासाठी यांनी केलेल्या अथक परिश्रमी कार्याचा आम समाजातर्फे सामाजिक जाणीवेतून कृतज्ञतापूर्वक गौरव व्हावा, या भावनेने चतुरंग प्रतिष्ठानच्या यंदाच्या सामाजिक जीवनगौरव पुरस्कारासाठी श्री. शरद जोशींची निवड करीत असल्याचे निवड समितीने आपल्या पत्रकात म्हटले आहे. शेतमालाला वाजवी भाव मिळावा, शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य व्हाव्यात, त्यांच्या प्रश्नांचा साकल्याने विचार करणारे साहित्य प्रस्तुत करून समाजमनात शेतकरी बांधवांविषयी जागृती निर्माण व्हावी, तसेच ग्रामीण महिलांही संघटित होऊन कार्यरत व्हाव्यात अशा बीजस्वरुपी समाजकार्याचा विचार, या निवडीमागे असल्याचे समितीने म्हटले आहे.

डॉ. अरुण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखालील, डॉ. द. ना. धनागरे, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. विनय सहस्रबुद्धे, श्री. अविनाश धर्माधिकारी, श्री. सुधीर जोगळेकर आणि सौ. प्रफुल्ला डहाणूकर या मंडळींनी यंदाच्या २१व्या जीवनगौरव पुरस्काराच्या निवड समितीचे कामकाज पाहिले.

मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लक्ष रुपये असे पुरस्कार स्वरुप असलेला हा जीवनगौरव पुरस्कार यापूर्वी सामाजिक क्षेत्रासाठी श्रीमती इंदिराबाई तथा मावशी हळबे (१९९२), डॉ. इंदुमती गोवर्धन पारिख (१९९५), श्रीमान पांडुरंगशास्त्री आठवले (१९९९) आणि श्रीमान नानाजी देशमुख (२००३) आणि सौ. साधनाताई आमटे (२००७) या मान्यवरांना देण्यात आला आहे.

हा पुरस्कार स्वीकारण्यास श्री. शरद जोशी यांनीही सानंद संमती दिला असून डिसेंबर २०११ मध्ये मुंबईत होणाऱ्या चतुरंग रंगसंमेलनात श्री. जोशी यांना तो प्रदान करण्यात येईल.

# स्वामी रामदेव बाबा आणि शेतकरी संघटना बैठक

शेतकरी संघटनेचा मूलभूत विचार स्वामी रामदेव बाबा व त्यांच्या सहकार्यांना समजावून सांगण्यासाठी दिनांक ८ ऑगस्ट २०११ ते १३ ऑगस्ट २०११ दरम्यान पतंजली योगपीठ, हरिद्वार येथे झालेल्या 'मंथन' शिबिरामध्ये भाग घेण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने श्री. वामनराव चटप यांच्या नेतृत्वाखालही एक गट गेला होता.

त्यांच्या सोबत सर्व श्री. रवी देवांग, अनिल घनवट, राम नेवले, गुणवंत पाटील, जगदीश बोंडे, मिलिंद देशपांडे, सौ. सरोजताई काशीकर, सौ. शैलजा देशपांडे आदी नेते होते.

मंथन शिबिरात संघटनेचा विचारांची प्रभावीपणे मांडणी करण्यात आली. लवकरच देशातील सर्व शेतकरी संघटनांची एकत्र बैठक घेऊन समान कार्यक्रम ठरविण्यात येईल व



शेतीमालाला रास्त भाव तसेच कर्जमुक्तीसहित अनेक मागण्यांसाठी देश पातळीवरील आंदोलन छेडण्यात येणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# स्वाहाकारी सहकारावर सांगली येथे शेतकरी परिषद






**शीतल राजोबा (सांगली) :** महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे कॅगने केलेल्या ऑडीटमध्ये उघड झालेल्या कोट्यवधी रूपयांच्या भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारासंदर्भात बुधवार दि. २४ ऑगस्ट २०११ रोजी दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, सांगली येथे दुपारी शेतकरी परिषद घेण्यात आली.

परिषदेच्या अध्यक्षपदी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष रवीभाऊ देवांग होते. तर प्रमुख मार्गदर्शक पाहुणे श्री. अशोक कुलकर्णी (पुणे) हे होते.

यावेळी बोलताना श्री. रवी देवांग म्हणाले की, कॅगच्या ऑडीटनुसार सहकारी साखर कारखान्यामध्ये सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. या भ्रष्टाचारात सामील असलेले लोक आता तुरुंगात नाहीत, तर मंत्रिमंडळ विधानसभा, लोकसभेत आहेत. त्यांना शिक्षा होण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी राज्याचे साखर आयुक्त (पुणे) यांच्याकडे करून कारवाई न झाल्यास आयुक्तालयाला शेतकरी बेमुदत घेराओ घालतील. कॅगचा पहिला रिपोर्ट २००८ मध्ये प्रसिद्ध झाला. ३ वर्षे झाली तरी भ्रष्टाचारास जबाबदार लोकांना शिक्षा देण्याची कारवाई घडली नसल्याने या सगळ्याला साखर आयुक्त व मंत्रिमंडळ जबाबदार आहेत. आयुक्तांनी कारवाई न केल्यास साखर आयुक्तालय फोडण्याचे आंदोलनाचे नेतृत्व अनिल घनवट हे करतील. प्रथमतः आयुक्तालयास घेराओ आंदोलन दि. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती दिनी पुणे येथे घेण्यात येणार आहे.

प्रमुख पाहुणे श्री. अशोक कुलकर्णी म्हणाले, कॅगच्या अहवालाप्रमाणे प्रत्येक साखर कारखान्यावर सरासरी १५० कोटी रुपये कर्ज आहे. सहकारातील चांगले व्यवस्थापन असलेल्या कारखान्यांची कर्जे संपून ३० ते १०० कोटी रुपये शिल्लक असणारे केवळ ४-६ कारखाने आहेत. बऱ्यापैकी ३० कारखाने सोडले तर १७० कारखाने कर्जात बुडल्याने विकायच्या लायकीचे आहेत. सर्व कारखान्यांचे नेटवर्क उणे पडले आहे. राजकीय स्वार्थासाठी गरजेपेक्षा दुप्पट-तिप्पट कामगार भरले आहेत. तो बोजा ऊसबिलावर टाकला जातो. कारखान्यांच्या स्टोअरला १० वर्षे पुरेल एवढा स्पेअरपार्टचा स्टॉक असतानाही दुप्पट-तिप्पट दर लावून नवीन खरेदी केली जाते. साखरेसाठी रिकामे बारदान लाखोंच्या संख्येने खरेदी होते. त्यातही १० रुपयांपासून ३२ रुपये प्रत्येकी जादा दराने खरेदी केल्याचे कॅगने उघड केले आहे. हे सर्व पैसे शेतकऱ्यांचे असल्याने हा एक कर्करोग झाला आहे. शेतकऱ्यांनी कारखान्यांच्या दैनंदिन व्यवहारात लक्ष घातले पाहिजे. शेतकरी माझ्या सोबत आले तर अजूनही भ्रष्टाचार मी वर काढेन.

यावेळी शेतकरी संघटनेचे युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष संजय कोले म्हणाले, की भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याचे काम सहकार मंत्रालयाने व साखर आयुक्त यांनी करणे गरजेचे होते. शेतकऱ्यांच्या ऊसबिलातून पैसे कपात करून आयुक्तालयाची कोट्यवधी रुपयांची इमारत बांधण्यात आली. ते शेतकऱ्यांच्या नुकसानीचे कारण बनल्याने ते आता पेटवले पाहिजे. यावेळी कोले यांनी साखर कारखाने व सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याशी साटेलोटे करणाऱ्या नकली शेतकरी नेत्यांवर कडाडून टीका केली. सरत्या गळीत हंगामासाठी पुणे, अहमदनगर, सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांतील उसाचा पहिला ॲडव्हान्सबाबत तडजोड केली; परंतु शेतकऱ्यांना पैसे मिळालेच नाहीत. यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली. याचा जाब शेतकऱ्यांनी या नकली नेत्यांना विचारला पाहिजे.

यावेळी अनिल घनवट म्हणाले की, नगर जिल्ह्यामध्ये मोजक्याच घराण्यांच्या ताब्यात सहकारी संस्था असून अशा संस्था चेअरमन, संचालकपदे ही याच घराण्यात आहेत. कष्ट शेतकऱ्यांनी करून शेतमाल पिकवायचा मलई मात्र पुढाऱ्यांनी खायची असा सहकार आमच्या उपयोगाचा नाही. या सहकाराची गरज नाही.

करमाळ्याचे गणेश पवार म्हणाले, पंढरपूरातील विठ्ठलाला बडव्यांनी घेरले, त्याप्रमाणे सहकाराला भडव्यांनी घेरले आहे. या भडव्यांना ताळ्यावर आणण्यासाठी शेतकरी संघटना सज्ज आहे.

या परिषदेत जयपाल फराटे यांनी शेतकरी संघटक पाक्षिकाचे वर्गणीदार होण्याचे आवाहन केले. शिवानंद दरेकर (सोलापूर), ज्ञानदेव सकुंडे (सातारा), डॉ. आप्पासाहेब कदम (जालना), सौ. उज्वला नरदे (कोल्हापूर), सौ. स्वाती वंजाळे (सांगली), शंकर पूरकर (नाशिक), अनिल चव्हाण (पुणे) यांची भाषणे झाली. शे. सं. सांगली जिल्हाप्रमुख शीतल राजोबा यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले. परिषदेला अर्जुन बोराडे (नाशिक), परमेश्वर तळेकर (करमाळा), कडुअप्पा पाटील (जळगाव), ॲड. नेताजी गरजड (उस्मानाबाद), बाबूराव हाडोळे (लातूर), बाबूराव मगदूम (कोल्हापूर), हेमंतकुमार (रयतू संघ-कर्नाटक), एम. के. माळी, नवनाथ पौळ, अल्लाउद्दीन जमादार, रामचंद्र कठासे, रावसो दळवी,

चंद्रकांत वंजाळे, अरुण सावंत, चंद्रकांत पाटील, तानाजी, चव्हाण, शार्दूल सकळे, मंगला पाटील, वृषभ पाटील आदी उपस्थित होते. परिषदेचे सभागृह कार्यकर्त्यांनी खचून भरले होते.

परिषदेत संजय कोले यांनी मांडलेले व एकमताने मंजूर झालेले ठराव खालीलप्रमाणे

१) भष्टाचारात सामील असलेल्या सहकारी साखर कारखान्यांतील व कॅगने ठपका ठेवलेल्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षा करा.

२) साखर कारखाना बंद काळातील कामगारांच्या पगारासाठी उसाच्या पैशांतून कपात करू नये.

३) सहकारातील शेअर्सचा मोह आम्ही शेतकरी सोडत आहोत.

४) साखर, मळी आणि बगॅस यांच्या वर्षभरातील किमती लक्षात घेऊन आणि कार्यक्षम कारखान्याचा प्रक्रिया खर्च लक्षात घेऊन उसाची किंमत ठरवावी. तो दर सहकारी व खासगी कारखान्यांनी दिला पाहिजे, न दिल्यास ऊसबिल थकबाकी घोषीत करून आवश्यक वाटल्यास कारखान्यांची जप्ती करावी. त्यामुळे भ्रष्टाचारी अकार्यक्षम राजकीय लोकांची साखर उद्योगातून हकालपट्टी करावी.

५) साखर उद्योगावरील निर्बंध हटवावेत. साखरेचे दर रास्त पातळीवर ठेवण्याची काळजी सरकारने घ्यावी.

६) यंदा बाजारातील साखरेच्या किमती पाहता २०११-१२ हंगामात उसाला प्रतिटन एकरकमी २१०० रुपये पहिली उचल मिळावी.

७) मागील वर्षीची पहिली उचल ठरल्याप्रमाणे न दिलेल्या व २००९-१० चे फायनल बिलाच्या रकमा त्वरीत देण्यास भाग पाडावे अन्यथा सहकार मंत्री व साखर आयुक्त यांच्या विरोधात तीव्र आंदोलन.

८) उसाचे क्षेत्र मर्यादीत ठेवू.

# कडेठाण सोसायटीवर शेतकरी संघटनेचा पॅनल बिनविरोध विजयी



**श्री. कैलास तवार**

**पैठण :** पैठण तालुक्यातील कडेठाण बु. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत शेतकरी संघटनेचे मराठवाडा विभागप्रमुख श्री. कैलास तवार यांच्या नेतृत्वाखाली १३ सदस्यांचे निवडणूक अर्ज दाखल केले होते. गावातील दुसऱ्याही एका गटाने १७ उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या दिवशी दि. २२ ऑगस्ट २०११ रोजी विरोधी उमेदवाराने सर्वच्या सर्व अर्ज बिनशर्त परत घेतले. त्यामुळे शेतकरी संघटनेचा शेतकरी विकास पॅनल १३ जागा जिंकून बिनविरोध निवडून आला. त्यामुळे गावकऱ्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दुसऱ्या दिवशी कडेठाण बु. येथील महालक्ष्मी मंदिरात विजयी उमेदवाराचा गावकऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. त्यावेळी झालेल्या सत्कारास उत्तर देताना कैलास तवार यांनी सांगितले की, शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आम्ही लढत आलो आहे आताही सोसायटीच्या व गावाच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. सर्व सभासद शेतकऱ्यांना वेळेवर पतपुरवठा करणे, संस्थेचे कार्यालय नियमित सुरू ठेवणे, त्याचबरोबर संस्थेमार्फत खत दुकान व रेशन दुकान चालू करणे या कामांस प्राधान्य देण्यात येईल. पॅनल निवडून आणण्यासाठी गावातील सर्वच सभासद शेतकऱ्यांचे सहकार्य मिळाले त्यामुळे सर्वांचे एकदा सामूहीक आभार मानून कार्यक्रम संपला. या बरोबर विजयी उमेदवार श्री. मदन तवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये सर्वसाधारण गटात - श्री. जगन्नाथ पंडितराव तवार, श्री. बंडू जगन्नाथ जाधव, श्री. शिवाजी रामभाऊ चौरे, श्री. भाऊसाहेब चंद्रकांत तवार, श्री. शालिवाहन भिकनराव तवार, श्री. मदन बन्सीधर तवार, श्री. कैलास भाऊसाहेब तवार, तर बिनर कर्जदार गटात श्री. संभाजी शिवाजीराव तवार, महिला गटात श्रीमती आशाबाई दिलीपराव तवार, अनु. जाती/अनु. जमाती गटात श्री. मुकूंद धर्मराज वीर, वि.ज.भ.ज/वि.मा.प्र. गटात श्री. गोरख कचरू तळपे, इतर मागासवर्गीय गटात श्री. भाऊसाहेब गणपत राऊत आणि दुर्बलघटक या गटात श्रीमती छमखाबाई जनार्दन राठोड हे निवडून आले आहेत.

## शेतकरी संघटक स्थिर निधी

| | |
|---|---|
| **श्री. माधवभाऊ कारभारी पोटे**<br>*मु. पो. सई, ता. निफाड, जि. नाशिक.* | **रु. १०००** |
| यापूर्वी जमा निधी | रु. ६२,२०० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ६३,२०० |

सर्व देणगीदारांचे **मनःपूर्वक आभार.**
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.
**- कार्यकारी संपादक**